विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३८
(जुलै-डिसेंबर २०१६/ खंड ९, अंक २)

❑ प्रमुख संपादक ❑
दि.व्यं.जहागिरदार

❑ सल्लागार मंडळ ❑
श्रीनिवास खांदेवाले
प्रमोद लाखे
प्रशांत हरमकर
जनार्दन काकडे

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑
दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)-२६६१८५१

## अनुक्रमणिका

- भारतातील अन्नधान्याच्या वाढत्या किंमती : प्रवृत्ति आणि कार्यकारणभाव
  - विनायक देशपांडे ....................... १
- थॉर्स्टन व्हेब्लेन यांचे ''द थिअरी ऑफ लीझर क्लास''
  -एच.आर.तिवारी ..................... ११
- भारतातील आरोग्यविषयक सद्यःस्थिती
  -सुभाष पाटील ......................... २०
- Dr. Babasaheb Ambedkar's Economic Philosophy
  - M. L. Kasare ..................... २९
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पहिला शोध प्रबंध - ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ इस्ट इंडिया कंपनी
  - दि.व्यं.जहागिरदार ................... ३८
- जमीन सुधारातील जल व्यवस्थापन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर
  - गौतम खु. कांबळे ................... ४३
- विमुद्रीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था
  - उमेश भा.घोडेस्वार ................... ४८
- विमुद्रीकरण : एक आढावा
  - वनिता चोरे .......................... ५५
- पर्यावरणीय समस्यांच्या संदर्भात आदान-प्रदान विश्लेषण तंत्राचे उपयोजन
  - धीरज सु. कदम ..................... ६०
- नाबार्डची ग्रामीण विकासातील समन्वयी व विकासात्मक भूमिका : एक टीप
  - राजश्री रायभोग ..................... ७०

**ग्रंथ परिचय**

- 'स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव'
  - संगीता टक्कामोरे ...................... ७४
- 'आर्थिक जगत' (खंड ४)
  - विवेक चौधरी ......................... ७७
- ४० व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ....... ८०

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी
(२०१६-१७)

- कार्याध्यक्ष
  डॉ. अंजली कुळकर्णी
- अध्यक्ष
  डॉ. एच.आर.तिवारी
- सचिव
  डॉ.राजेश चव्हाण (अमरावती विभाग परिक्षेत्र)
  डॉ. गणेश मायवाडे (नागपूर विभाग परिक्षेत्र)
- प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'
  डॉ. वि.व्यं. जहागिरदार
- जिल्हानिहाय प्रतिनिधी :
  डॉ. प्राची देशपांडे (नागपूर शहर)
  डॉ. संगीता टक्कामोरे (नागपूर ग्रामीण)
  डॉ. पी.बी.तितरे (चंद्रपूर)
  प्रा. आर.बी.महेशकर (गडचिरोली )
  डॉ. वर्षा गंगणे (गोंदिया)
  प्रा. एस.बी.भुरे (भंडारा)
  प्रा. एस.बी.बोडे (वर्धा)
  प्रा. राजश्री रायभोग (अमरावती )
  डॉ. प्रभाकर आठवले (अकोला )
  प्रा. दिलीप महाजन (बुलढाणा)
  डॉ. उषा पाटील (यवतमाळ)
  डॉ. संजीव गायकवाड (वाशिम)

आजीव सदस्यता शुल्क : रू. १०००/- आहे, ही रक्कम सचिव डॉ. राजेश चव्हाण, प्रभारी प्राचार्य, कढी महाविद्यालय, परतवाडा यांचेकडे ''विदर्भ अर्थशास्त्र परिषद'' या नावाने ड्राफ्टने पाठवावी.

- अक्षर जुळवणी व मुद्रक :
  कॉम्प्यूटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)
  अमरावती. मो. ९८५०२८३२४६
  email : narendrapandharikar@gmail.com

**: स्वागत मूल्य :**
१) परिषद सदस्य - १०० रू.
२) शैक्षणिक संस्था - १५० रू.

# संपादकीय .....

'अर्थमीमांसा' या संशोधन पत्रिकेचा खंड ९, अंक २ सादर करतांना मला फार आनंद होत आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वर्तमान कार्याध्यक्षा, अध्यक्ष, तसेच माजी अध्यक्ष आणि कार्यकारिणीचे सर्व सदस्य यांची मला वेळोवेळी हा अंक सिद्ध करतांना मदत झाली आहे. अंकासाठी सल्लागार मंडळाने योग्य ते मार्गदर्शन केले आहे. हा अंक पूर्वीच्या अन्य अंकाप्रमाणेच आपल्यास आवडेल असा विश्वास आहे.

सदर अंकात ४० व्या वार्षिक अधिवेशनात डॉ. विनायक देशपांडे यांनी दिलेल्या अध्यक्षीय भाषणाचा गोषवारा दिला आहे. त्याच अधिवेशनात डॉ. एच.आर.तिवारी यांनी व्हेब्लेन यांच्या 'The Theory of Leisure Class' या प्रसिद्ध पुस्तकाचा परिचय करून देणारे भाषण दिले होते. त्या भाषणाचा देखील सारांश सदर अंकात देत आहोत. डॉ. सुभाष पाटील यांचा भारतातील आरोग्यविषयक सद्य:स्थिती हा लेख या अंकात अन्तर्भूत केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून तीन लेख या अंकात प्रसिद्ध केले आहे. डॉ. एम.एल.कासारे यांनीDr. Babasaheb Ambedkar's Economic Philosophy' या शीर्षकाखाली डॉ. बाबासाहेबांचे आर्थिक तत्वज्ञान उलगडून दाखविले आहे. डॉ. आंबेडकरांनी एम.ए.पदवीसाठी सादर केलेल्या 'ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ इस्ट इंडिया कंपनी' या शोधप्रबंधिकेवर डॉ. दि.व्यं. जहागिरदार यांनी चिकित्सक पद्धतीने विवेचन केले आहे. 'जमीन सुधारातील जल व्यवस्थापन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर' हा तिसरा लेख डॉ. गौतम कांबळे यांचा असून एका अपरिचित विषयांवर त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या जलपूर्ती विषयक विचारांचा आढावा घेतला आहे.

नोव्हेंबर २०१६ हा महिना केंद्र सरकारच्या विमुद्रीकरणाच्या(Demonetisation) धोरणामुळे संस्मरणीय ठरला. विमुद्रीकरणावर दोन लेख या अंकात प्रसिद्ध केले जात आहेत.

डॉ. उमेश घोडेस्वार यांच्या 'विमुद्रीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था' या लेखात त्यांनी शास्त्रीय पद्धतीने विमुद्रीकरणाची चर्चा केली आह तर प्राचार्य डॉ. वनिता चोरे यांचा 'विमुद्रीकरण : एक आढावा' हा लेख विमुद्रीकरणाचे स्वरूप व त्याचे अनुकूल प्रतिकूल परिणाम स्पष्ट करणारा आहे.

प्रदूषणाचा विचार वेगळ्या संदर्भात करण्याचा प्रयत्न प्रा.धीरज कदम यांनी 'पर्यावरणीय समस्यांच्या संदर्भात आदान-प्रदान विश्लेषण तंत्राचे उपयोजन' या लेखात प्रभावीपणे केला आहे. डॉ. राजश्री रायभोग यांनी 'नाबार्डची ग्रामीण विकासातील विकासात्मक भूमिका : एक टीप' या लेखात थोडक्यात नाबार्डच्या कार्यावर प्रकाश टाकला आहे. सदर अंकात दोन पुस्तकांचे परीक्षण असून पहिले पुस्तक डॉ. वर्षा गंगणे यांचे 'स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव' असून त्याचे परिक्षण डॉ. संगीता टक्कामोरे यांनी केले आहे. डॉ. दि.व्यं.जहागिरदारांच्या 'आर्थिक जगत' (खंड ४) या पुस्तकाचा परिचय डॉ. विवेक चौधरी यांनी करून दिला आहे. अखेरीस विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सचिवांनी २०१५-१६ मध्ये संपन्न झालेल्या ४० व्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत सादर केला आहे.

या अंकाच्या सिद्धतेत सर्व लेखकांनी जे सहकार्य केले त्यांचे आभार मानले पाहिजेत. मात्र हे ही सांगितले पाहिजे की अधिक लेखकांनी आपले लेख अर्थमीमांसेसाठी पाठवावयास हवेत.

या अंकासाठी कॉम्प्यूटर नेटवर्कचे श्री. नरेंद्र पांढरीकरांनी पूर्णपणे सहकार्य केले व सुबक अंक तयार करण्यास मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार.

दिनांक : १२ डिसेंबर २०१६
स्थळ : अमरावती.

**(दि.व्यं.जहागिरदार)**
प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'

# भारतातील अन्नधान्याच्या वाढत्या किंमती : प्रवृत्ति आणि कार्यकारणभाव

**(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे वार्षिक अधिवेशन दिग्रस, जि.यवतमाळ येथे ३० व ३१ जानेवारी २०१६ दरम्यान संपन्न झाले. अध्यक्ष विनायक देशपांडे यांच्या अध्यक्षीय भाषणाचा हा गोषवारा आहे.)**

**विनायक श्रीधर देशपांडे**
प्राध्यापक व विभाग प्रमुख,व्यवसाय व्यवस्थापन विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

**प्रास्ताविक :**

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या चाळीसाव्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी माझी निवड करून माझा आपण जो सन्मान केला, त्याबद्दल सर्वप्रथम मी सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. अर्थशास्त्राच्या प्रश्नांची सैद्धांतिक आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून चर्चा घडवून आणणे व त्याद्वारे अर्थशास्त्रीय विषयक अभ्यासपूर्ण साहित्यनिर्मिती करणे आणि जनसामान्यांचे देखील प्रबोधन करणे या उद्देशानुसार विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने अत्यंत सक्षमपणे आतापावेतो वाटचाल केली आहे.

परिषदेच्या विकासात आजतागायत अनेक व्यक्तींनी आपले मौलिक योगदान दिले आहे. त्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे आद्य कर्तव्य समजतो. अर्थमीमांसाच्या संपादक पदाची जबाबदारी सक्षमपणे सांभाळणारे डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. या परिषदेशी स्थापनेपासून जोडल्या गेले होते ते माझे वडील स्व. डॉ. श्री.आ.देशपांडे यांच्या स्मृतीला मी नम्र अभिवादन करतो. परिषदेच्या हा बहरलेला वृक्ष चिरकाल टिकून राहावा, बहरत राहावा अशी मनोकामना या प्रसंगी व्यक्त करतो.

वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षांनी ताज्या, आर्थिक घडामोडींवर भाष्य करावे अशी प्रथा परिषदेने जोपासली आहे. या अध्यक्षीय भाषणात अन्न धान्याच्या/खाद्यान्नाच्या वाढत्या किंमती/शेतकीस्फिती या विषयावर मी आज भाष्य करणार आहे. कृषी क्षेत्रातील अरिष्टाचा एक पैलू म्हणजे शेतमालाच्या वाढत्या किंमती असून त्याची झळ अर्थव्यवस्थेला पोहचत असल्याने त्याची सर्वंकष चिकित्सा होणे आवश्यक आहे.

उद्योन्मुख अर्थव्यवस्थांमधील इतर राष्ट्रांच्या तुलनेत भारताने सर्वात अधिक अन्नधान्याच्या वाढत्या किंमतींचा अनुभव घेतला आहे. अन्नधान्याच्या किंमतीतील वाढ २००६ ते २०१३ या कालावधीत सरासरी ९ टक्क्याने झाली. गेल्या दशकाच्या तुलनेत या काळात झालेली वाढ जवळपास दुप्पट होती. अन्न धान्याच्या वाढत्या किंमती जनकल्याणावर विपरित परिणाम करतात. ग्रामीण भागात एकूण खर्चाच्या जवळपास ४९ टक्के खर्च अन्नधान्यावर होतो तर शहरी भागात हा खर्च साधारणपणे ३९ टक्के आहे. अती दारिद्र्य असणाऱ्या लोकसंख्येचा विचार केल्यास या वर्गाचा खर्च ६० टक्क्याहून अधिक ग्रामीण भागात होतो तर शहरी भागात अन्न धान्यावरील या वर्गाचा खर्च ५६ टक्के आहे.

वाढीव दरडोई उत्पन्नामुळे अन्नधान्याच्या

किंमतीत वाढ होते असा युक्तीवाद साधारणत: मांडण्यात येतो. आहाराच्या सवयीत झालेल्या बदलांमुळे दुध, अंडी, मांसाहारी पदार्थ आणि मासे यासारख्या उच्च किंमती असलेल्या अन्नपदार्थाकडे लोक वळल्याने भाव फुगवटारूपी दाब अधिक वाढला असे मानण्यात येते. वाढत्या मागणीच्या या पदार्थाचा पुरवठा तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने किंमतीत वाढ होणे अपरिहार्य आहे. मागणी आणि पुरवठा हे घटक अन्नधान्याच्या किंमती वाढण्यास कारणीभूत आहेतच, परंतु वाढता उत्पादन खर्च आणि प्रापण किंमती (Procurement Price) या मुळे देखील गहू, तांदूळासारख्या अन्न धान्याच्या किंमतीत वाढ झाली. पुरवठ्याच्या तुलनेत दूध, भाज्या, मांसाहारी पदार्थ आणि मासे यांच्या मागणीत जोमाने विस्तार झाल्याने तसेच यांच्या उत्पादन खर्चात देखील वाढ झाल्याने या वस्तूंच्या किंमती उसळी मारू लागल्या. डाळीच्या किंमती वाढण्यास उत्पादन खर्च, वाढत्या प्रापण किंमती आणि मागणी–पुरवठ्यातील दरी हे घटक विशेषत: कारणीभूत होते. कृषी क्षेत्रातील वाढत्या मजुरी दरामुळे फळांच्या किंमती वाढीस लागल्या. जागतिक स्तरावरील मुद्रास्फितीमुळे खाद्य तेल आणि साखरेच्या किंमतीत वाढ झाली. साखरेच्या किंमतीत वाढ होण्यास प्रापण किंमती देखील कारणीभूत होत्या.

**उपलब्ध साहित्याचे पुनरावलोकन :**

गेल्या दशकामध्ये जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये अन्नधान्याच्या किंमतीने दोनदा उसळी मारली, आणि किंमती नियंत्रणात आणण्यासाठी विविध देशांतील योजनांची उधळण झाली. नोव्हेंबर २००६ आणि २००८ या दरम्यान महिन्याला अन्न धान्याच्या किंमतीतील वाढ सरासरी ५४.४ टक्के होती तर दुसऱ्यांदा अन्न धान्याच्या किंमती ऑक्टोबर २०१० आणि ऑगस्ट २०११ या कालावधीत झपाट्याने वाढल्या. महिन्याला सरासरी किंमत वाढ या काळात ३३ टक्क्याने झाली.

गेल्या अनेक वर्षापासून विविध अभ्यासकांनी अन्न धान्याच्या वाढत्या किंमतीच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. अन्न धान्याच्या किंमतीतील वाढ–जैव सरपणाच्या मागणी (Bio-fuel Demand), उद्योन्मुख अर्थव्यवस्थांच्या वृद्धी दरात झालेली वाढ, त्यामुळे वाढलेली तीव्र मागणी, साठेबाजी आणि काही अर्थव्यवस्थांमधील व्यापार बंधने आणि वस्तुंच्या वायदा बाजारातील सट्टा यामुळे झाली अशी काही कारणे अभ्यासक दर्शवितात. कालबाह्य इंधनाला पर्याय शोधण्याचे दृष्टीने सबसिडीचा उपयोग करून जैवसरपण उत्पादनाला चालना देण्यात आल्याने अन्नधान्याचे उत्पादन कमी होऊन जैवसरपण उत्पादन वाढीस लागले. यामुळे अन्नधान्य आणि उर्जा शक्ती या दोहोंमध्ये प्रत्यक्ष स्पर्धा सुरू झाली. मिचेल (२००८) यांनी जैवसरपण उत्पादनामुळे अन्न धान्याचे उत्पादन कमी झाले असा निष्कर्ष काढला तर गिलबर्ट (२०१०) यांनी या संदर्भात पुरावे आढळले नाही असे त्यांच्या अभ्यासात नमूद केले. अधिकची तरलता आणि सट्टा हे दोन घटक अन्नधान्याच्या किंमती वाढविण्यास कारणीभूत ठरले असा युक्तीवाद अनेक अभ्यासकांनी केला आहे. कुमार (२०१०) यांनी असे सुचविले की, अन्नधान्याच्या वाढत्या किंमतीस रचनात्मक कारणे आहेत. दरडोई उत्पन्नातील वाढती दरी आणि असमानता अन्नधान्याच्या मागणीत वाढ होण्यास कारणीभूत आहेत असा युक्तीवाद

त्यांनी केला. यासोबतच दरडोई वस्तुंची उपलब्धता कुंठीतावस्थेला पोहचल्याने वाढत्या उत्पन्नाचा परिणाम जास्त किंमत मोजून वस्तूंची मागणी वाढविण्यात झाला आणि गरीब लोकांना देखील त्यांची तुटपुंजी मिळकत अन्नधान्यावर खर्च करावी लागली. गोकर्ण (२०११), बंडारा (२०१३), गुलाटी आणि सैनी (२०१३) यांनी देखील उपभोगातील बदलांचा परिणाम दर्शविला. उष्मांकीय तृणधान्यापासून प्रथिने (Protein) आणि पोषकद्रव्य (Vitamin) असलेल्या आहाराकडे भारतीय वळले. यांत डाळी, दुध, अंडी, मांसाहारी पदार्थ, मासे आणि भाज्या यांचा समावेश होतो. यांच्या वाढत्या मागणीमुळे किंमती वाढीस लागल्या असे या अभ्यासकांनी दर्शविले.

भारतात मुद्रास्फितीचा दर वाढण्यास किमान आधार किंमती देखील जबाबदार आहेत असे काही अभ्यासकांनी दर्शविले आहे. शासन या न्युनतम किंमतींना शेतकऱ्यांचा शेत माल खरेदी करते. शेतकऱ्यांना किफायतशीर भाव मिळून, स्थिर किंमतीचे वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने किमान आधार किंमत घोषित करण्यात येते. तसेच आपद्जन्य विक्रीपासून Distress Sale शेतकऱ्यांना परावृत्त करणे देखील यामुळे शक्य होते. परंतु बाजार किंमतीवर शासनाने घोषित केलेल्या किंमतींचा प्रभाव पडतो. बाजार किंमतींचे निर्धारण होण्यास किमान आधार किंमती सांकेतिक ठरतात. प्रापणाची प्रक्रिया (Procurement) परिणामकारक होण्याचे दृष्टीने बाजार किंमतीपेक्षा आधार किंमती या अधिक जास्त ठेवाव्या लागतात. त्यामुळे आधार किंमती मुद्रास्फितीची परिस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकतात. मिश्रा आणि रॉय (२०१२), भल्ला (२०११) यांच्या अभ्यासावरून असे निदर्शनास येते की, आधार कमिती आणि अन्नधान्याच्या किंमती या दोहोंमध्ये लक्षणीय सहसंबंध असून आधार किंमतीत १० टक्क्याने वाढ झाल्यास ग्राहक किंमत निर्देशांकात ३ टक्के वाढ होते. वाढती राजकोषीय तूट आणि ही तूट भरून काढण्यासाठी वाढणारी तरलता (Liquidity) याचा देखील परिणाम अन्नधान्यांच्या किंमतीवर होतो. २००८ नंतर ग्रामीण मजुरीत झालेल्या वाढीमुळे शेतमालाच्या उत्पादन खर्चात देखील लक्षणीय वाढ झाली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची (MGNREGA) अंमलबजावणी सार्वत्रिक स्तरावर करण्यात आल्यानंतर ग्रामीण मजुरीतील वाढ अधिकच तीव्र झाली. या कायद्यामुळे ग्रामीण मजुरीच्या दराचा न्युनतम स्तर उंचावला. आणि वाढत्या खर्चाचा परिणाम अन्न धान्याच्या किंमती वाढण्यावर झाला. इंधनाच्या किंमतीवरील नियंत्रण टप्प्याटप्प्याने कमी करण्यात आल्याने खते आणि वाहतूक खर्चाकडे वाढत्या इंधन किंमतीचे पारेषण (Transmission) होऊन भारतातील अन्न धान्याच्या किंमती अधिक वाढतील (बंडारा, २०१३)

अन्न धान्याच्या किंमतीत सातत्याने होणारी वाढ आणि उच्च स्तरावर असणाऱ्या किंमती भारतातील मौद्रिक व्यवस्थापनापुढील एक आव्हानच आहे. या संदर्भात अंतरक मुद्रा स्फिती (Core inflation) आणि वस्तूंच्या किंमतीवर आघात करणारी अंतरक मुद्रा स्फितीची दुसरी फेरी या बाबी समजून घेणे आवश्यक आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधील अन्नधान्याच्या किंमतीतील वाढीची गतिशीलता वेगळी असते या बाबत अनेक

पुरावे उपलब्ध आहेत. त्यामुळे मौद्रिक धोरणाच्या संदर्भात अन्न धान्याच्या वाढत्या किंमतींकडे दुर्लक्ष करणे आत्मघातकी ठरू शकेल.

वर्तमान पत्र किंवा इतर माध्यमे मुद्रास्फिती बाबतची आकडेवारी नमूद करतांना घाऊक किंमत निर्देशांक किंवा ग्राहक किंमत निर्देशांक यांचा उल्लेख करतात या सोबतच अंतरक मुद्रा स्फिती (Core inflation) आणि मथळा मुद्रा स्फिती (Head line inflation) समजून घेणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेला ज्या विविध प्रकारच्या भाववाढीचा अनुभव येत असतो त्या सर्व भाववाढीचे मापन मथळा मुद्रा स्फितीत घेण्यात येते. अन्नधान्य, उर्जा यांच्या किंमतीच्या बदलांची दखल मथळा मुद्रास्फितीत घेण्यात येते. अन्नधान्य आणि उर्जा यांच्या किंमती जोमाने वाढू शकतात. परंतु या सोबतच इतर वस्तुंच्या किंमतीची वाढ निम्न स्तरावर राहू शकेल. अर्थव्यवस्थेची वर्तणूक कशी आहे याबाबतची संपूर्ण कल्पना मथळा मुद्रास्फितीच्या माध्यमाने येऊ शकणार नाही. राहणीमानातील बदलाचा अंदाज मात्र मथळा मुद्रास्फितीच्या माध्यमाने घेता येऊ शकतो. अंतर मुद्रास्फिती या संकल्पनेचा उपयोग रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिकाधिक करते. अंतरक मुद्रा स्फितीत चंचलता कमी प्रमाणात राहिल्याने मागणी, पुरवठ्याचा सकल देशीय उत्पादनावर होणारा परिणाम अधिक चांगल्या पद्धतीने तपासता येईल.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मथळा मुद्रास्फितीच्या आकडेवारीवरून निर्णय घेऊ शकत नाही. पुरवठाबाजूच्या घटकांचा देखील यात अंतर्भाव होतो हे घटक तात्पुरत्या आणि चंचल स्वरूपाचे असतात. तेलजन्य आणि तेलाच्या किंमतीत २०१० साली झालेली वाढ आणि २००९ सालचा दुष्काळ ही उदाहरणे या संदर्भातील आहेत. या घटकांचा होणारा परिणाम बाजूला ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक अंतरक मुद्रा स्फिती या संकल्पनेचा उपयोग धोरण आखतांना करते.

अन्न धान्याची किंमत वाढ ही खरी समस्या असतांना धोरणात्मक दरांच्या माध्यमाने या किंमतीवर नियंत्रण कसे आणता येईल? अंतरक ग्राहक किंमत निर्देशांक (Core CPI) ज्यात अन्न धान्य आणि उर्जेचा समावेश होत नाही तरी ग्राहक किंमत निर्देशांक मोठ्या प्रमाणावरील भाववाढ दर्शवितो. अन्न धान्याच्या किंमतींवर नियंत्रण आणण्यात रिझर्व्ह बँकेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकते.

**अन्नधान्याच्या किंमतीची भाववाढीतील भूमिका :**

मथळा मुद्रास्फिती एप्रिल २०१२ ते जानेवारी २०१४ दरम्यान दुहेरी अंकातच होती. ग्राहक किंमत निर्देशांकात अन्न धान्य किंमतीचा भारांक ४७.६ टक्के असून मथळा मुद्रास्फितीत सर्वात जास्त हिस्सा अन्न धान्यांच्या किंमतीचा होता. वाढणाऱ्या अन्न धान्याच्या किंमतीच्या तुलनेत घरकुलांचा उपभोग खर्चातील अन्नधान्याच्या खर्चाचा हिस्सा फार कमी प्रमाणात घसरला याचाच अर्थ किंमती बदलच्या तुलनेत मागणी ची तुलनात्मक लवचिकता कमी आहे. ग्रामीण भागात एकंदर उपभोगाचे प्रमाण कमी झाले असून देखील दरडोई वास्तविक अन्नधान्याच्या उपभोगात वाढ झाली. आहाराच्या रचनेत पोषक द्रव्य (Protein) असलेल्या पदार्थाकडे उपभोग प्रवृत्ति बदलत असल्याचे दिसते. यामुळे सद्य:स्थितीत वाढत्या अन्न धान्याच्या किंमतीसाठी या घटकाचे देखील

महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**शेतीचा वाढता खर्च :**

शेतीविषयक सामग्रीच्या किंमतीत २००८-०९ पासून झालेली वाढ देखील लक्षणीय होती. अन्नधान्याच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या मजुरीचा एकंदर सामग्रीच्या किंमतीत अत्यंत महत्त्वाचा वाटा होता. गेल्या ५ ते ७ वर्षाच्या कालावधीत नामित मजुरीतील वाढ अधिकच जास्त प्रमाणात होती.

**तक्ता क्र. १**

**शेतीविषयक निवडक सामग्रीच्या किंमतीतील वाढ**

**(वार्षिक सरासरी, टक्केवारी)**

| | २००४-०५ ते २००७-०८ | २००८-०९ ते २०१२-१३ |
|---|---|---|
| खाद्य पदार्थ | ७.३ | ११.४ |
| रासायनिक खते आणि कीटकनाशक | १.७ | ७.८ |
| वैरण (चारा) | १.३ | १९.५ |
| पशूखाद्य | १२.२ | १०.२ |
| डिझेल | ४.५ | ८.० |
| विद्युत (कृषीविषयक) | २.३ | ८.७ |
| ट्रॅक्टर्स | ३.६ | ५.४ |
| मजुरी (सरासरी) | ६.२ | १७.३ |

स्रोत : वाणिज्य मंत्रालय, श्रम मंत्रालय

भारतीय श्रमिक निर्वाह वेतनावर काम करतात. वाढत्या अन्न धान्याच्या किंमती मजुरीच्या दरावर परिणाम करतात अशी परिस्थिती २००७ पूर्वी असल्याबाबतचा पुरावा आढळतो. वर्ष २००७ नंतर मात्र अर्थमितीच्या चांचण्या मजूरी दरापासून किंमतीत वाढ असा कार्यकारण संबंध दर्शवितात. (रघुराम जी. राजन : फाईटिंग इन्फ्लेशन, FIMMDA च्या अधिवेशनातील व्याख्यान) त्यामुळे अन्न धान्याच्या किंमतीत वाढ होण्यास ग्रामीण मजुरीच्या दराची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

महात्मा गांधी नॅशनल रूरल एम्प्लायमेंट गॅरंटी ॲक्ट पारीत झाल्यामुळे ग्रामीण श्रमिकांची सौदा शक्ति वाढली असावी परंतु ग्रामीण मजुरीच्या दरात वाढ होण्यास मनरेगा तितकासा निर्णायक घटक नाही. परंतु प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मनरेगाचा परिणाम ग्रामीण भागातील मजुरीवर होणारच. ग्रामीण श्रमिक बांधकामाकडे वळत असल्याने आणि बिगरशेती क्षेत्रात काम करीत असल्याने कृषि क्षेत्रातील मजुरांची संख्या कमी झाल्याने देखील ग्रामीण श्रमिकांच्या मजुरीत वाढ होत असल्याचे दिसते. एकूण कृषी श्रमिकांच्या संख्येत २००४-०५ साली असलेल्या २.५९ लाखा पासून २०११-१२ साली २.३१ लाखापर्यंत घट झाली. कृषिक्षेत्रात १९९९-२००० साली असलेला ६० टक्के रोजगार आता ५० टक्क्यापेक्षा कमी झाला आहे.

**तक्ता क्र. २**

**क्षेत्र निहाय रोजगारातील वाटा**

| क्षेत्र | १९९९-२००० | २००४-०५ | २००९-१० | २०११-१२ |
|---|---|---|---|---|
| कृषी | ६० | ५७ | ५३ | ४९ |
| द्वितीय क्षेत्र बांधकाम वगळून* | १२ | १३ | १२ | १४ |
| बांधकाम | ४ | ६ | १० | ११ |
| सेवा | २४ | २५ | २५ | २७ |
| एकूण | १०० | १०० | १०० | १०० |

* यात निर्माणक, खाणकाम आणि दगड उद्योग, विद्यूत आणि पाणी पुरवठा यांचा समावेश होतो.
स्त्रोत : एन.एस.एस.ओ. आणि १२ वी योजना दस्तऐवज

कृषी क्षेत्रात श्रमिकांचा तुटवडा ही या क्षेत्राची इतर अनेक समस्यांपैकी अत्यंत गहन समस्या झाली आहे. यामुळेच श्रमिकांची मजुरी वाढली असून खर्चापेक्षा कमी स्तरावर कृषी माल विकणे म्हणजे शेतकऱ्यांचे अस्तित्वच धोक्यात येण्यासारखे आहे. शेतजमिनीचा लहान आकार हा देखील कृषी क्षेत्राचा कळीचा मुद्दा झाला आहे. शेतीचे आधुनिकीकरण करण्यास यामुळे अडचणी येत असून सध्याचा शेत जमिनीचा आकार स्वयंनिर्वाही (viable) नाही. अर्थात काही भागांमध्ये वाढत्या श्रमिक मजुरीमुळे शेतीचे यांत्रिकीकरण जोमाने झाले ही बाब देखील दुर्लक्षित करता येणार नाही. ट्रॅक्टर्सच्या विक्रीत देखील भरमसाठ वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

अन्नधान्याच्या किंमती राजकीय परिप्रेक्षातून बघितल्यास घाऊक किंमत निर्देशांकाच्या तुलनेत अन्नधान्याची भाववाढ एन.डी.ए. च्या काळात कमी प्रमाणात होती. यु.पी.ए.-१ च्या राजवटीत सर्वसाधारण भाववाढीपेक्षा अन्न धान्याच्या किंमती नियंत्रणात होत्या. मात्र यु.पी.ए.-२ च्या कारकिर्दीत अन्न धान्याच्या किंमतींनी उसळी मारली. खाद्यान्नाच्या किंमतीचा विचार करतांना खाद्यान्न वस्तु (Food Articles) आणि खाद्यान्न पदार्थ (नैसर्गिक प्रक्रियेच्या माध्यमाने उत्पादित) (Food Products) अशा दोन भागामध्ये वर्गीकरण करावे लागेल. गेल्या तीन वर्षात सर्वसाधारण अन्नधान्याच्या संदर्भातील मुद्रास्फिती १०.३ टक्के होती यांतील खाद्यान्न वस्तुंच्या भाववाढीचा हिस्सा १२.२ टक्के तर खाद्यान्न पदार्थाची भाववाढ ७ टक्क्याने झाली. याचाच परिणाम म्हणजे ग्राहक किंमत निर्देशांक ११.५ टक्क्यांची मुद्रास्फिती २०११-१२ ते २०१३-१४ या दरम्यान दर्शवित होता तर घाऊक किंमत निर्देशांक ८.७ टक्के होता.

घाऊक किंमत निर्देशांक आणि ग्राहक किंमत निर्देशांक यात समाविष्ट होणाऱ्या वस्तुंचा भारांक भिन्न असतो. घा.किं. नि. देशांतर्गत बाजारपेठेत होणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तु व्यवहारांना समाविष्ट करण्याच्या उद्देशाने मापन करण्यात येतो अर्थव्यवस्थेमध्ये चालणाऱ्या घाऊक/ठोक व्यवहारांमध्ये विविध वस्तुंचे व्यवहार होत असून या व्यवहारात विशिष्ट वस्तूंच्या व्यवहारांच्या प्रमाणावर भारांक निश्चित करण्यात येतो. ग्रा.किं.नि. भारांक

सरासरी मासिक सेवन खर्चाच्या आधारे काढण्यात येतो. या निर्देशांकात ग्राहक सेवन करीत असलेल्या सर्वच प्रकारच्या वस्तूंचा समावेश करण्याचा प्रयत्न होतो. ग्राहक किंमत निर्देशांकात सर्वात जास्त भारांक अन्नधान्याशी संबंधित वस्तुंना देण्यात येतो, जो सध्या ५४.२ टक्के आहे. घाऊक किंमत निर्देशांकात याच वस्तुंना देण्यात येणारा भारांक १४.३ टक्के आहे. त्यामुळे उच्च स्तरावर असलेल्या अन्नधान्याच्या किंमतीचा फटका सर्व देशाला बसत असतांना मात्र निर्देशांकावर विशेष परिणाम होतांना दिसत नाही.

ग्राहकांच्या विविध अन्नधान्याच्या वस्तुंच्या सेवनानुसार ग्राहक किंमत निर्देशांकाच्या भारांकात वेळोवेळी बदल होतो. डाळीच्या वाढणाऱ्या किंमतीचा परिणाम ग्राहक किंमत निर्देशांक वाढण्यावर होईल. परंतु या भाववाढीमुळे डाळीचे सेवन कमी झाल्यास निर्देशांकात वाढ दिसणार नाही. सध्याच्या ग्रा.किं. नि. मधील खाद्यान्न समुच्चया (Food Basket) मध्ये सर्वात जास्त भारांक दुध आणि दुग्धजन्य पदार्थ, भाज्या, तयार जेवण, मांसाहारी पदार्थ आणि मासे, साखर आणि मसाले या पदार्थांना देण्यात आल्याने आणि डाळीला देण्यात येणारा भारांक कमी असल्याने (डाळीचे एकूण सेवनातील प्रमाण कमी असल्याने) त्याच्या वाढणाऱ्या किंमतीचा परिणाम एकंदर ग्राहक किंमत निर्देशांकावर दिसत नाही.

ग्राहक किंमत निर्देशांकाच्या एकूण भारांकाच्या आधारे असे लक्षात येते की, उपभोग्य वस्तुमध्ये खाद्यान्नावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण जवळपास ५० टक्के आहे. घाऊक किंमत निर्देशांकामध्ये इतर सर्वच वस्तुंचा समावेश होत असल्याने खाद्यान्नाचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. अन्नधान्याच्या किंमतीत होणारी वाढ मुख्यत्वे करून नाशिवंत आणि उच्च मूल्य वस्तुमुळे होत असल्याचे आढळते. उत्पन्न वाढीचा परिणाम पोषक आणि प्रथिनयुक्त पदार्थाच्या सेवनावर होतो. फळे आणि भाज्या, दुध, अंडी आणि मांसाहारी पदार्थ याकडे उपभोक्ता वळतो. अन्नधान्याच्या या विभागाची पुरवठा बाजू तितकीशी सक्षम नसल्याने किंमत वाढीचा विपरित परिणाम या वस्तुंवर होतो.

शेतकीस्फिती (Agflation) निर्माण होण्यास मुख्यत्वे करून खालील घटक कारणीभूत आहेत.

- ✲ उत्पादन खर्चात झालेली वाढ : मजुरीच्या दरात झालेली ४० टक्के वाढ शेतकीस्फितीस जबाबदार आहे. गेल्या ३० वर्षाच्या कालावधीत इतक्या मोठ्या प्रमाणात मजुरी दरात वाढ झाली नव्हती. शेतीची काम करण्यास मजूर उपलब्ध नसल्याने मजुरीचा दर सातत्याने वाढतो आहे.
- ✲ जागतिकीकरण : वैश्विक स्तरावर अन्नधान्याच्या किंमती वाढत असून देशी कृषी व्यवसायाला वैश्विक स्वरूप प्राप्त होत असल्याचे दिसते.
- ✲ राजकोषीय आणि मौद्रिक धोरणे : वाढती तूट आणि पैशाच्या पुरवठ्यात होत असलेली वाढ यामुळे देखील शेतकीस्फिती निर्माण झाली. अन्नधान्याच्या किंमतीत होणाऱ्या वाढीस या घटकांचा परिणाम ९९ टक्क्याचा आहे. असे अर्थमितिचे तंत्र वापरून दर्शविण्यात येते.

**खाद्यान्नाच्या वाढत्या किंमती महत्त्वपूर्ण का?**

भारताच्या संदर्भात खाद्यान्नाच्या वाढत्या

किंमतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याचे कारण घरकुलांच्या एकूण खर्चात अन्नधान्याचा वाटा बराच जास्त आहे. उत्पन्नाच्या जवळपास ४० ते ७५ टक्के हिस्सा लोक अन्नधान्यावर खर्च करतात. शेतकीस्फितीशी मुद्रास्फितीचे अंदाज जोडण्यात येत असल्याने अन्न धान्याच्या किंमती वाढल्या की साधारण भाववाढ होणार असा अंदाज लोक बांधतात. मुद्रास्फितीचे हे अंदाज मजुरीच्या दरात वाढ घडवून आणू शकतात. भारताच्या बाबतीत अन्नधान्याच्या वाढत्या किंमतीस मागणी बाजू देखील जबाबदार आहे. प्रतिस्तापन योजनांची लवचिकता (Elasticity of Substitution) भारताच्या बाबतीत अत्यंत कमी असल्याने भारतासारख्या देशात वेगळ्या प्रकारच्या धोरणांचा अवलंब करणे आवश्यक आहे. अन्न धान्याच्या किंमती संक्रमणकालीन असल्याने आणि त्याचे स्वरूप पैशाव्यतिरिक्त (Non-monetary) असल्याने रिझर्व्ह बँकेने चिंता करण्याची गरज नाही असा युक्तिवाद करण्यात येतो. परंतु भारतातील बाजारयंत्रणा पतसंरोधामुळे (Credit constraint) परिपूर्ण नाही हे देखील ध्यानात घेणे गरजेचे आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये घरकुलांचा अन्नधान्यावरील होणाऱ्या खर्चाचा वाटा प्रगत देशांच्या तुलनेत अतिशय जास्त आहे.

उदयोन्मुख राष्ट्रांचा अन्नधान्यावरील खर्च प्रगत राष्ट्रांपेक्षा बराच जास्त आहे. मात्र औपचारिक स्वरूपाच्या वित्त पुरवठा सोयी मात्र उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये त्या प्रमाणात विकसित झाल्या नाही.

वित्तीय घर्षण, घरकुलांच्या एकूण उपभोगातील खाद्यान्नाचा वाढता हिस्सा, प्रतिवस्तू योजनांची अल्पलवचिकता (low elasticity of substitution) यामुळे वाढत्या किंमती दुर्लक्षित करणे रिझर्व्ह बँकेला कल्याण महत्तम करणे हे उदिष्ट असल्यास परवडण्यासारखे नाही. रिझर्व्ह बँकेच्या भूमिकेच्या संदर्भात मथळा मुद्रास्फिती घा.किं.नि. (Headline Inflation WPI) आणि अंतरक किंवा गाभा मुद्रास्फिती घा.किं.नि. यातील परस्पर संबंध लक्षात घेणे आवश्यक आहे. सुरूवातीला नमूद केल्याप्रमाणे मथळा मुद्रास्फिती घा.किं.नि. सर्व प्रकारच्या घटकांचा समावेश करून प्राप्त होतो. यात प्राथमिक, इंधन आणि निर्माणी क्षेत्रातील वस्तुंच्या किंमतींचा अंतर्भाव करण्यात येतो. अंतरक किंवा गाभा म्हणजे अन्नधान्य आणि इंधनाचा भाग वगळून काढलेला निर्देशांक.

मथळा मुद्रास्फितीचा प्रवास गाभा मुद्रास्फितीकडे होतो की गाभा मुद्रास्फिती मुळे मथळा मुद्रास्फिती अधिक वाढीस लागते हे जाणून घेणे मौद्रिक धोरणासाठी आवश्यक आहे. मथळा मुद्रास्फिती गाभा मुद्रास्फितीवर परिणाम करीत नसल्यास अन्नधान्याच्या संबंधातील धक्के सातत्याने होत राहतील यामुळे दुसऱ्या फेरीचे परिणाम मोठ्या प्रमाणावर होतील. याचाच अर्थ मौद्रिक धोरणाने मथळा स्फितीवर अधिकाधिक लक्ष केंद्रीत करावे असा होतो.

**तक्ता क्र. ३**

**घाऊक किंमत निर्देशांक**

| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|---|
| सर्व वस्तू | ६.५१ | ४.८२ | ८.०३ | ३.५७ | ८.४ | ९.३ |
| खाद्यान्न | ७.९९ | ५.९७ | ९.०७ | १५.३ | १५.६ | ११.१६ |

स्त्रोत : Office of the Economic Adviser, Ministry of Commerce & Industry, GOI.

उपरोक्त तक्त्यावरून अन्न धान्याच्या किंमती प्रत्यक्ष सकल मुद्रास्फितीच्या तुलनेत किती झपाट्याने वाढता आहे याचा अंदाज येतो.

वाढत्या अन्नधान्याच्या किंमतीमुळे शेतकरी लाभान्वित होतो का? याचे देखील विश्लेषण करणे आवश्यक आहे. देवाणघेवाण खर्चात (transaction cost) होणारी वाढ स्फितीची स्थिती निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकते. शेतकरी आणि ग्राहक या दोहोंतील दरी कमी करण्यासाठी ए.पी.एम.सी. सारख्या संस्था उभारण्यात आल्या. परंतु ए.पी.एम.सी. च्या माध्यमाने होणाऱ्या व्यवहारांमुळे शेतकऱ्याला फायदा होऊ शकला नाही. पुरवठा श्रृंखला व्यवस्थापनाचे आणि भारतातील कृषी व्यवसायापुढील आव्हानांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल.

१) विनियमित बाजारात सुलभतेचा अभाव

२) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (APMC) कायद्यात स्पर्धात्मकतेचा अभाव आणि

३) राष्ट्रीय स्तरावर सामायिक कृषी बाजाराचा अभाव.

**समारोप :**

अन्नधान्याच्या वाढत्या किंमती सध्या भारतातील एक कळीचा मुद्दा आहे. खाद्यान्नाच्या घाऊक किंमती वाढत असून किरकोळ बाजारातील अन्नधान्याच्या खाद्यान्नाच्या किंमती त्याहून अधिक जोमाने वाढीस लागल्या आहेत. बिगर-अन्न धान्याच्या मुद्रास्फितीच्या दराच्या तुलनेत खाद्यान्नाच्या किंमतीतील वाढ बरीच जास्त आहे. नाशवंत वस्तुंच्या किंमतीतील वाढ इतर अनेक वस्तुंच्या तुलनेत उच्च स्तरावर आहेत. इलेक्ट्रॉनिक-व्यापार (e-commerce) अशा ताजा क्षेत्राकडे अजून वळलेला दिसत नाही. केळी, सफरचंद, द्राक्षे या बाबतीत पुरवठा श्रृंखला परिणामकारकरित्या कार्यरत असून भाज्यांच्या बाबतीत अशी पुरवठा श्रृंखला अस्तित्वात नाही. महाग्रेप सारख्या यशस्वी संस्थात्मक रचनेमुळे वैश्विक स्तरावर देखील मूल्य वर्धीत पुरवठा श्रृंखला निर्माण होऊ शकली. नाशवंत वस्तूंची मागणी जास्त असून बाजारातील अपुऱ्या आधारभूत संरचनेमुळे पुरवठ्यावर निर्बंध येतात. शितगृहांची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर उभारल्यास पुरवठा श्रृंखला व्यवस्थापन अधिक योग्यरित्या होऊ शकेल. शेतीचे यांत्रिकीकरण झाल्यास उत्पादकतेत वाढ होण्याची संभावना आहे, परंतु जमिनीचा लहान आकार ही देखील चिंतेची बाब आहे. वाढत्या मजुरी दरामुळे शेतीचे यांत्रिकीकरण जोमाने होत असल्याचे देखील निदर्शनास येते. खाद्यान्नामधील अन्न धान्याच्या किंमती काही प्रमाणात नियंत्रणात असल्या तरी इतर वस्तूंच्या वाढत्या किंमतीवर राजकोषीय आणि मौद्रिक धोरणाच्या माध्यमाने नियंत्रण आणणे काळाची गरज आहे.

## संदर्भ सूची :


1. Bhattacharya Rudrani and Abhijit Sen Gupta (June 2015) Food Inflation India : Causes and Consequences, Working Paper No. 2015-151. National Institute of Public Finance and Policy, New Delhi.
2. Hatekar Neeraj and Patnaik Anuradha (January 2, 2016) CPI to WPI causation : Empirical Analysis of Price Indices in India. Economic and Public Weekly, Vol. LI No. 1.
3. Gulati Ashok (Jn 15. 2015) 'Talk and Panel Discussion of Food Inflation : Diagnosis and Remedies, ICRIER.
4. Sasmal Joydeb (June, 2015) 'Food Price Inflation in India : The growing economy with sluggish agriculture'. Journal of Economics, Finance and Administrative Science. Vol. 20, issue 38.
5. Anand Rahul and Volodymyr Tulin, IMF (25th Feb. 2014). NIPFP http://microfinance.nipfp.org.org.in/meet.Food Inflation : The role of monetary policy in India.
6. Tomar Neha (July, 2013) 'APMC Act in India : Rising food inflation a Decade story' International Journal of Social Science and Interdisciplinary Research. USSIR. Vol. 2(7)
7. Mitchell, Donald (2008) :A Note on Rising Food Prices" Policy Research Working Paper Series 4682, The World Bank.
8. Gilbert, Christopher L. (2010a). "How to understand high food prices?" Journal of Agricultureal Economics, 61(2) 398-425.
9. Kumar Rajiv, Vashist Pankaj and Kolita Gunajit (2010) "Food Inflation : Contingent and Structural Factors". Economic and Political Weekly 45(10); 16-19.
10. Gokarn Subir (2011) : "The Price of Protein". Macroeconomics and Finance in emerging Market Economics 4(2); 327-335.
11. Bandara Jayatilleke S. (2013) :"What is driving India's Food Inflation ? A survey of Recent Evidence". South Asia Economic Journal 14(1), 127-156.
12. Gulati Ashok and Saini Shweta (2013) : "Taming Food Inflation in India". Commission for Agricultural Costs and Prices Discussion Paper No. 4.
13. Mishra Prachi and Roy Devesh (2012) : "Explaining Inflation in India : The Role of food Prices", India Policy Forum, 8, 139-224.
14. Bhalla Surjit S. Choudhary Ankur and Mohan Nikhil (2011) : "Indian Inflation: Populism, Politics and Procurement Prices", Developing Trends : Oxus Research Report.


◆◆◆

# थॉर्स्टन व्हेब्लेन यांचे ''द थिअरी ऑफ लीझर क्लास''

**एच.आर.तिवारी**
प्राचार्य, आप्पास्वामी महाविद्यालय,
शेंदुरजना (अढाव), जि.वाशिम.

(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनात दि. ३१ जाने. २०१६ रोजी ''आर्थिक ग्रंथातील विचार विश्व'' या मालेतील चतुर्थ पुष्प डॉ. तिवारी एच्.आर. यांनी गुंफले. त्यांच्या भाषणावर आधारित लेख)

**प्रस्तावना :**

थॉर्स्टाइन व्हेब्लेन यांचा जन्म २० जुलै १८५७ मध्ये मॅनिटोवॉक काऊंटी, विस्कॉन्सिन, अमेरिका येथे झाला. मुळचे नार्वेचे असलेले व्हेब्लेन शाळेत जाईपर्यंत इंग्रजी शिकलेच नव्हते व आयुष्यभर ते विशिष्ट हेल काढून इंग्रजी बोलत असत. त्यांचे वडील थॉमस ॲन्डरसन व आई कॅरी यांना १२ अपत्य होती. त्यातील व्हेब्लेन हे ६ वे अपत्य. त्यांचे वडील १८४७ मध्ये नार्वे देशातून अमेरिकेत स्थलांतरी झाले होते. मिनेसोटातील कार्लटन कॉलेजातून ते ३ वर्षात पदवीधर झाले. यामुळे ते बुद्धीमान विद्यार्थी असल्याचे सिद्ध झाले. प्रस्थापित कल्पनांच्या बराबरीत ते व्यक्ती स्वातंत्रवादी उपहासगर्भ टीकाकार होते व त्यावर ते तोंडसुख घेत असत. तत्वज्ञानाच्या अध्ययनासाठी ते जॉन्स हॉपकिन्स व येल विद्यापीठात गेले व येल विद्यापीठातून त्यांनी १८८४ मध्ये"Ethical Grounds of a Doctrine of Retribution" या विषयावर पीएच्.डी. पदवी प्राप्त केले. येल विद्यापीठातच त्यांनी दर्शनशास्त्र अध्यात्मविद्या (Metaphysics) आणि मानसशास्त्र या विषयाचे गहन अध्ययन केले. प्रसिद्ध जर्मन दार्शनिक इमानयुल कान्ट, हरबर्ट स्पेन्सर तसेच नौह पोर्टर आणि विलियम ग्राहम समनर यांचा विचारांचा व्हेब्लेनवर गहन प्रभाव पडला. कार्ल मार्क्स, जॉन डेव्हे व डार्वीन यांचा विचारांचाही त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात प्रभाव आढळून येतो.

येल विद्यापीठ सोडल्यानंतर त्यांना कोणतेही काम न मिळाल्याने जवळ-जवळ ७ वर्षे बेरोजगार राहावे लागले. १८८० मध्ये त्यांनी त्यांच्या कार्टेन कॉलेजची सहपाठीनी एलेन रॉल्फ या श्रीमंत व प्रभावशाली कुटुंबातील मुलीसोबत विवाह केला. १८९० मध्ये त्यांनी कार्लेन विद्यापीठात पुन्हा विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला. तेथेच त्यांची भेट प्रो. लॉरेन्स लॉफलीन यांच्याशी झाली. लॉफलीन व्हेब्लेनच्या बुद्धमत्तेमुळे प्रभावित झाले व त्यामुळे त्यांना तेथे शिक्षणासाठी शिष्यवृत्ती प्राप्त झाली. १८९२ नव्याने स्थापन झालेल्या शिकागो विद्यापीठात लॉफलीन यांना अर्थशास्त्राचे विभाग प्रमुख पद प्राप्त झाले. तेव्हा त्यांनी व्हेब्लेन यांनाही अर्थशास्त्राचे फेलो म्हणून आपल्याबरोबर शिकागोला नेले. तेथे व्हेब्लेन ३९ व्या वर्षी इन्स्ट्रक्टर पदापर्यंतच पोहचले. इ.स. १८९२ मध्ये स्थापन झालेल्या Journal of Political Economy या प्रसिद्ध संशोधन पत्रिकेचे ते जवळ जवळ १० वर्ष संपादक राहिले. याच संशोधन पत्रिकेत त्यांनी खालील ३ आर्टिकल्स प्रकाशित केले.1. The beginning of Ownership 2. The

Barbarian Status of Women 3. The instinct of Workmanship and the Irksomeness of Labour (1898-1899). या तीनही लेखांचे संकलन म्हणजेच " The Theory of the Leisure Class : An Economic Study in the Evolution of Institution (1899)" हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथाची पृष्ठ संख्या २५८ एवढी होती व मॅकमिलन प्रकाशनाने ते प्रकाशित केले होते. या ग्रंथाला सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जॉन केनेथ गालब्रेथ यांची प्रस्तावना लाभली. ग्रंथाच्या प्रस्तावनेत गालब्रेथ म्हणतात ''एकोणाविसाव्या शतकातील केवळ दोनच अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांची पुस्तके आजही वाचली जातात. ती म्हणजे हेनरी जॉर्जचे "Progress and Poverty" व दुसरे म्हणजे "The Theory of the Leisure Class : An Economic Study in the Evolution of Institution" याच प्रस्तावनेत ते म्हणतात,''व्हेब्लेन यांचे हे पुस्तक ज्यांनी किमान एकदाही वाचले नाही त्यांनी खऱ्या अर्थाने काहीही वाचलेले नाही.'' या ग्रंथात व्हेब्लेन यांनी संपत्ती स्वामीत्वाचा मानवी वागणुकीवर होणारा परिणाम अत्यंत हुशारीने वास्तव स्वरूपात अभिव्यक्त केला आहे.

व्हेब्लेन हे एक थोर समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ व विशेषत्वाने अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी त्यांच्या अनुभवातून व चौफेर अशा सूक्ष्मनिरीक्षणातून विलासात रममाण असणाऱ्या व कोणतेही उत्पादक कार्य न करणाऱ्या चैनीचे जीवन जगणाऱ्या रिकामटेकड्या वर्गाचे यथार्थ चित्रण केले आहे. वेलस्ली सी.मिचेल त्यांच्याबद्दल म्हणतात की,''ते दुसऱ्या जगातून आलेले पाहुणे होते. सभोवतालच्या जुलूमशाही स्थितीत त्यांच्यासारखी बेडर व्यक्ती आणि त्यांच्यासारखे जिज्ञासाचे क्षेत्र व्यापक करणारा आजही अन्य कुणीही आढळत नाही.'' सी.राईट मिल्स म्हणतात की,''The best critic of America that America has never produce". त्यांचे उपहास गर्भ लेखन तत्कालीन सधन अमेरिकन समाजाला रूचले नाही. त्यांच्या मते व्हेब्लेनच्या बालपणात त्यांच्यावर जो नार्व्हेजीयन अमेरिकन समाजाचा नकारात्मक परिणाम झाला त्याचाच परिणाम म्हणजे हा ग्रंथ होय. व्हेब्लेन यांच्या ग्रंथावर टीकेचे मोहोळ उठले. अनेक विचारवंतांनी या ग्रंथाला निराशाजनक, खोली नसलेला उथळ ग्रंथ असे मानण्यात धन्यता मानले. परंतु या ग्रंथाचे ज्यांनी सुक्ष्म अध्ययन केले त्यांना व्हेब्लेन हे केवळ समाजशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञच नव्हते तर ते संस्थात्मक अर्थशास्त्राचे जन्मदाते होते हे आढळून आले.

हा ग्रंथ म्हणजे मानवाच्या सामाजिक व आर्थिक संस्थांच्या उत्क्रांतीची उत्कृष्ट अभिव्यक्ती होय, ज्यामुळे समाजाची जडणघडण होत असते. वस्तू व सेवांचे उत्पादन हे केवळ समाजाच्या भौतिक गरजा भागविण्याचे व उपजिवीकेचे साधन नसून ते उत्पादन साधनांच्या मालकांना भरमसाठ नफा मिळून देण्याचेही एक साधन असते यातूनच मालकवर्ग श्रमिकांचे शोषण करून संपत्तीचा मोठ्या प्रमाणात संग्रह करतात. दुसऱ्या औद्योगिक क्रांतीमुळे तर आर्थिक शोषणात व संपत्ती संग्रहणात प्रचंड वाढ झालेली दिसून येते.

''द थिअरी ऑफ लीझर क्लास'' या ग्रंथात व्हेब्लेन यांनी एकूण १४ प्रकरणे लिहिली आहेत. पहिल्या प्रस्तावना या प्रकरणात त्यांनी मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीचा आढावा घेतला

आहे. प्रारंभी मानव शांततापूर्ण जीवन जगत होता. परंतु पुढे स्वार्थीवृत्ती व बळी तो कानपिळी यातून मानव रानटी अवस्थेत अत्यंत हिंसक युद्धखोर बनला. ज्याच्याजवळ शक्ती तोच महाबली असा सन्मान प्राप्त होऊ लागला. "Honorable is Formidable" म्हणजेच महाबली म्हणजेच सन्माननीय "Worthy is Prepotent" म्हणजेच संपत्तीवान व शक्तीशाली तोच प्रतिष्ठीत मानले जावू लागले. "Labour becomes Irksome" म्हणजेच कष्टाचे काम हे कंटाळवाने व किळसवाने व तिरस्करणीय मानले जावू लागले. "Possessor is a success" म्हणजेच स्वामित्व असणे हेच यशाचे लक्षण या वृत्तीतून लूट, शोषण, दरोडेखोरी, बळजबरीने शत्रुच्या पत्नीला पळवून आणणे अशा प्रकारची अमानुष वागणूक करू लागला. दुसऱ्या औद्योगिक क्रांतीकाळात (१८६०-१९१४) भांडवल संचय ठराविक वर्गाकडे केंद्रीत होवून नव श्रीमंत वर्गाचा उदय झाला.

पिक्युनिअरी एम्युलेशन म्हणजेच धनविषयक ईर्षा व स्पर्धा या दुसऱ्या प्रकरणात व्हेब्लेन यांनी हे स्पष्ट केले की, संपत्ती व पैसा मिळविण्याच्या पराकोटीच्या ईर्षेने व ती स्वत:च्या ताब्यात ठेवण्याच्या ईर्षेने खाजगी मालमत्ता ही एक बळकट संस्थाच समाजात निर्माण झाली व ती समाज व्यवस्थेचा एक अंगभूत घटक बनली. व्हेब्लेन म्हणतात की, "The Possession of Wealth Conforms Honor, It is a invidious distinction" म्हणजेच संपत्ती स्वामित्वातून सन्मान प्रातीची हमखास खात्री होती. यातूनच द्वेषमूलक वर्गभेद निर्माण झाला. संपत्ती तसेच पुरूष व स्त्रियांवरील हक्काचे तीन लाभ मानले जात. १. वर्चस्व गाजविणे व जुलूम करणे ही नैसर्गिक मानवी प्रवृत्ती त्यातून पूर्ण होत असे. २. अशी संपत्ती बाळगणाऱ्या मालकांचा पराक्रम त्यातून सिद्ध होत असे. ३. गुलाम स्त्रि-पुरूषांच्या सेवेची संधी सुद्धा त्यातून प्राप्त होत असे.

कॉन्सीक्युअस कॉन्स्पिक्युअस लिझर (Conspicuous Leisure) म्हणजेच ध्यानाकर्षी, प्रदर्शनकारी व सुस्पष्टपणे आढळणारा रिकामटेकडेपणा या तीसऱ्या प्रकरणात व्हेब्लेन म्हणतात की, आळसात जगणारे व विलासी जीवनाचे स्वामी सर्व सामान्यांना फारच उदात्त वाटत असत व त्यांना समाजात सन्मानही लाभत असे. किळसवाण्या शारीरिक श्रमापासून अलिप्त राहणे हे सभ्यतेचे व सन्मानाचे प्रतिक ठरले होते. रिकामटेकडेपणा म्हणजे आळस किंवा सुस्ती नसून कोणतेही उत्पादक कार्य न करता उपभोगात व विलासात वेळ घालविणे होय. कॉन्स्पिक्युअस लिझर म्हणजे "Non Productive Consumption of time" अर्थात वेळेचा अनुत्पादक उपभोग होय. यालाच वेळेचा अपव्यय असेही म्हणता येईल. कुशल कामगारांचा ताफा सेवक म्हणून पदरी बाळगणे हे मोठेपण मिरविण्याचे एक साधन बनले होते. स्त्री ही चलसंपत्ती मानण्यात येत असे. स्त्रीयांपेक्षा धडधाकट व हुजऱ्या पुरूषांना पदरी बाळगणे जास्त प्रतिष्ठेचे मानल्या जात असे. या सेवक वर्गाला ठराविक वर्दी व पोशाखात राहावे लागत असे तसेच मालकाची सेवा कशी करावी यासाठी सरावही करावा लागत असे. स्वत: मालकांना उच्च दर्जाचे पोशाख परिधान करावे लागत असत. हे पोशाख परिधान करणे व हालचाल करणे जरी त्रासदायक होत असले तरी सन्मान प्राप्तीसाठी तो त्रासही सहन केल्या जात असे.

कॉन्सीक्युअस कंझमशन (Conspicuous Consumption) म्हणजेच डोळ्यात भरणारा किंवा ध्यानाकर्षित उपभोग या चौथ्या प्रकरणात व्हेब्लेन स्पष्ट करतात की, विलासी वर्ग उपभोगासाठी जेवढ्या महागड्या वस्तुंचा वापर करीत असे तेवढीच त्यांची प्रतिष्ठा जास्त मानण्यात येत असे. या वर्गासाठी विशेष पेय व मद्य खास राखून ठेवली जात असत जी इतर वर्गासाठी वर्ज्य होती. कॉन्सीक्युअस कंझमशन ही अशी क्रिया होती की, ज्यामध्ये अनेक वस्तू व प्रामुख्याने अत्यंत महागड्या वस्तूंची खरेदी केल्या जात असे. अशा वस्तू जीवन जगण्यासाठी आवश्यक नसत. मात्र त्या वस्तूंची खरेदी करणाऱ्याला समाजात विशेष प्रतिष्ठा व मानसन्मान प्राप्त होत असे. कोणतेही उत्पादक कार्य न करता अशा विलाशी वस्तूंच्या खरेदीवर, उपभोगावर व त्यांच्या अपव्ययावरच आपला वेळ व संपत्ती खर्च करून त्याचे प्रदर्शन करणारा एक वर्ग म्हणजेच Leisure Class ही एक नवीन आर्थिक व सामाजिक संस्था निर्माण झाली. धर्म गुरूंना भेटवस्तु देणे, शस्त्रे व हत्यारे खरेदी करणे, टोलेजंग बंगले व त्यांची सजावट करणे, खास नौकरांसाठी बंगल्याचे मागे क्वॉटर्स बांधून देणे, सुवर्णाचे अलंकार, जडजवाहारात, रत्ने, कलाकुसरीच्या वस्तू यांची खरेदी करणे, नौकाविहार, गोल्फ खेळणे, मोठमोठ्या समारंभात मद्य पिऊन झिंगणे, मेजवाण्या देणे, स्मोकिंग करणे, बॉलरूम्स (सांघिक नृत्याची जागा) रेसकोर्सवर जाणे हे छंद म्हणून जोपाल्या जात असत. हा वर्ग ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनाही तुच्छ मानत असे. अशा प्रकारचा उपभोग ज्यांना घेता येत नाही त्यांना अत्यंत तुच्छ मानल्या जात असे. अशा प्रकारच्या उपभोगातून इतरांबद्दल मत्सर किंवा द्वेष निर्माण होत असे यालाच व्हेब्लेन यांनी "Invidious Consumption" म्हटले आहे.

समाजात दोन वर्ग असत एक सन्मान व स्वतंत्रता असणारा वर्ग ज्यामध्ये सरकारी अधिकारी, फायटिंग मध्ये कुशल व्यक्ती, शिकारी, लष्करातील अधिकारी व शस्त्राची निगा राखणारी. दुसरा वर्ग म्हणजे सन्मान नसणारे औद्योगिक कामगार, हस्तोद्यागातील कारागीर, शारीरिक कष्टाचे कामे करणारे श्रमिक अशा प्रकारे संपत्तीचा प्रदर्शनकारी उपभोगावरील खर्च व वस्तूंचा अपव्यय हा वेळेचा व उत्पादक साधनांचा अपव्ययच होता. सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा हवी असेल तर संपत्ती व सामर्थ असून चालणार नाही तर त्याचे सर्वांसमोर प्रदर्शनही आवश्यक मानले जाई. उपभोग घेणे म्हणजे आनंद मिळविणे हे तत्व नव्हते तर आपल्या सामर्थ्याचे व प्रतिष्ठेचे प्रदर्शन करणारे ते एक साधनच होते. (Consumption is a purely functional demonstration of power and prestige)

"The Pecuniary Standard of Living" म्हणजेच धनकेंद्रीत जीवनमानाचा दर्जा या पाचव्या प्रकरणात व्हेब्लेनने स्पष्ट केले आहे की, तत्कालीन विलासी वर्गाला उच्च जीवन मानाची, उपभोग्य वस्तंचा अपव्यय करण्यांची सवयच झाली होती. प्रदर्शनकारी उपभोगावर किती खर्च कोण करेल यावरच त्या-त्या व्यक्तीच्या जीवन मानाचा दर्जा निश्चित होत असे. दारूचे व्यसन असणे, जुगार खेळणे, घोड्यांच्या शर्यतीत भाग घेणे, समाजात दानशुर म्हणून प्रसिद्ध होणे व धार्मिकतेचे सोंग आणने यालाच श्रेष्ठ जीवनमान समजल्या जात असे. दुसऱ्यांची लुट करून जमविलेली संपत्ती पाण्यासारखी खर्च करून आपण संपत्तीवान

असल्याचा व एक सभ्य पुरूष असल्याचा देखावा करणे यालाच उच्च प्रतीचे जीवनमान मानण्यात येत असे.

"Pecuniary Canons of Taste" म्हणजेच आवडी निवडीची धन केंद्रीत तत्वे या सहाव्या प्रकरणात व्हेब्लेनने स्पष्ट केले आहे की, सुंदरता व महागडेपणा हे दोन गुणधर्म असणाऱ्या वस्तूंवर मालकी असणे व ते वापरणे हे सन्मानाचे तत्व होते. सुवर्ण व रत्नजडीत अलंकार हे सुंदरतेचे व लोकांना आकर्षित करण्याचे साधन झाले होते. भरजारी पोशाख, कलाकुसरीने बनविलेले फर्निचर झुपकेदार उंच टोनी, उपवन-उद्याने, गुरे चारण्याची कुरणे, हरीण, काळविटे, विदेशी पाळीव प्राणी, सदृढ गायींचा कळप, ॲगोरा मांझर, काठेवाडी घोडे, विशेष जातीची कुत्री इत्यादी बाळगणे हे सन्मानाचे मानले जात असे. तर कोंबड्या, बकऱ्या, मेंढ्या, डुक्करे, गुरे-ढोरे, कबुतरे, गावठी कुत्रे, गावठी मांजर, पिंजऱ्यातील पोपट इत्यादी पदरी बाळगणे हे कनिष्ठ दर्जाचे मानले जात असे. साधी मांजर ही सर्वात कनिष्ठ मानली जात असे कारण ती एक तर उंदीर मारण्यासाठी उपयुक्त होती व अपव्यय करणारी नव्हती. शिवाय ती सर्व मानवासोबत समान वागणुक करणारी विशेष वर्गाला विशेष सन्मान न देणारी अशी होती. अशा मांजरीपेक्षा शोभेची ॲगोरा मांजर बरी मानल्या जात असे. प्राणी सुद्धा भेदभाव करणारा असावा. कोणती उपयोगीता पूर्ण करणारा नसावा हे तत्व त्यामागे होते. उपयुक्ततेपेक्षा दर्जा समजणारे व इतरांवर भुंकणारे होते. भरधाव धावणाऱ्या घोड्यांना सर्वाधिक महत्त्व होते कारण ते अत्यंत किंमती, त्यांचे संगोपनही महागडे, खाद्य महागडे, अनुपयुक्त, दिखावू व प्रतिष्ठा वाढविणारे होते. रेसचे घोडे त्याही पेक्षा महत्त्वाचे मानले जात असत कारण ते शर्यती जिंकून देवून मालकाचा सन्मान वाढवत असत. यालाच व्हेब्लेन यांनी "Cannon of Reputabulity" म्हटले आहे.

स्वस्त तेवढे असभ्य (Cheap & Nasty) तसेच A cheap cote makes a cheap man म्हणजेच स्वस्त कोट वापरणारा हा तुच्छ व्यक्ती होय. तर अत्यंत महागडा कोट व त्यावर सोन्याची बटणे, सोने व विविध रत्नांची चिन्हे हे परिधान करणारा सन्माननीय मानल्या जात असे. साध्या छापखान्यातून प्रकाशित होणारी स्वस्त पुस्तके खरेदी करणे अप्रतिष्ठेचे तर Kelmscott Press या प्रकाशनाची विशेष कलाकुसर असणारी, मर्यादित संख्येत छापल्या जाणारी, महागडी व आकर्षक पुस्तके नक्षीदार काचेच्या कपाटात ठेवून त्यांचे प्रदर्शन करणे हे श्रेष्ठ दर्जाचे व सन्माननीय मानले जात असे. अशा प्रकारे संपत्तीचे उधळपट्टी करणे हे सन्मानाचे तत्व (The Cannon of Honorific Waste) मानल्या जात असे.

Dress as an Expression of the Pecuniary Culture धनकेंद्रीत संस्कृतीच्या प्रदर्शनाचे एक साधन म्हणजे पोशाख या सातव्या प्रकरणात व्हेब्लेन स्पष्ट करतात की, आपल्या संपत्तीचे प्रदर्शन करण्याच्या अनेक साधनांपेक्षा प्रथम दर्शनीच सर्वाधिक प्रभावित करणारे साधन म्हणजे पोशाख असे विलासी वर्ग मानत असे. ऊन, वारा, पाऊस या पासून शरीराचे संरक्षण हा पोशाख परिधानामागे उद्देश नसायचा तर तो पोशाख परिधान केल्याने आपण पाहताक्षणीच सन्माननीय व सभ्य कसे दिसू (A Respectable Appearance) हा त्यामागे हेतू असायचा. पोशाख हा महाग तर असावाच परंतु त्या

पोशाखाच्या शाही स्वरूपावरून पेहराव करणारी व्यक्ती कोणतेही उत्पादक कार्य किंवा शारीरिक कष्टाचे कार्य करीत नाही हे सुद्धा सिद्ध होण्यासाठी तो अत्यंत मोहक, शोभिवंत, सभ्यता दर्शक व उत्कृष्ट अभिरूची असलेला (Elegant) असावा अशी अपेक्षा होती. चकाकणारे कातडी शुज, न डागाळणारे कापड, उंच हॅट, रत्नजडीत हातातील काठी या वस्तू वापरण्याचे कारण त्या महागड्या आहेत म्हणून नव्हे तर त्या सन्मानाचे धोतक आहेत म्हणून वापरल्या जात असत. स्त्रीया सुद्धा उंच टाक्याच्या सॅन्डल्स, लांब केसचो विग, ऋतुमानानुसार वेगवेगळे खास पोशाख अत्यंत तलम, नाजूक तसेच सैल व घेरदार परकर, मानेखाली बांधलेली टोपी, घट्ट अशी काचोळी, अंगावर भार होईल एवढे दागिने वापरीत असत. ज्यातून हे स्पष्ट होत असे की, त्या अत्यंत संपत्तीवान पुरूषांच्या स्त्रीया आहेत. त्यांचा पोशाख सांभाळता सांभाळता त्यांची तारांबळ उडत असे व ज्यातून ते कधीच कष्टाचे कार्य करीत नाहीत हे ही स्पष्ट होत असे. येथे स्त्रीयांची प्रतिष्ठा महत्त्वाची नसून त्यांच्या पतीची प्रतिष्ठा महत्त्वाची मानल्या जात असे.

Industrial Exemption and Conservatism म्हणजेच पुरातनवाद आणि औद्योगिक कार्यातून सूट या आठव्या प्रकरणात व्हेब्लेन म्हणतात की, पुराणमतवादी असणे हे धनाढ्याचे लक्षण असून समाजात त्याला विशेष प्रतिष्ठा होती. पूर्वापार चालत आलेल्या प्रथा पाळल्याच पाहिजे असा दंडक होता. यासाठी व्हेब्लेन यांनी आपल्या ग्रंथात चीनमधील पुर्वजांची पूजा करण्याची दडपण टाकणारी प्रथा व आफ्रिकेतील गुलामगिरीची प्रथा यांची उदाहरणे दिली आहेत. पूर्वापार प्रथा बंद करून काहीतरी नवीन नुतनीकरण करणे त्या काळात अत्यंत वाईट समजल्या जात असे (Innovation is bad form) काबाड कष्टाची कामे करणे हे तुच्छतेची मानल्या जात असत व अशी कामे या उच्छभ्रू वर्गाने करू नयेत व त्यांना अशा कार्यातून पूर्णतः सूट असावी असा प्रघात त्याकाळात होता.

The Conservation of Archaic Traits म्हणजेच प्राचीन, दुर्मिळ वस्तूंचे जतन या नवव्या प्रकरणात व्हेब्लेन स्पष्ट करतात की, प्राचीन काळातील दुर्मिळ अशा कलाकुसरीच्या वस्तू, प्राचीन शिल्प, मुर्त्या, प्राचीन प्रासाद यांचे जतन करून त्या आपल्या मालकीच्या आहेत असे दाखविण्याचे व सन्मान मिळविण्याचे प्रयत्न हा विलासी वर्ग करीत असे. येथे या वस्तूचे जतन करणे हा दुय्यम हेतू असायचा व मुख्य हेतू हा स्वतःच्या संपत्तीचे प्रदर्शन करून समाजात सन्मान मिळविणे हाच असायचा.

Modern Survivals of Prowess म्हणजेच पराक्रम हाच अस्तित्वाचा द्योतक या दहाव्या प्रकरणात व्हेब्लेन स्पष्ट करतात की, जे पराक्रमी, धैर्यवान व बलाढ्य असतात तेच आधुनिक काळात अस्तित्व टिकवितात. यामुळेच लढावूवृत्ती, युद्धातील पराक्रम, प्रशासनातील दबदबा याला जास्त सन्मानाचे मानले जात असे. लढावू वृत्तीची बीजे युवकामध्ये वाढावीत म्हणून त्यांना महाविद्यालयीन जीवनातच खेळ, शर्यती, भांडणे, मारामाऱ्या, क्रुरपणा यासाठी प्रोत्साहीत केल्या जात असे. यासाठी यंगबॉईज ब्रिगेडसारख्या संघटना स्थापन झाल्या होत्या. बक्षिसांसाठी लढती, बुल फाईट, कोबंड्याच्या झुंजी, मासेमारी, एथेलेटिक्स,शुटींग, नौका शर्यती या विविध स्पर्धामधून शारीरिक हानी झाली तरी ती

मान्य केल्या जात असे. खेळांमध्ये फुटबॉल हा सर्वाधिक प्रतिष्ठेचा मानल्या जात असे. खेळांमध्ये सुद्धा विलासी वर्गाचीच मुले जिंकली पाहिजे यासाठी दबाव टाकणे, कावेबाजपणा करणे, फसवेगिरी करणे, खोटारडेपणा करणे, पंचाना लाच देवून निकाल आपल्या बाजूने वळविणे, मॅच फिक्सींग करणे अशा प्रकारची कृत्ये केल्या जात असत. व्हेब्लेन यांच्या मते ही सर्व कार्य देशाच्या व समाजाच्या विकासावर विपरीत परिणाम टाकणारी होती.

The Belief of Luck म्हणजेच दैववादावर विश्वास या अकराव्या प्रकरणात त्याकाळातील विलासी वर्गात व समाजात दैववाद व अंधविश्वास किती प्रबल होता हे त्यांनी स्पष्ट केले आहे. मंतरलेली अंगठी, ताईत, गंडा वापरणे, वेगवेगळी रत्ने धारण करणे, व्रतवैकल्य करणे यातून नशीब आपल्याला साथ देईल असा विश्वास होता. हा वर्ग जुगारामध्ये जास्त रस घेणारा होता आणि जुगारामध्ये दैववादाला महत्त्व असल्याने त्यासाठी वेगवेगळ्या उपासना केल्या जात असत. ढोंगी व्यक्ती व धर्मगुरूंचे पूजन करून त्यांना मोठ्या प्रमाणात दक्षिणा दिल्या जात असे. या वर्गाला पैज लावण्याची व त्यात जिंकण्याची सवयच लागली होती. पैज कोण जिंकेल हे पूर्वीच ठरलेले असायचे. जो अधिक संपत्तीवान तोच विजयी होत असे. आपल्या संपत्तीचे प्रदर्शन करण्यासाठी कधीकधी तर मुद्दाम काही लोकांना पैसे देवून पैज लावण्यासाठी तयार केल्या जात असे. हारणाऱ्यांचा सर्वांसमोर अपमान करण्यात येत असे. पैज जिंकल्यानंतर या वर्गाचा होणारा जयजयकार त्यांना स्वत:लाही आनंद देत असे व सोबतच समाजात प्रतिष्ठासुद्धा मिळत असे.

Devout Observances म्हणजेच धार्मिक सण व कायद्याचे पालन या बाराव्या प्रकरणात व्हेब्लेन यांनी तत्कालीन धार्मिक सण व श्रीमंताला अनुकूल असणारे कायदे पालन याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. मंदिर, चर्च, समाधी स्थळे, धर्मोपदेशकाचे निवास, त्याग, धार्मिक विधी, धर्मशिक्षण, धर्मोपदेशकाची सेवा व त्यांना दानधर्म करणे, व्रत उपवास, यात्रा, घरगुती उपासना याला महत्त्व दिल्या जात असे. धर्मगुरू नंतर संत, देवदूत यांना मानाचे स्थान होते. कायदा पालन हे फक्त गरीब वर्गासाठी होते. विलासी वर्गाने कोणताही मोठा गुन्हा केला तरी संपत्तीच्या बळावर त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही होत नसे.

Survivals of the Non-Invidious Interest म्हणजेच मत्सरविरहित पसंतीचे अस्तित्व या तेराव्या प्रकरणात व्हेब्लेन यांनी अस्तित्वासाठी संघर्ष हे इतर प्राणीमात्राप्रमाणेच मानवाच्या उत्क्रांतीला कारणीभूत ठरले आहे व त्यातूनच मानवाने स्विकारलेल्या प्रथा परंपरेतूनच वेगवेगळ्या प्रथा व संस्थांचा जन्म होतो व ही प्रक्रिया कालमान बदलानुसार अव्याहतपणे सुरू राहते, असे स्पष्ट केले आहे. बदलणाऱ्या परिस्थितीनुसार संस्था ह्या बदलल्याच पाहिजे (Institutions must change with changing circumstances) तसेच आजच्या संस्था ह्या भावी संस्थांची जडणघडण करीत असतात. (The Institutions of today shapes the institution of tomorrow) अतिरंजितता कधीही कायम टीकत नाही. क्रियेविरूद्ध प्रतिक्रिया होतच असते. व्हेब्लेनच्या मते विलासी वर्गाची क्रूर वागणूक, त्यांचा उपभोगावरील अपव्यय, रिकामटेकडेपणा हा चिरकाळ टिकणारा नाही. काळमानाप्रमाणे सामाजिक सुधारणा, तुरूंग सुधारणा,

शिक्षणाचा विस्तार झाल्याने आपला दबलेला आवाज उठविण्याची प्राप्त झालेली शक्ती, जागतिक स्तरावरील शस्त्रसंधी, तह, युद्ध टाळण्यासाठी झालेले करार, नवीन संघटना, स्त्रीयांच्या सामाजिक दर्जात झालेली सुधारणा, वेगवेगळ्या धर्मदाय संस्थांची निर्मिती इत्यादी मुळे मत्सराची जागा सहअस्तीत्वाने घेतली. जगा व जगू द्या हे तत्व मान्य होत गेले. हळूहळू स्वार्थ, बळजबरी, दगाबाजी, स्वामित्व गाजविणे यांची जागा, शांतता, समानता, गुडवील, स्वातंत्र्य, बंधुता व आर्थिक कार्यक्षमता यांनी घेतली. यातूनच परस्परांना सहकार्य करणाऱ्या अनेक आर्थिक व सामाजिक संस्था निर्माण झाल्या. या सर्व बदलात स्त्रीयांचे योगदान उल्लेखनीयच मानावे लागेल.

The Higher Learning as an Expression of the Pecuniary Culture म्हणजेच उच्च शिक्षीत असणे हा आर्थिक संस्कृतीचा अविष्कार या शेवटच्या प्रकरणात व्हेब्लेन यांनी उच्च शिक्षणाला अधिक महत्त्व देवून उच्च शिक्षणामुळे कसा सन्मान प्राप्त होतो याचे वर्णन केले आहे. उच्च शिक्षित पदवीधारकांना विशेष टोपी, विशेष वस्त्र, विशेष झगा व विशेष स्कार्फ देवून सन्मानीत केल्या जावू लागले. त्यांना प्रशासनात अधिकारी म्हणून नेमणूक दिली जावू लागली. इंग्लंडमधील भौतिक शास्त्रांचे अध्ययन करणारे, जर्मनीतून विशेष खेळाचे प्रशिक्षण घेवून आलेले व ग्रीक देशातून विविध कलांचे अध्ययन करून आलेले उच्च पदवीधर यांना जास्त सन्मान मिळू लागला. "Higher, Nobler, Worthier" म्हणजेच उच्च शिक्षित हा वरिष्ठ दर्जाचा उदात्त किंवा थोर व विशेष गुणवत्तापूर्व मानल्या जावू लागला तर अशिक्षित हा "Lower, Base, Ignoble" म्हणजेच कनिष्ठ दर्जाचा तळागळातील व असभ्य मानल्या जावू लागला.

**निष्कर्ष :**

'द थिअरी ऑफ द लीझर क्लास (उपशीर्षक : ॲन इकॉनॉमिक स्टडी ऑफ द इन्स्टिट्यूशन्स') हे त्यांचे पहिले पुस्तक अजूनही वाचले जाते. यात त्यांनी आधुनिक आर्थिक जीवनाच्या अध्ययनात चार्ल्स डार्विन यांच्या उत्क्रांतीवादाचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी लिहिले आहे की, औद्योगिक प्रणालीसाठी माणसे मेहनती, कार्यक्षम व सहकार्य करणारी असणे गरजेचे असते. व्यावसायिक क्षेत्रावर ज्यांची सत्ता होती त्या माणसांना पैसा कमावण्यात व आपल्या संपत्तीचे प्रदर्शन करण्यातच रस होता. पूर्वीच्या रानटी भक्षक भूतकाळापासून सुरक्षित टिकून रहाणे अशी त्यांची धारणा होती. पराक्रमाचे आधुनिक काळात टिकून राहणे याचे त्यांनी उघडपणेच रूचीने परीक्षण केले. मनोरंजन, करमणूक, खेळ, टूम, धर्म व सौंदर्यशास्त्रीय रूची याविषयीचे सत्ताधरी वर्गाचे हे पराक्रम होते. साहित्यिक जगतानेही या पुस्तकात रस दाखविला. बहुतेक साहित्यकारांनी यांच्याकडे उपहासगर्भ लेखन म्हणून पाहिले. विज्ञान म्हणून त्यांचे त्याकडे लक्ष गेले नाही. लवकरच व्हेब्लेन हे आपल्या शैक्षणिक पातळीच्या खूपच पुढे गेलेले सामाजिक समीक्षक म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली.

मात्र प्रसिद्धीमुळे त्यांना शैक्षणिक यश मिळाले नाही. ते उदासीन शिक्षक होते आणि व्याख्याने व परीक्षा या विद्यापीठीय कर्मकांडांविषय त्यांना तितकारा वाटत असे. 'इकॉनॉमिक फॅक्टर्स इन सिव्हिलिझेशन' हा त्यांच्या सर्वात प्रसिद्ध व्याप्तिलेखाचा पल्ला विस्तृत होता. त्यांत इतिहास, कायदा, मानववंशशास्त्र व तत्वज्ञान यांसारख्या

विस्तृत क्षेत्रांचा विचार त्यांनी केलेला होता. मात्र परंपरागत आर्थिक सिद्धांताकडे थोडेच लक्ष दिलेले दिसते. 'द थिअरी ऑफ बिझनेस एंटरप्राईज' (१९०४) या पुस्तकात त्यांनी आपला उत्क्रांतीवादी विषय अधिक व्यापक केला आणि आधुनिक औद्योगिक प्रक्रिया आणि उद्योग व वित्तपुरवठा यांचे अविवेकी मार्ग यांच्या दरम्यानच्या विरोधाभासावर प्रकाश टाकला.

व्हेब्लेन यांच्या विचारांवर मोठ्या प्रमाणावर टीकाकारांनी टिका केली आहे. त्यांच्या मते व्हेब्लेन यांचे विचार ध्येयरहित, अव्यावहारिक तसेच अंत:प्रेरणा व तर्कातील संबंध यांचे अधिक स्पष्टीकरण न करणारे, कोणत्याही आकडेवारीवरून निष्कर्ष न काढणारे, केवळ वर्णनात्मक तसेच निराशावादी व रूक्ष स्वरूपाचे होते. त्यांची भाषाशैली अत्यंत जटील व क्लिष्ट स्वरूपाची होती. लांबलचक वाक्ये, एकाच मुद्यांचे वारंवार व अनावश्यक प्रदिर्घ स्पष्टीकरण अशाप्रकारे त्यांच्यावर टीका करण्यात आली. असे असले तरी अनेक विचारवंतांच्या मते,''अमेरिकेमध्ये जर कोणता मौलिक विचारक आणि प्रतिभाशाली अर्थशास्त्रज्ञ झाला असेल तर ते एकटे व्हेब्लेनच होते.'' ग्रूचीच्या मते ''त्यांची लेखन सजावट, सांस्कृतिक व सामाजिक उद्‌गम, सामाजिक वातावरण आणि वैज्ञानिक प्रशिक्षणाने त्यांना मानवी विचारधारा आणि विशेषरूपाने आर्थिक विचारधारेमध्ये महत्त्वपूर्ण स्थान प्रदान केले आहे.'' अशा प्रकारे आर्थिक विचारांच्या इतिहासात व्हेब्लेनचे स्थान अनन्य साधारण असे होते. कार्ल मार्क्स च्या पश्च्यात आणि केन्सच्या पूर्वी जर कोणी प्रतिभाशाली लेखक झाला असेल तर ते व्हेब्लेनच होते.

◆◆◆

# भारतातील आरोग्यविषयक सद्यःस्थिती

**सुभाष पाटील**
प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
एस.एन.टी.डी. महिला विद्यापीठ, पुणे

**१. प्रास्ताविक:**

आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मानवाच्या मुलभूत गरजांची पूर्तता व त्यात गुणात्मक सुधारणा होणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेच्या १९७६ मधील जागतिक रोजगार परिषदेत 'विकासाची व्यूहरचना' म्हणून मुलभूत गरजांची पूर्तता करण्यावर भर दिला गेला आहे. या मुलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी व्यक्तिगत, सार्वजनिक व शासन पातळीवर केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक दृष्टीने सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. शिक्षण आणि आरोग्य या घटकांचा लोकसंख्येच्या गुणात्मकतेवर थेट परिणाम होतो. म्हणून मानवी विकास निर्देशांक तयार करताना साक्षरता दर आणि सरासरी आयुर्मान या दोन घटकांना खूप महत्त्व आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील मानवी निर्देशांकात फरक असण्याचे मुख्य कारण म्हणजे त्या-त्या राष्ट्रांमधील शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थितीतील तफावत हे होय. सदर तफावतीस दोन कारणे जबाबदार आहेत. एक म्हणजे आर्थिक व सामाजिक स्थिती आणि दुसरे म्हणजे लिंगभेद ही होत. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत विकसनशील राष्ट्रांमध्ये ही तफावत अधिक जाणवते. भारतदेखील यास अपवाद नाही. २०११ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या लैंगिक असमानता निर्देशांकनुसार जगातील १८७ देशांपैकी भारताचा क्रमांक १३४ वा होता. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत आजही भारतातील लोकसंख्येची विशेषतः महिलांची आरोग्यविषयक स्थिती समाधानकारक नाही. प्रस्तुत लेखातून विकासाच्या दृष्टीने आरोग्याचे महत्त्व व भारतातील आरोग्यविषयक सद्यःस्थिती यादृष्टीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**२. आरोग्य आणि आर्थिक विकास :**

सर्वसाधारणतः आरोग्य म्हणजे शारिरीक, मानसिक व सामाजिक कल्याणाची परिपूर्ण स्थिती आणि आजारपण व दुर्बलतेच्या अस्तित्त्वाचा अभाव असणे होय. आरोग्य ही बहुपैलू संकल्पना असून त्यावर भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व पर्यावरणीय घटकांचा एकत्रित व विविधांगी परिणाम होत असतो. आरोग्य आणि विकास यांत थेट आंतरसंबंध आहे. नोबेल पारितोषिक विजेते रॉबर्ट डब्लू फॉजेल यांच्या मते परिपूर्ण आरोग्य आर्थिक वृद्धीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. उत्तम आरोग्यविषयक स्थितीमुळे राष्ट्रांतील समग्र लोकसंख्येच्या सरासरी आयुर्मानात उत्तरोत्तर वृद्धी होते. कार्यकारी लोकसंख्येच्या कार्यक्षमतेत वृद्धी

होत जाऊन एकूण व दरडोई उत्पादकतेत वाढ होते. एकूण उत्पादनात वाढ होते. एकूण राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नात वाढ होऊन विकासाला गती मिळते. त्यांच्या मते, इंग्लंडमधील आर्थिक वृद्धीत गती येण्यास गेल्या २०० वर्षांतील लोकांच्या आहारशैली व आहार उपभोगात झालेली गुणात्मक सुधारणा हे एक महत्त्वपूर्ण कारण आहे. विविध राष्ट्रांच्या समग्र पातळीवरील अभ्यासावरुन असे निदर्शनास येते की, गेल्या काही वर्षांत सरासरी आयुर्मानात वय वर्ष ५० वरुन ७० वर्षे इतकी वाढ झाली आहे आणि सरासरी आयुर्मानातील वाढीचा परिणाम म्हणून विकास वृद्धी दर प्रतिवर्षी जवळपास १.५ टक्क्यांनी वाढला आहे. मेक्सिकोच्या अनुभवानुसार विविध वयोगटातील सरासरी आयुर्मानातील वाढ आणि मृत्यूदरातील घट यामुळे १९७० ते १९८५ या काळातील आर्थिक वृद्धी दरातील वाढीस आरोग्यविषयक घटकांचे योगदान एक तृतीयांश इतके होते. कार्यकारी लोकसंख्येच्या आरोग्याचा थेट परिणाम उत्पादकता आणि उत्पन्नावर होत असतो तर वाढीव उत्पन्नाचा थेट परिणाम शिक्षणावर होत असतो. (Mexican Commission Report, 2004)

आरोग्य आणि विकास यासंबंधी उपलब्ध असलेल्या अभ्यासांवरुन असे निदर्शनास येते की, विकसित राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक सुधारणांचा थेट परिणाम आरोग्यावर आणि आरोग्यविषयक परिस्थितीत झालेल्या सुधारणांमुळे उत्पादन आणि उत्पादकतेत बरीच सुधारणा झाली आहे. बार्लो यांनी आरोग्य आणि विकास यांतील आंतरसंबंधावर आधारित प्रतिमान तयार केले असून त्यांच्या मते उत्पन्न, शिक्षण, आहार, आरोग्य आणि जननक्षमता या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम आरोग्यविषयक खर्चातील वाढीवर होतो. वाढीव आरोग्यविषयक खर्चामुळे आजारपणाचे प्रमाण कमी होते. निरोगी आरोग्यामुळे जननक्षमता दर नियंत्रित राखण्यास मदत होते. शिक्षणामुळे उत्तम आरोग्याचे महत्त्व समजण्यास व राखण्यास मदत होते. निरोगी व सदृढ व्यक्ती अधिक तास, अधिक काळ व अधिक कठीण काम करण्यास तयार होते. पर्यायाने जास्तीच्या पगाराच्या संधी उपलब्ध होतात आणि उत्पन्नात वाढ होते इत्यादी. थोडक्यात जर बाह्य घटकांमुळे आरोग्यात सुधारणा होत असेल तर निरोगी व सुदृढ आरोग्याचा थेट परिणाम उत्पन्नपातळी वाढण्यावर तर अप्रत्यक्ष परिणाम आहार, शिक्षण आणि जननक्षमतेवर होत असतो. (Grosse and Harkavya, 1980)

### ३. भारतीय महिला आणि आरोग्य :

राष्ट्राच्या प्रगतीचा एक महत्त्वपूर्ण व अत्यावश्यक घटक म्हणजे राष्ट्रातील सर्व वयोगटातील सर्व व्यक्तींचे उत्तम आरोग्य होय. कारण उत्तम आरोग्य तेथे प्रगती असे जगमान्य समीकरण आहे. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारतातील लोकसंख्येची आरोग्यविषयक स्थिती आणि उपलब्ध आरोग्यविषयक सुविधा याबाबतीत भारत अजूनही बराच मागे आहे. मानवी विकास निर्देशांक संदर्भात २०१५ या वर्षात भारताचा क्रमांक जगातील १८८ देशांपैकी १३० वा आहे. आज जगातील एकूण ६९० कोटी लोकसंख्येपैकी १७.५ टक्के लोकसंख्या भारतात असून त्यातील ६८.८४ टक्के लोकसंख्या भारताच्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. जनगणना २०११ नुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१ कोटी इतकी असून त्यापैकी ५१.५४ टक्के पुरुष तर ४८.८६ टक्के महिला आहेत. २००१ ते २०११ या

दशकात पुरुषांच्या संख्येत १७.१९ टक्के तर महिलांच्या संख्येत १८.१२ टक्के वाढ झाली आहे. याच दशकात ० ते ६ वर्षे बालक वयोगटातील संख्येत ५० लाखांनी घट झाली आहे. यातही मुलांच्या संख्येत २.६७ टक्के तर मुलींच्या संख्येत २.९५ टक्क्यांनी घट झाली आहे. एकूण लिंग गुणोत्तर दरहजारी ९४० असून ० ते ६ वर्षे बालक वयोगटातील लिंग गुणोत्तर दरहजारी ९१४ इतके म्हणजे झपाट्याने कमी होत आहे. लोकसंख्याविषयक या सर्व घटकांचा विचार करता पुरुष आणि महिला यांतील लिंगभेद स्पष्ट दिसतो. शिवाय या सर्व घटकांत राज्यनिहाय, प्रदेशनिहाय आणि शहरी व ग्रामीण भागनिहाय प्रचंड तफावत दिसून येते. (पाटील, २०१२)

**तक्ता १:** भारत व महाराष्ट्रातील लोकसंख्याविषयक, सामाजिक-आर्थिक व आरोग्यविषयक स्थिती

| अ.क्र | निर्देशक | वर्ष | भारत | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण लोकसंख्या (कोटीत) | २०११ | १२१.०१ | ११.२ |
| २ | अर्भक मृत्यूदर (दर हजारी) | २०१३ | ४० | २४ |
| ३ | माता मृत्यूदर (दर लाख) | २०१०-१२ | १७८ | ८७ |
| ४ | एकूण जननदर (प्रति महिला) | २०१२ | २.४ | १.८ |
| ५ | ढोबळ जननदर (दर हजारी) | २०१३ | २१.४ | १६.५ |
| ६ | ढोबळ मृत्यूदर (दर हजारी) | २०१३ | ७ | ६.२ |
| ७ | नैसर्गिक वृद्धीदर | २०१३ | १४.४ | १०.२ |
| ८ | लिंग गुणोत्तर (दर हजारी) | २०११ | ९४० | ९२५ |
| ९ | बाल लिंग गुणोत्तर (दर हजारी) | २०११ | ९१४ | ८८३ |
| १० | आयु र्मान (वर्षे) | २००२-०६ | ६३.५ | ६७.२ |
| ११ | दरडोई उत्पन्न (रुपये) | २००८-०९ | २५४९४ | ३३३०२ |
| १२ | आरोग्यावरील दरडोई खर्च (रुपये) | २००४-०५ | १२०१ | १२१२ |

Source: Annual report to the people on Health, December 2012, Government of India, Pp.63 and Website-State Health profile, NHM, Ministry of Health and Family Welfare, Government of India

आरोग्याच्या अनेक सामाजिक निर्धारकापैकी लिंग हे एक महत्त्वपूर्ण निर्धारक असून ते महिलांच्या आरोग्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. महिलांचे आरोग्य हे त्यांच्या भावनिक, धार्मिक, सामाजिक आणि भौतिक कल्याणाशी संबंधित असून ते त्यांच्या जीवनातील विविध सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटकांशी निगडीत आहे. महिलांच्या स्थितीशी संबंधित संशोधनावरुन असे निदर्शनास येते की, महिलांचे कुटुंब विकासातील योगदान पुरुषांच्या तुलनेत जास्त आहे. मात्र शिक्षण आणि औपचारिक श्रमिकशक्ती सहभाग या दोन्ही पातळीवर महिलांचे स्थान दुय्यम ठरते. पुरुषप्रधान संस्कृती प्रभावामुळे महिलांना मर्यादित स्वातंत्र्य असते. या घटकांचा विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्यावर होताना दिसतो. अंतिमतः उत्पादक कार्यातील अल्प सहभागाचा विपरीत परिणाम आर्थिक कल्याणावरही होतो.

भारतीय महिलांच्या आरोग्याशी संबंधित

मुख्य समस्या म्हणजे १.पुनरुत्पादनक्षम आरोग्य, २. पोषणविषयक स्थिती, ३. मुलगा-मुलगी वागणुकीतील भेद, ४. संसर्गजन्य आजार इत्यादी. भारतात जन्मदराचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत असले तरी विकसित राष्ट्रांच्या तुलनेत आजही जास्त आहे. राज्य, शिक्षण, धर्म, जात आणि वास्तव्याचे ठिकाण यागणिक जन्मदर पातळीत भिन्नता आढळते. उत्तरप्रदेश राज्यात जन्मदर पातळी जास्त तर केरळ राज्यात ती कमी आहे. भारतात विवाहाचे वय कायदेशीररित्या महिलांकरिता १८ वर्षे आणि पुरुषांकरिता २१ वर्षे असे असले तरी १८ वर्षे पूर्ण होण्याआधी विवाह होण्याचे प्रमाण आजही जास्त आहे. पर्यायाने जननक्षमतेचे प्रमाण जास्त आहे. माता मृत्यूदर आणि वाढते असाध्य आजाराचे प्रमाण हे विषय उच्च जननक्षमतेशी निगडीत आहे. प्रसुतीवेळेस मृत्यू पावणाऱ्या मातांची संख्या आजही दर एक लाख जीवित बालकांच्या जन्मामागे जवळपास १७८ इतकी आहे. केरळ राज्यात हे प्रमाण सर्वात कमी (८१) असून उत्तर प्रदेश (३१८), राजस्थान (३१८), मध्यप्रदेश (२६९) या राज्यात जास्त आहे. माता मृत्यूदरातील ही तफावत महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती आणि राज्यात उपलब्ध असणाऱ्या आरोग्य सेवानुसार भिन्न-भिन्न आहे. अर्थात आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करुन देऊन हे प्रमाण कमी करणे राज्यांना शक्य आहे. भारतातील उपलब्ध आरोग्यविषयक सुविधा व त्याची गुणवत्ता समाधानकारक नाही. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार (२००५-२००६) असे निदर्शनास आले की, केवळ ५० टक्के महिलांची प्रसूती दवाखान्यात होते. तसेच ॲनेमियासारख्या आजारामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या मातांचे प्रमाण जवळपास २० टक्के इतके आहे. गरोदर काळात केवळ १८ टक्के महिला आरोग्यविषयक सुविधांचा लाभ घेतात. इतर ग्रामीण महिला याबाबत फारशा उत्साही दिसत नाहीत. कारण ग्रामीण भागातील १६ टक्के लोकसंख्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध असलेल्या केन्द्रापासून १० कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर राहते. (Velkoff and Adkakha, 1998) शहरी भागात ८० टक्के महिला घरगुती काम, बांधकाम, किरकोळ व्यापार यांसारख्या असंघटीत क्षेत्रात कार्यरत आहेत. या वर्गातील महिलांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते.

पोषक व संतुलित आहाराचे नियमित सेवन आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. त्यामुळे लोह, कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्वे प्राप्त होऊन शारीरिक प्रतिकारक्षमता वाढून आजारांचे नैसर्गिक निराकरणास मदत होते. अनेक अभ्यासाअंती असे निदर्शनास येते की, भारतीय महिलांच्या बाबतीत अपुरा व कमी पोषक आहार ही एक आरोग्याशी संबंधित समस्या आहे. पुरेसा पोषक आहार प्राप्त न झाल्याने अनेक आजारांना आमंत्रण मिळते. त्यामुळे पूर्णपणे शारीरिक विकास होत नाही. परिणामी अर्भक मृत्युदर व माता मृत्युदराचे प्रमाण वाढते. आदिवासी समाजात कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याने अर्भक मृत्युदर व माता मृत्युदराचे प्रमाणही जास्त आहे. केवळ आर्थिक संपन्नता हे लोकसंख्येच्या उत्तम आहारविषयक स्थितीचे कारण ठरत नाही. उदा. महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक विकसित राज्य असून सर्वाधिक दरडोई उत्पन्न असतानाही लोकांची आहारविषयक चित्र समाधानकारक नाही. कारण ग्रामीण आणि नागरी भागातील जवळपास ५० टक्के कुटुंबांना त्यांच्या आहारातून निर्धारित उष्मांक प्राप्त होत नाही. परिणामी कुपोषित लोकांचे प्रमाणही जास्त आहे. मुली व महिलांच्या बाबतीत तर ही

परिस्थिती अधिक गंभीर आहे. महिलांच्या पोषक आहाराकडे झालेल्या दुर्लक्षामुळे मातांकडून जन्मतः काही आजारांची लागण नवजात बालकांना होण्याचे प्रमाण वाढत आहे. १५ ते १८ वर्षे वय असणाऱ्या ५१.४ टक्के महिलांमध्ये रक्ताची कमी आहे. तसेच या वयोगटातील ४१ टक्के महिलांचे वजन पोषक आहाराअभावी कमी आहे. २० ते २२ वर्षे वय असणाऱ्या ४५.६ टक्के महिलांमध्ये रक्ताची कमी असून ३०.६ टक्के महिलांचे वजन पोषक आहाराअभावी कमी आहे. (Shukla, 2016) २००० मधील अभ्यासानुसार ७५ टक्के गर्भवती महिलांच्या रक्तात लोह कमतरता आढळली.

२०११ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या लैंगिक असमानता निर्देशांकानुसार जगातील १८७ देशांपैकी भारताचा क्रमांक १३४ वा होता. याचाच अर्थ भारतात लिंगभेदाचे प्रमाण प्राचीन काळापासून ते आजतागायत सुरुच आहे. भारतात मुलगा आणि मुलगी यातील भेदभाव त्यांच्या जन्मापूर्वीपासूनच सुरु होते. गर्भपातामध्ये मुलींची संख्या अधिक आहे. सोनोग्राफीसारख्या तंत्रामुळे गर्भलिंगनिदानामुळे स्त्री-भृणहत्याचे प्रमाण सातत्याने वाढते आहे. परिणामी ० ते ६ वर्षे बालक वयोगटातील लिंग गुणोत्तर म्हणजे दरहजारी प्रमाण झपाट्याने कमी होत आहे व ही प्रवृत्ती १९५१ ते २०११ पर्यंत कायम दिसते. तसेच शाळेत जाणाऱ्या मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या कमी असून शाळा सोडणाऱ्या मुला-मुलींमध्ये मुलींचीच संख्या अधिक आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीत तर ही परिस्थिती अधिक भयावह आहे. आहाराबाबतीतही लिंगभेद केला जातो. मुले व पुरुषांच्या तुलनेत मुली आणि महिलांचा आहार अपुरा व अयोग्य असतो. जोस यांच्या अभ्यासानुसार, अपुरा व अयोग्य आहाराची समस्या अविवाहित महिलांपेक्षा विवाहित महिलांमध्ये जास्त आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ६९ वर्षे होऊनही मुलगा-मुलगी, स्त्री-पुरुष यातील भेदभाव आजही कायम आहे. ग्रामीण भागात आणि आर्थिक व सामाजिकदृष्ट्या गरीब वर्गात तर हा फरक जास्त जाणवतो. या लिंगभेदाचा थेट परिणाम महिलांच्या आरोग्यावर परिणामी उत्पादकतेवर होतो.

संसर्गजन्य आजार ही एक मुख्य समस्या असून यांत प्रामुख्याने मलेरिया, क्षयरोग, एच.आय.व्ही. इत्यादींचा समावेश होतो. एच.आय.व्ही. हा एक गंभीर आजार असून जगातील अंदाजित ३३.४ दशलक्ष एच.आय.व्ही. ग्रस्त रुग्णांपैकी जवळपास ९५ टक्के रुग्ण विकसनशील राष्ट्रांत आढळतात. तर भारताचा याबाबतीत जगात तिसरा क्रमांक आहे. भारतात एच.आय.व्ही. ग्रस्त पहिला रुग्ण १९८६ मध्ये आढळला. तर नोव्हेंबर १९९९ पर्यंत त्यांची संख्या ९१,८०९ पर्यंत वाढली. (Kapilashrani, 2000) राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटनेच्या मते ही संख्या २००८-०९ मध्ये २.३९ दशलक्ष पर्यंत वाढली. यांत महिलांचे प्रमाण ३९ टक्के आहे. गरीबी, आर्थिकदृष्ट्या परावलंबन, रुढी व परंपरांचा पगडा, शिक्षणाचा अभाव, गर्भनिरोधक साधनांच्या वापराचा अभाव, जाणीवेचा अभाव यामुळे आजारपणाचे प्रमाण वाढताना दिसते. एच.आय.व्ही. मुळे मृत्युमुखी होण्यात महिलांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे.

**४. आरोग्य आणि सरकारची भूमिका :**

भारतात एकूण GDP च्या ५ टक्के खर्च आरोग्यावर होणे अपेक्षित असताना भारतात केवळ ०.९ टक्के सार्वजनिक खर्च आरोग्य सेवांवर होतो की जो विकसनशील राष्ट्रांच्या मानकापेक्षा खूप कमी आहे. हेच प्रमाण पाकिस्तान (१.० टक्के),

बांगलादेश (१.५ टक्के), श्रीलंका (१.८ टक्के) आणि भूतान (३.६ टक्के) इतके आहे. भारतात आरोग्यावर होणारा सार्वजनिक खर्च उत्तरोत्तर कमी होत आहे. केवळ ३५ टक्के लोकसंख्येला औषधोपचार सुविधा उपलब्ध आहेत. जवळपास २५ टक्के लोकसंख्या वाढत्या वैद्यकीय खर्चामुळे आरोग्यसेवेचा लाभ घेऊ शकत नाही. केवळ ३ टक्के लोकांकडे खासगी आरोग्य विमा उपलब्ध आहे. तर दुसरीकडे वयोवृद्ध लोकसंख्येचे प्रमाणही वाढत आहे. १९८१ ते २०१६ या कालावधीत हे प्रमाण ६.५ टक्के वरुन ९ टक्के पर्यंत वाढले आहे. तसेच एकूण सर्व लोकसंख्येच्या उत्तम आरोग्यासाठी सार्वजनिक खर्च वाढणे गरजेचे आहे. त्यासाठी सरकारची भूमिका महत्त्वाची ठरते. (Grewal, Malhotra & Ahmed, 2011)

भारतीय लोकांच्या राहणीमान पातळीत आणि आरोग्यस्थितीत सुधारणा करणे हे आर्थिक नियोजनाचे अनेक उद्दिष्टांपैकी एक मुख्य उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टाला अनुसरुन केंद्र सरकार व राज्य सरकारे प्रयत्नशील आहेत आणि काही प्रमाणात त्याला यशही आले आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत एकात्मिक आरोग्य विकास कार्यक्रमाचा एक भाग म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थापनेवर भर दिला. दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात पायाभूत आरोग्य सुविधा निर्मितीला प्राधान्य दिले. विविध आजारांवर व वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात कुटुंब नियोजन कार्यक्रमाला प्राधान्य दिले. चौथ्या पंचवार्षिक योजना काळात माता मुले यांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले व गर्भवती महिलांकरिता लसीकरणाचे ध्येय निश्चित करण्यात आले. पाचव्या पंचवार्षिक योजना काळात दारिद्र्य निर्मूलनाकरीता किमान गरजा कार्यक्रम सुरु करुन त्या माध्यमातून आरोग्याच्या दृष्टीने आहाराचे महत्त्व, पिण्याचे स्वच्छ पाणी, प्राथमिक शिक्षण, विद्युतीकरण आणि सर्वांकरिता आरोग्य यांवर भर देण्यात आला. सहाव्या पंचवार्षिक योजनेत मानवी विकास व्यूहरचना तयार करुन त्यात आरोग्य विषयक घटकांना प्राधान्य देण्यात आले. विविध आजारांच्या जसे, कर्करोग, हृद्यरोग, रक्तदाब, मधुमेह, ॲनेमिया इत्यादीच्या नियंत्रणाकरिता विशेषतः महिला आरोग्याला सातव्या पंचवार्षिक योजनेत महत्त्व देण्यात आले. आठव्या पंचवार्षिक योजनेत संसर्गजन्य आजारांच्या नियंत्रणासाठी प्राधान्य दिले गेले. नवव्या पंचवार्षिक योजनेत लोकसंख्या वृद्धीदर नियंत्रणासाठी प्राधान्य दिले गेले. दहाव्या पंचवार्षिक योजनेत संपूर्ण देशात आरोग्याच्या सर्वच पातळीवर जसे, आजारावर नियंत्रण, आजारांवर उपाय, पुनर्वसन इत्यादीवर भर देण्यात आला. अकराव्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) मार्फत ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुधारण्यास प्राधान्य देण्यात आले व कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला व बालके यांच्यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले. सद्यःस्थितीतील कार्यरत बाराव्या पंचवार्षिक योजनेत आरोग्यावरील खर्चात एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादन मूल्याच्या २.५ टक्के खर्च करण्याचे निर्धारित करण्यात आले आहे. (Singh 2012) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या धरतीवर राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) सुरु करुन नागरी भागातील आरोग्य सेवा सुधारण्याला प्राधान्य देण्यात आले. सहस्त्रक विकास ध्येयांना अनुसरुन दारिद्र्य व उपासमारीचे निर्मूलन, प्राथमिक

शिक्षण, लिंग समानता व महिला सबलीकरणाला प्रोत्साहन, बाल मृत्यूदरात घट, माता आरोग्यात सुधारणा, एच.आय.व्ही., मलेरिया सारख्या आजारांचे निर्मूलन, पर्यावरण शाश्वततेची खात्री आणि विकासाकरिता जागतिक भागीदारीला प्रधान्य याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारे प्रयत्नशील आहेत. देशात राबवण्यात येणाऱ्या सार्वजनिक आरोग्यविषयक कार्यक्रमांवरील वाढता खर्च आणि आरोग्यसेवांसाठी केलेली गुंतवणूक हे देशाच्या विकासाला प्रेरणा देणारे महत्त्वपूर्ण घटक आहेत. परिणामी या अनुषंगाने भारतात नियोजन काळात अर्भक मृत्यूदर, बालमृत्यूदर, माता मृत्यूदर कमी झाल्याचे व सरासरी आयुर्मान वाढल्याचे दिसून येते. मात्र असे असले तरी, विकसित राष्ट्रांच्या तुलनेने भारतातील लोकसंख्येची आरोग्यविषयक स्थिती आणि उपलब्ध आरोग्यविषयक सुविधा याबाबतीत भारत अजूनही बराच मागे आहे. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ जेन ड्रेन्झ आणि अमर्त्य सेन यांच्या मते, भारतातील एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनमूल्याचा वाटा व भारतातील सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधांवरील गुंतवणूक व खर्चाचा हिस्सा याबाबतीत भारत आफ्रिका खंडातील मागासलेल्या भागांच्या तुलनेत पिछाडीवर आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, भारतात अजूनही सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याबाबत पुरेशी जागरुकता निर्माण झालेली नाही. (रंजन रे २०१४)

**५. गुणात्मक आरोग्यासाठी उपाय :**

भारतीयांची आरोग्यविषयक स्थितीत गुणात्मक सुधारणा होण्याकरीता सहस्त्रक विकास ध्येयांना अनुसरुन अर्भक व बाल मृत्यूदरात घट, माता आरोग्यात सुधारणा, संसर्गजन्य आजारांचे निर्मूलन आणि आरोग्य विकासाकरीता केंद्र सरकार व राज्य सरकारे प्रयत्नशील आहेत. देशात राबवण्यात येणाऱ्या सार्वजनिक आरोग्यविषयक कार्यक्रमांवरील वाढता खर्च आणि आरोग्यसेवांसाठी केलेल्या गुंतवणूकीचा परिणाम म्हणून भारतात नियोजन काळात अर्भक मृत्यूदर, बालमृत्यूदर, माता मृत्यूदर कमी झाल्याचे व सरासरी आयुर्मान वाढल्याचे दिसून येते. मात्र असे असले तरी विकसित राष्ट्रांच्या तुलनेने भारतातील आरोग्यविषयक स्थिती आणि उपलब्ध आरोग्यविषयक सुविधा याबाबतीत भारत अजूनही बराच मागे आहे. आर्थिक विकासासाठी कौटुंबिक आरोग्याची प्रगती झाली पाहिजे. त्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक वाढविणे, संसर्गजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी उपाय आखणे, खाजगी क्षेत्राकडून आरोग्यविषयक सेवा विकत घेणे, आरोग्य निर्धारकांवर लक्ष केंद्रित करणे, सामूहिक आरोग्य विमा योजनेला प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागातील गरिबांना सवलतीच्या दराने आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे, विकासाच्या सार्वत्रिक प्रक्रियेत आरोग्य क्षेत्र विकासाला गती देणे, लिंगभेद दूर करणे, महिला व बालकांसाठी आरोग्य विमा संरक्षण देणे, पोषक आहाराचे महत्त्व पटवून देणे, संसर्गजन्य आजाराचे निराकरण करणे इत्यादी उपायांची आवश्यकता आहे. शासकीय प्रयत्नांबरोबरच समाजाची आर्थिक, सामाजिक आणि मानसिक बदलांची अत्यंत आवश्यकता आहे. आरोग्य क्षेत्राच्या गुणात्मक सुधारणेसाठी एकात्मिक दृष्टीकोन खूप महत्त्वाचा आहे. एकूण सार्वत्रिक विकासासाठी महिला व बालकांसोबतच निरोगी व आरोग्यसंपन्न समाज निर्माण करण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे.

**सारांश :**

राष्ट्राच्या प्रगतीचा एक अत्यावश्यक घटक म्हणजे राष्ट्रातील सर्व वयोगटांतील सर्व व्यक्तींचे उत्तम आरोग्य होय. कारण उत्तम आरोग्य तेथे प्रगती असे जगत्मान्य समीकरण आहे. सहस्त्रक विकास ध्येयांना अनुसरुन अर्भक व बाल मृत्यूदरात घट, माता आरोग्यात सुधारणा, संसर्गजन्य आजारांचे निर्मूलन, आणि आरोग्य विकासाकरिता जागतिक भागीदारीला प्राधान्य याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारे प्रयत्नशील आहेत. देशात राबवण्यात येणाऱ्या सार्वजनिक आरोग्यविषयक कार्यक्रमांवरील वाढता खर्च आणि आरोग्यसेवांसाठी केलेल्या गुंतवणूकीचा परिणाम म्हणून भारतात नियोजन काळात अर्भक मृत्यूदर, बालमृत्यूदर, माता मृत्यूदर कमी झाल्याचे व सरासरी आयुर्मान वाढल्याचे दिसून येते. मात्र असे असले तरी विकसित राष्ट्रांच्या तुलनेने भारतातील आरोग्यविषयक सद्यःस्थिती आणि उपलब्ध आरोग्यविषयक सुविधा याबाबतीत भारत अजूनही बराच मागे आहे. सार्वत्रिक आरोग्याचे महत्त्व जाणून काही ठोस धोरणे आखण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे.

**संदर्भ :**

1. 'Annual Re port to the people on Health', Government of India, Ministry of Health and Family Welfare, December 2011.
2. Grewal, Malhotra and Ahmed, 'Inclusive Growth in India: Past Performance and Future Prospects', Centre for Strategic Economic Studies, Victoria University, Melbourne, 2011.
3. 'Health and Development', A Compilation of articles from Finance and Development, International Monetary Fund, Washington, December 2004.
4. Investing in Health for Economic Development-Executive Summary, Report by the Mexican Commission on Macroeconomics and Health, 2004.
5. Kapilashrami M.C., 'Review of the present Health Status in India, Emerging Health problems and their solutions', Health and Population - Perspectives and Issues 23(1), 2000.
6. NHM, Health and Population Policies, Annual Report 2014-15.
७. पाटील सुभाष, 'मानवी संसाधन विकास', अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर २०१२, खंड ३६, अंक-२
८. रंजन रे, 'भारतातील बालस्वास्थ्य', योजना, फेब्रुवारी २०१४, वर्ष ४१, अंक-७.
9. S. Mahendra Dev, 'Inclusive Growth in India: Performance, Issue and Challenges', P.R. Dubhashi Public Lecture, Gokhale Institute of Politics and Economics, Pune, 2006.
10. Shulka Jyotsana, 'Social Determinants of Urban Indian Women's Health Status' 2016.
11. Singh Archana, 'Women's Health Status in Rural India', Unpublished Ph.D Thesis, Maharshi Dayanand University, Rohtak, February 2012.
12. Robert Groose and Oscar Harkavy, 'The Role of the Health in Development', Social Science and Medical, Vol. 14C, Pergamon Press Ltd. Great Britain, 1980.
13. Victoria A. Velkoff and Arjun Adlakha, 'Women's Health in India', Women of the World, International Programs Centre, December 1998.
14. Website - State Health Profile, NHM, Ministry of Health and Family Welfare, Government of India.

◆◆◆

## (कै.) प्रा. भास्कर ढाले स्मृती व्याख्यान

(वर्ष २ रे)

(कै.) प्रा. भास्कर ढाले स्मृती व्याख्यान अमरावती येथील के.एल्. महाविद्यालयात विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दि. १६/०९/२०१६ रोजी आयोजित केल्या गेले. डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी 'मानव विकास' या विषयांवर शास्त्रीय पद्धतीने सर्व मुद्यांचा समावेश करून विद्वताप्रचुर भाषण दिले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भांगडिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून परिषदेचे अध्यक्ष डॉ. एच्.आर.तिवारी होते. त्यांनी आपले विचार मांडलेत व डॉ. भांगडियांनी अध्यक्षीय भाषण केले.

परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. अंजली कुळकर्णी यांनी सुरूवातीस प्रास्ताविक व स्वागतपर भाषण केले. परिषदेचे सचिव डॉ. राजेश चव्हाण यांनी आभार मानलेत. या कार्यक्रमास माजी अध्यक्ष डॉ. दि.व्यं.जहागिरदार, प्रा. सुदा व प्रा. एस्.एस्.देशमुख, डॉ. वनिता चोरे तसेच परिषदेचे माजी सचिव डॉ. भांडवलकर आणि श्रीमती सरोजताई ढाले उपस्थित होते. या भाषणासाठी विद्यार्थी वर्ग व प्राध्यापकांची लक्षणीय उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रशांत काटोले व डॉ. सुरेश जगताप यांनी विशेष मेहनत घेतली.

## विनम्र श्रद्धांजली

डॉ. व्ही.एस. शेणवाई यांचे नागपूर येथे दि. ३० मे २०१६ रोजी दुःखद निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. शेणवाई हे नागपूरच्या बिंझाणी महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. प्राध्यापकी पेशात असतांना ते नुटा संघटनेत हिरहीरीने भाग घेत असत. अर्थशास्त्रासोबतच त्यांना साहित्य व संगीताचीही आवड होती. ते उत्तम वक्ता म्हणून प्रसिद्ध होते. १९८८-८९ मध्ये सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे भरलेल्या तेराव्या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या निधनामुळे परिषदेची अमरिमित हानी झाली आहे. त्यांच्या स्मृतीस परिषदेतर्फे विनम्र अभिवादन.

प्रा. डी.आर.अग्रवाल यांचे बऱ्हाणपूर मुक्कामी दि. ८-९-२०१६ रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. ते शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथून विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाले होते. प्रा.अग्रवाल हे अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. विद्यार्थ्यांमध्ये ते लोकप्रिय होते. महाविद्यालयाच्या विविध मंडळांवर त्यांनी यशस्वीपणे कार्य केले. इंग्रजी, हिंदी आणि मराठी साहित्यात त्यांना फार रूची होती. अर्थशास्त्र विभागाच्या चहा मंडळात ते नेहमी साहित्य व राजकारणावर भाष्य करीत. प्राध्यापकवृंद त्यांचे भाष्य मन:पूर्वक ऐकत व त्यास दाद देत. १९९६-९७ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित २१ व्या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या दुःखद निधनामुळे विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची न भरली जाणारी हानी झाली आहे. त्यांच्या स्मृतीस परिषदेतर्फे अभिवादन !

# Dr. Babasaheb Ambedkar's Economic Philosophy

**M. L. Kasare**
Wardha.

It is wellknown that Dr. Babasaheb Ambedkar was an academician and an economist by training. He was basically a social scientist. His life was a saga of great scholastic attainments. He believed that "Education is the key for all round development and it is a process through which the faculty of reasoning is developed among the human beings. He said that for all round development of the society. "Education and Economic resources are most essential."

Dr. Ambedkar studied in prestigious Universities of the world. He was M.A. and Ph.D. from Columbia University of U.S.A. He studied there 'Institutionalist Economics'. Further he studied in London School of Economics and Political Science. He studied there 'Classical Economics'. He was awarded M.Sc. and D.Sc. degrees in London.

For some time he was in Bonn in Germany where he studied 'Nationalist Economics'. His Ph.D. thesis was on 'The Evolution of Provincial Finance in British India'. His D.Sc. thesis was on 'The Problem of the Rupee : Its origin and Its solution'.

'The Evolution of Provincial Finance in British India' represents his contribution to the field of Public Finance. This dissertation analysed evolution of the Centre state financial relationship in British India.

The third Dissertation represents a substantial contribution to the field of Monetary Economics.

His nationalism reflected in all his Dissertations. He came to conclusion regarding the contribution of England to India. He boldly stated that "the immenseness of India's contribution to England as much as astounding as the nothingness of England's contribution to India. Both are, however true statesments if looked at from economic point of view".

According to him 'England's contribution lies in uneconomic realm - maintainance of peace, introduction of western education, building modern institutions including adminstrative and judicial systems and so on. However,"Whether mere animal peace is to be preferred to economic destination". He lets every one decide for oneself. It was his rare priviledge to get highest recognition in the academic field. Economics was his major area of study.

In the year 1925 the dissertation was published in the book form with the title,"The Evolution of Provincial Finance in British India". Dr. Ambedkar's full blooded nationalism reflected in this disseration. His Ph.D. supervisor Prof.E.R.A.Seligman appreciated his work. He opined "The problem discussed Mr. Ambedkar in his excellent dissertation is one of that is arousing a growing in all parts of the world. From the very beginning we find fiscal by both Central and local governments. The value of Ambedkar's contribution to this discussion lies in the objective recitation of the facts and the impartial analysis of the interesting development that has taken place in his native country. The lessons are applicable to other countries as well as, nowhere to my knowledge, has such a detailed study of the underlined principles been made." It wasa glowing tributes of a teacher to his student. His Ph.D. thesis provided academic basis for the Finance Commission of India which was subsequently established through Article 280 of the constitution to address problems of verticle and horizontal imbalances in finances. Advancing his argument further, Dr. Ambedkar forcefully advocated need of sound government for sound finance.

Dr. Ambedkar favoured undivided government with collective responsibility. This was, in his opinion, essential for financial soundness of economy. Now, can we derive any message from his thinking in today's context? We have accepted democratic form of government. So far as the financial structure is concerned, the central-state financial relations are not happy, to say the lest. The provision of appointment of Finance Commission is itself a contribution of Dr. Ambedkar . Even after more than six decades, the financial relations between centre and states are somewhat strained.

Dr. Ambedkar wrote another Thesis for the Degree of Doctor of Science "The problem of Rupee : Its origin and its solution". It was a bold attempt and has variously shown the sparks of originality. It

definitely takes a very deep study of the subject and courage of conviction to take on the stalwarts like Porf.Keynes.

So far as the exchange standard was concerned, he differed with Prof. Keynes in almost every respect. Dr. Ambedkar maintained that the exchange standard was inadequate to stabilize the general purchasing power of the rupee, rather it aggravated the disease. Unless the purchasing power of rupee was stabilized, the rupee itself could not be made stable. This was the fundamental fact overlooked by Prof. Keynes.

For keeping the rupee on stable basis, many experts had wished that the recommendations of the Fowler Committee should have been carried out in toto, Dr. Ambedkar on the other hand, severely criticized the principles of Fowler committee and remarked, "While some people regard that report as classical for its nonsense".

While disposing before Hilton Commission Dr. Ambedkar forcefully argued for the establishment of an independent mechanism to control the currency issue. It is to his credit that Reserve Bank of India was conceptualized by the guidelines of this thesis. That reserve bank of India was born in 1934.

Amartya Sen, Noble Laureate, paying glowing tribute to Dr. Ambedkar observed : "Dr Ambedkar is my father in Economics. His contribution to the field of economics is marvelous and will be remembered forever. He is true celebrated champion of more than what he have achieved."

Dr. Ambedkar's writings related to pre-independence India and reflects deep insight into the problems the country would encounter. He fully realized that the Indian society is not only agrarian but also characterized by caste hierarchy. Where in untouchables were placed at rock bottom. Therefore, Indian agriculture in pre-independence period can be correctly described as a subsistence occupation which yielded too little to live on and too much to die on. It was his ardent desire to treat agriculture as an economic enterprises. He wrote on small holding could not be enough remunerative but for that the absence of other factors of production were equally responsible. In either case it would affect the productivity.

He studied, "It was found that too much land was laying idle and the entire economy maladjusted. It was the high pressure on the land that was the evil and this inturn was due to the lack of industrialization. The development of non-

agricultural production industrial growth was thus the main solution to the problem of Indian agriculture. It is evident that he was fore ahead of his time. Dr. Ambedkar also warned the Indian Agricultural Economic base by quoting Sir Henry Cotton, "There is a danger of too much agriculture in India" Dr. Ambedkar pointed out. While other countries like U.S.A. starting as agricultural are progressively becoming industrial. India has been gradually undergoing the useful process of deurbanisation and swelling the volume of her rural population beyond all needs. The earlier we stem this ominous tide the better". With a view to solve the other agricultural problems, Dr. Ambedkar suggested nationalization of land, collective farming, economic holding of land or equal distribution of land, large scale mechanization, availability of capital, water seeds and fertilizers by the government, cultivation of waste land by allotting waste land to landless labours. Minimum wages to labours, control and regulation of private lenders of loan to farmers and insurance. Dr. Ambedkar found that caste system promoted slavery and uncontrolled exploitation of labour. Caste system denies economic security. Due to caste-ridden or traditional social order the lower strata of the society is deprived of security of in employment. The lower castes S.C., S.T., people become a prey of mental and physical servitude in compatible with the very essence of liberty. Men may well be free and yet remain unable to realize the purposes of freedom. Dr. Ambedkar noticed that in the name of division of labourers, the labour was exploited. While division of labours was acceptable proposition, division of labourers is condemnable because certain groups of the people (lower strata) were kept in servitude for centuries together as result of this classification. Under caste system. Dr. Ambedkar, therefore, struggled against that pernicious and cruel system. It is only because of this tendency that Indian society could not prosper socially and economically for centuries together. Dr. Ambedkar narrated the four reaching effects of caste system. This gave rise to economic immobility, economic retardation and ruined the spirit of entrepreneur capacity of the common masses. The society was caught by the tentacles of hydra-headed caste system and made it impossible to break the shackles of social and economic slavery. Dr. Ambedkar is the first Indian economics who very minutely studied the far reaching effects of caste system. He observed as

follows

1) Caste divides labour
2) Caste disassociates work from interest
3) Caste disconnects intelligence from manual labour.
4) Caste devitalized by denying to man the right to cultivate vital interest, and
5) Caste prevents mobilization

The division of labour is Smithian concept of free labour in a free society. But in India, Ambedkar said : "We have divided labour and division of labourers"(1) "By not permitting readjustment of occupation, caste becomes a direct cause of much of unemployment. We see in the country".(2)

Dr. Ambedkar has formulated a social theory of exploitation. If we study his economic thought, it would be possible to fully comprehend and appreciate the relevance of Ambedkar's economic development strategies for the downtrodden i.e. scheduled castes and schedules tribes. His analysis indicates
1) imposition of social economic religious and cultural disabilities on downtrodden. The second impact is on their economic deprivation and economic exploitation. Dr. Ambedkar has explicitly analysed the subjugation and economic exploitation of labour belonging to downtrodden. The downtrodden are totally manual labourers. Dr. Ambedkar stated, "The untouchable, while he is a free individual, had neither fair start, nor equal opportunity nor a square deal he is the last to be hired and the first to be fired. Untouchability is cruelty as compared to slavery". The Scheduled caste population is the zero asset owning and most poor and highly exploited section of the Indian society. It was forced to suffer social humiliation and socially disrespectful occupations for many centuries in India. In this regard Dr. Ambedkar stated, "the helpless and sapless condition of the depressed classes must be entirely attributed to the dogged and determined opposition of the whole mass of the orthodox population which will not allow the Depressed classes to have equality of status or equality of treatment. It is not enough to say of their economic condition that they are poverty stricken or they are a class of landless labourers, although both the statements are statements of fact. It has to be noted that the poverty of the Depressed classes is due largely to the social prejudices in consequence of which many an occupation for earning a living is closed to them".

Dr. Ambedkar advocated a rational taxation policy that was incorporated in the manifesto of his political party. Independent

Labour Party. The salient features of his taxation policy are :

i) tax shall be levied on the basis of the principle of ability to pay and not on income alone;
ii) tax shall be progressive in nature.
iii) regressive tax shall be avoided
iv) tax incidence on poor shall be avoided
v) tax shall not lead to lowering of standard of life
vi) Land tax shall be more flexible and its imposition on agricultural land shall be avoided
vii) Unequal and discriminatory tax systems shall be given up.

Dr. Ambedkar held the view that industrialization was necessary for the faster development of the country. He emphasized the need for establishment of large scale industries for producing essential goods for mass consumption which results in utilization of domestic raw materials, reduction in foreign dependence and elimination of unemployment. He advocated nationalization of large scale and key industries and promotion of small scale industries in the private sector. He suggested that insurance and transport companies shall be nationalized. Labour shall be given right to strike. The present Industrial Policy of India contains some of the views of Dr. Ambedkar. Dr. Ambedkar believed that the strategy for India's economic development should be based on eradication of poverty, elimination of inequities and ending exploitation of masses. He, therefore, very strongly advocated Democratic State socialism the element of which are :

i) all basic industries shall be owned and run by the state;
ii) Insurance and agriculture shall be nationalized;
iii) all the productive resources shall be maintained by the state
iv) Compensation for acquisition of land and industry shall be in the form of debentures
v) Land acquired by the state shall be distributed to the families, irrespective of castes and creeds in the village for collective farming.
vi) Discrimination as landlord, tenant and agricultural labourers shall be abolished
vii) all the inputs such as capital, seeds, fertilizer etc. shall be supplied by the state to the collective farming.
viii) adequate punishment shall be awarded to those who do not follow. In his 'States and Minorities' (a draft constitution which he submitted to the constituent assembly on behalf of

scheduled castes federation) he made the above proposal but they were not accepted by the Constituent Assembly.

He ferrently advocated his plan restructuring of Indian economy. He very strongly advocated state socialism. He puts, "the problem therefore, is to have state socialism without dictatorship, to have state socialism with parliamentary democracy. The way out seems to be to retain parliamentary democracy and prescribe state socialism by the law of the constitution so that it will be beyond the reach of parliamentary majority to suspend, amendor abrogate it. It is only by this that one can achieve the triple object, namely to establish socialism to retain parliamentary democracy and avoid dictatorship".

One can find from his memorandum, 'States and Minorities' that political democracy alone cannot give relief to the people, be they employed or unemployed. Dr. Ambedkar stated, "Political Democracy rests on four premises which may be set out as follows" :

i) the individual is an end in himself; ii) that the individual has certain unalienable rights which must be guaranteed to him by the constitution; iii) that the individual shall not be required to relinquish any of his constitutional rights as condition precedent to the receipt of a privilege; iv) that the state not delegate powers to private persons to govern others.

Any one who studies the working of the system of social economy based on private enterprise and pursuit of personal gain will realize how it undermines, if it does not actually violate, the last two premises on which Democracy rests. How many to relinquish their constitutional rights in order to gain their living? How many have to subject themselves to be governed by private employers?

It indicates that Dr. Ambedkar was conscious of the intimate connection between individual liberty and the shape and structure of the economic aspect of social life. Therefore, in order to make the principle of one man, one value real and operative, he wanted political democracy to be reinforced by economic democracy." The following quotation from his memorandum submitted to the constituent Assembly appropriately manifest his concern for giving a practical shape to the doctrine of one man, one value. He stated in his memorandum.

"The soul of Democracy is the doctrine of one man, one value. Unfortunately, democracy has attempted to

give effect to this doctrine only so far as the political structure is concerned by adopting the rule of one man, one vote which is supposed to translate into fact the doctrine of one man and one value. It has left the economic structure to take the shape given to it by those who are in position to mould it. This has happened because constitutional lawyers have been dominated by the antiquated conception that all that is necessary for the perfect constitution for democracy law which would make government responsible to the people by the government. Consequently almost all laws of constitution which relate to countries which are called democratic stop with adult sufferage and fundamental rights. They have never advanced to the conception that the constitutional law of democracy must go beyond adult sufferage and fundamental rights. In other words, old-time constitutional lawyers believed that the functional scope of constitutional law was to prescribe the shape and form of the political structure of the society. They never realized that it was equally essential to prescribe the shape and form of the economic structure of society, if democracy is to live up to its principle of one man one value. Time has come to take a bold step and define both the economic structure as well as the political structure as well as the political structure of society by the law of the constitution. All countries like India which are late-comers in the field of constitution -making should not copy the faults of other countries. They should profit by the experience of their predecessors"

The constitution of India did not include the most vital programme that was suggested by Dr. Ambedkar. Dr. Ambedkar said that 'socialism' as an aim of our national life, it needs indepth research as to why this was not accepted. As a strategy for economic development of India, he strongly emphasized state socialism for eradication of poverty, elimination of inequalities and ending exploitation of the masses. He preferred industrialization for absorbing surplus agricultural labour.

As Prof. G. Saibaba stated, "Indeed, Dr. Ambedkar may be regarded as one of the early Indian economists who introduced the ideas of institutional economics to the Indian economic studies. It is of great interest to note that Dr. Ambedkar has specialized in the legal basis of the Indian economic studies with an inter-disciplinary approach which is now developed in the recent years by the noble laureate Prof. Ronal Harry Coase, a product of London School of Economics. His

theoretical frame has strong roots in social cultural, political and historical approach."

As Justice Krishna Iyer paid rich tribute to Dr. Ambedkar's role as a 'creative iconoclast'.

Dr. Ambedkar played crucial role in national building. He emerged as an eminent policy maker of modern India some of his thoughts are gaining relevance in recent times on several policy measures, such as the founder of human development theory and architect of socio-economic democracy.

**References :**


1) Dr.M.L. Kasare : 'Economic Philosophy of Dr. B.R. Ambedkar' B.I. Publication - New Delhi. Pg. No. 33, 34, 83, 84, 96.
2) G.S. Lokhande : Bhimrao Ramaji Ambedkar, A Study in Social Democracy , Sterling Publishers Pvt. Ltd., AB/a Safdarjang Enclave, New Delhi. Pg. 38, 41, 42.
3) G. Saibaba : Relevance of Ambedkarism in India, Ambedkar As a theoretician and Policy Maker'. Pg. No. 90, 94.


◆◆◆

## (कै.) कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृती परिसंवाद (वर्ष २ रे)

विदर्भ अर्थशास्त्र परिषद, कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी अमरावती आणि वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांच्या वतीने संस्थेच्या ''स्वातंत्र्य सभागृहात'' कै. कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृती परिसंवाद (वर्ष २ रे) दि. १५-१-२०१६ रोजी आयोजित केल्या गेला. या परिसंवादाचा विषय 'भारतीय अर्थव्यवस्थेतील उदारीकरण - स्वरूप व परिणाम' असा होता.

परिसंवादाचे अध्यक्षस्थानी डॉ. विनायक देशपांडे, प्राध्यापक व्यवसाय प्रबंधन, रा.तु.म.नागपूर विद्यापीठ होते. परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार यांना प्रास्ताविक केल्यानंतर परिसंवादातील सहभाग तज्ञ व्यक्तींनी आपले विचार मांडलेत. डॉ. प्रशांत हरमकर, श्री. निखील अटाळे आणि श्री. जयदीप हार्डीकर या तीनही तज्ञ व्यक्तींनी उदारीकरणाच्या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण विवेचन केले. अखेरीस डॉ. गणेश मायवाडे यांनी आभार प्रदर्शन केले. या परिसंवादासाठी डॉ. खांदेवाले, डॉ. जहागिरदार, डॉ. अंजली कुळकर्णी हे विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष उपस्थित होते. तसेच विद्यार्थी व प्राध्यापकांनी सदर कार्यक्रमास लक्षणीय उपस्थिती होती. हा परिसंवाद आयोजित करण्यात डॉ. प्रमोद लाखे अर्थशास्त्र विभाग प्रमुख वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पहिला शोध प्रबंध – ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ इस्ट इंडिया कंपनी

**दि.व्यं.जहागिरदार**
प्रमुख संपादक 'अर्थमीमांसा'

**प्रास्ताविक :**

१४ एप्रिल २०१६ या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मास १२५ वर्षे पूर्ण झालीत. त्यानिमित्ताने विविध स्वरूपाचे कार्यक्रम भारतभर संपूर्ण वर्षात साजरे झाल्याचे आपणास माहित आहे. अनेकांनी त्यांच्या जीवनावर, त्यांच्या तत्वज्ञानावर आणि त्यांनी केलेल्या विविध चळवळींवर सखोल अध्ययन करून शेकडो ग्रंथ व लेख त्यांच्या कार्यावर लिहले आहेत. धनंजय कीर यांनी त्यांना 'विश्वभूषण' म्हणून गौरविले आहे. डॉ. बाबासाहेबांचा उदय हे आधुनिक भारताच्या इतिहासातील तेजस्वी आणि शाश्वत मूल्याचे दर्शन घडविणारे महान पर्व आहे.

डॉ. बाबासाहेब हे अत्यंत व्यासंगी होते व विशेष म्हणजे ते सतत वाचन व अध्ययनात मग्न असत. बुद्ध, कबीर आणि महात्मा फुले यांना त्यांनी गुरू मानले होते. या बरोबरच आपल्या जीवनात त्यांनी तीन उपास्य दैवते स्वीकारलीत, ती उपास्य दैवते आहेत. विद्या, विनयशीलता आणि शील संवर्धन. त्यांचे संपूर्ण जीवन संघर्षमय होते. ते म्हणाले होते की, मरणाची, सुखाची, दुःखाची, वादळाची अपमानाची पर्वा न करता एकसारखे झगडत राहतील ते धन्य होत. डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक विषयांवर विपुल लिखाण अभ्यासकांनी केले आहे. सभा संमेलनांमधून त्यांनी लिहलेल्या विविध विषयांवर मौलिक चर्चा होत असली तरी डॉ. आंबेडकर व्यक्ती म्हणून कसे होते हे त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंगातून सांगण्याची गरज असते. डॉ. आंबेडकरांचे वडीलही विधाव्यासंगी होते. त्यांच्या कुटुंबातील स्त्रियांनाही लिहता-वाचता येत असे. ही गोष्ट शंभर वर्षापूर्वीची आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. डॉ. बाबासाहेबांच्या शालेय जीवनातील व पुढील आयुष्यातील असे अनेक प्रसंग आहेत की जे सर्व नागरीकांपर्यंत विशेषतः विद्यार्थ्यांसमोर गेले पाहिजेत. सदर लेखाचा उद्देश त्यांच्या जीवनाचे विवेचन करणे नाही तरीही या बाबीचा जाणीवपूर्वक उल्लेख केला पाहिजे. यामुळे देशातील नागरीकांची राजकीय-सामाजिक तसेच सांस्कृतिक स्थितीची तौलनिक जाणीव वाढू शकेल.

**२) इस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्त :**

डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षण प्राप्त करतांना १९१५ मध्ये मास्टर ऑफ आर्टस पदवीसाठी 'Administration and Finance of East India Company' ह्या शीर्षकाखाली शोधप्रबंधिका सादर केली होती. तसेच पीएच्.डी.पदवीसाठी 'The Evolution of Provincial Finance in British

India' हा प्रबंध सादर केला होता. या प्रबंधाचे मार्गदर्शक सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ सेलीगमन होते. पुढे लंडन स्कूल ऑफ एकॉनोमिक्स येथून अत्यंत मानाच्या अशा डी.एस्सी. पदवीसाठी 'The Problem of the Rupee' हा प्रबंध सादर केला होता. वयाच्या केवळ २४ व्या वर्षी ही प्रबंधिका डॉ. बाबासाहेबांनी सादर केली होती. पीएच्.डी. आणि डीएस्.सी. पदवीसाठी सादर केलेले प्रबंध प्रसिद्ध झाले होते पण मास्टर ऑफ आर्टस् साठी लिहिलेले शोधप्रबंधिका बऱ्याच वर्षांपर्यंत वाचकांना उपलब्ध होत नव्हती. १९७९ मध्ये नागपूर येथील श्री. वसंत मून यांनी कोलंबिया विद्यापीठकडून ही शोधप्रबंधिका प्राप्त करून घेतली. १९८९ मध्ये महाराष्ट्र शासनाचे वतीने 'Dr. Babasaheb Ambedkar Writings & Speeches', Vol. 6 प्रसिद्ध झाल्यावर ही शोधप्रबंधिका सर्वसामान्य वाचकांना उपलब्ध होऊ शकली.

इस्ट इंडिया कंपनीचा कारभार पाहण्यासाठी कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्स होते. या कोर्टच्या वर्षातून चार वेळा (मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर) बैठका होत. दैनंदिन कामकाजासाठी २४ सभासदांची एक समिती (कोर्ट ऑफ डायरेक्टर्स) होती. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या अनुमतीने गव्हर्नर जनरलची नियुक्ती केली जाई. या गव्हर्नरला मदत करण्यासाठी सुप्रीम कौन्सिल होते. कंपनीच्या आर्थिक व्यवहारांचे अध्ययन कंपनीचे उत्पन्न व खर्च या दोन वर्गात करता येईल.

**(I) कंपनीचे एकूण उत्पन्न :**

इस्ट इंडिया कंपनीस भूमीकर वा जमीन कर (Land tax), अफूवरील, मिठावरील कर, कस्टम रेव्हेन्यू आणि अन्य मार्ग अशा विविध स्त्रोतांचा द्वारा उपत्न्न प्राप्त होत असे.

**अ) भूमी कर :**

इ.स. १७९२-९३ ते १८५५-५६ या कालखंडात कंपनीस मिळणाऱ्या करापासूनच्या उत्पन्नाची आकडेवारी या शोधप्रबंधिकेत आहे. विशेष म्हणजे ५ वर्षाचा कालखंड असा काळ मानून त्या पाच वर्षातील सरासरी भूमीकर दर्शविला असून विशेष म्हणजे एकूण कर उत्पन्नाशी त्याचे प्रतिशतही दर्शविली आहे.

पहिल्या ५ वर्षात अर्थात १७९२-९३ ते १७९६-९७ या कालखंडात सरासरी भूमिकर हा ४ कोटी ६८ लाख पौंड म्हणजे कंपनीच्या एकूण उत्पन्नाच्या ५०.२३ प्रतिशत होता. कंपनीच्या जवळपास ६४ वर्षांच्या कालखंडात कंपनीच्या एकूण उत्पन्नात भूमी या स्त्रोताचे महत्त्व सर्वाधिक होते. या करापासून प्राप्त उत्पन्न हे सर्वाधिक म्हणजे ६६ प्रतिशत एवढे अधिक तर ते किमान स्तरावर म्हणजे ३४ प्रतिशत होते. भूमिकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नात प्रतिवर्ष वाढ दिसत असली तरी ती वाढ जमिनीवरील कर दर वाढल्यामुळे झाली की कंपनीने अधिकाधिक जमीन ताब्यात घेतल्यामुळे मिळाली याबाबत निश्चित सांगता येत नाही. देशातील विविध प्रांतामध्ये ह्या कराचा दर कमी-जास्त होता. इ.स. १८३० मध्ये कर्नल बिग्ज यांनी असे म्हटले होते की, युरोप वा आशिया खंडात कोणत्याही शासकाने एवढा मोठा दर आकारला नव्हता. अगदी शेवटच्या शासकाने देखील बंगाल प्रांतात भूमी कराचा दर एवढा जास्त लावला नव्हता.

**ब) मिठावरील कर :**

बंगालमध्ये समुद्रपाणी उकळून मीठ प्राप्त केल्या जात असे. मुंबई इलाख्यात समुद्राचे पाणी

जमा करून साठवले जाई व सूर्यप्रकाशाने पाण्याची वाफ झाल्यावर मीठ गोळा केले जाई. पंजाब आणि राजपुतान्यात मिठाची तळे होती. बंगालमध्ये जो कोणी मीठ तयार करीत असे त्याला सक्तीने कंपनी सरकारलाच मीठ विकावे लागे. कंपनी त्या मीठावर कर बसवून स्वत: आणि मध्यस्थांच्या द्वारा मीठ विकत असे. मीठावरील कर हा कंपनीच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा असे. १७९२-९३ ते १७९६-९७ या पहिल्या पाच वर्षात कंपनीच्या एकूण उत्पन्नात मीठावरील कराचे उत्पन्न हे १४.९३ प्रतिशत होते. पुढे मात्र कंपनीचे उत्पन्न वाढत गेले. त्यामुळे या कराचा हिस्सा थोड्या प्रमाणात घटला. कंपनी सरकारच्या ६४ वर्षांच्या काळखंडात एकूण उत्पन्नात सरासरीने ११.०७ प्रतिशत हिस्सा मिठावरील करापासून प्राप्त झाला, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवून दिले आहे.

**क) कस्टम ड्यूटी :**

कंपनीला समुद्रमार्ग होणाऱ्या व्यापाराद्वारे कस्टम ड्युटी (आयात-निर्यात कर) प्राप्त होत असे. या सोबतच कंपनी सरकारच्या ताब्यातील भू-भागातून तत्कालीन संस्थानांमध्ये माल जातांना व येतांनाही कराद्वारे उत्पन्न प्राप्त होई. सर्वसाधारणत: कंपनीला या साधनाद्वारे एकूण उत्पन्नाच्या सरासरीने ६.२२ प्रतिशत प्राप्ती होत असे.

**ड) अन्य कर :**

कंपनी सरकारला स्पीरीट व मद्याच्या विक्रीपासून अबकारी कर (Excise Duty) प्राप्त होत असे. यासोबतच स्टॅम्प ड्युटी, ज्युडीशियल फी व संस्थानिकांपासून करारानुसार मिळणाऱ्या रकमा अशा अन्य स्रोतांपासून उत्पन्न प्राप्त होत असे. एकूण उत्पन्नात सरासरीने या करांद्वारे मिळणारे उत्पन्न हे जवळपास १६-१७ प्रतिशत असे.

कंपनीच्या एकूण उत्पन्नात भूमीकर हा सर्वाधिक उत्पन्न देणारा कर होता. तसेच मिठावरील कराचे प्रमाणही बरेच जास्त होते. बहुतांश कर हे अप्रत्यक्ष कर होते आणि स्वाभाविकपणे त्याचा भार शेतकरी व सामान्य जनतेवर पडला होता. मिठावरील कर पूर्णत: अन्यायकारक मानला पाहिजे.

**II) कंपनीचा खर्च :**

कंपनीचा खर्च पुढील महत्त्वाच्या बाबींवर होत होता. अ) कर गोळा करणाऱ्या प्रशासनावरील खर्च २) मिलीटरी व जलसेनावरील व्यय ३) पोलीस यंत्रणा, नागरी प्रशासन आणि न्याय व्यवस्था ४) सार्वजनिक स्वरूपाची कामे ५) भारतासाठी उभारलेल्या कर्जावरील (Bond Debt) व्याज ६) स्थानिक संस्थानांशी कंपनी जो करार केला असेल त्या करारानुसार कंपनीने केलेला खर्च ७) होम चार्जेस

कंपनीच्या कालखंडात एकूण खर्चापैकी ५० प्रतिशतपेक्षाही जास्त खर्च हा मिलीटरीवरील खर्च होता. नागरी प्रशासन, पोलीस यंत्रणा व न्याय व्यवस्था या घटकांवरील खर्च जवळपास २० प्रतिशत तसेच होम चार्जेसही लक्षणीय होते. कंपनीने काही महत्त्वपूर्ण सार्वजनिक कार्येही केलीत याचा उल्लेख करावा लागेल. कलकत्ता-पेशावर, कलकत्ता-मुंबई, मुंबई-आग्रा, रंगून-प्रोमे असे एकूण साडेतीन हजार मैलाचे रस्ते कंपनीने बांधलेत. कंपनीने चार हजार मैलांची तार यंत्राची व्यवस्थाही उभारली. डॉ. आंबेडकरांनी १७९२-९३ ते १८५७-५८ या दीर्घकाळातील कंपनीच्या उत्पन्न खर्चाची आकडेवारी आपल्या प्रबंधिकेत दिली आहे. या काळात काही वर्षे तूट आहे तर काही वर्षे आधिक्य आहे. तूट-

आधिक्याची वजावट केली तर असे दिसते की, ३२ मिलियन पौंड एवढ्या रकमेचे जे आधिक्य प्राप्त केले ते ब्रिटनकडे हस्तांतरित केले. या आधिक्यातून भारताचा कुठलाही फायदा झाला नाही. या रकमेतून अनेक विकास कार्ये सुरू करता आली असती. कंपनीने लढाईचा खर्च भागविण्यासाठी भारतात सार्वजनिक कर्ज उभारले.

**III) गोखले व मिठावरील कर :**

कंपनी सरकारच्या उत्पन्न स्त्रोतांचा विचार करतांना मिठावरील कर या स्त्रोताचा विचार करू. मिठावरील कर म्हणजे गरीबांच्या आर्थिक संकटात भर पाडणारी बाब मानल पाहिजे. कंपनी सरकारच्या अधिकारांचे निर्मूलन झाल्यावर ब्रिटीश साम्राज्यानेही मिठाच्या करावर भर दिलेला दिसतो. महात्मा गांधींचे राजकीय गुरू गोपालकृष्ण गोखले यांनी इम्पिरियल लेजेस्लेटीव्ह कौन्सिल मध्ये अंदाजपत्रकावर जी भाषणे दिलीत त्यांचा उल्लेख या लेखकाला करावासा वाटतो. २६ मार्च १९०२ मध्ये दिलेल्या भाषणात मिठावर लावलेला कर मागे घेण्याची सूचना केली होती व हा कर गरीबांना संकटात टाकणारा आहे असे म्हटले. मिठावर लावलेल्या कराबाबत ब्रिटीश उदारमतवादी व्यक्तींनीही नाराजी व्यक्त केल्याचा उल्लेख गोखल्यांनी केला. विशेषत: सर जॉन ग्रॉस्ट यांनी हाऊस ऑफ कॉमन्स मध्ये इंडियन बजेट वर भाषण करतांना (दि. १४ ऑगस्ट १८९०) म्हटले होते की जेव्हा शक्य होईल तेव्हा हा कर रद्द करावा. पण ब्रिटीश शासनाने हा कर रद्द केला नाही. इस्ट इंडिया कंपनीचेच धोरण ब्रिटीश साम्राज्याने स्वीकारले. मिठावर कर वाढविल्यानंतर देशात मिठाचा उपभोग घटल्याचे आकडेवारीद्वारा गोखल्यांनी दाखवून दिले. १८८६-८७ ते १८९०-९१ या पाच वर्षात मिठाचा उपभोग ३३.७२ मिलीयन मणावरून ३३.२८ मिलीयन मणापर्यंत घटला. पुढील दहा वर्षात (१८९१-९२ ते १९००-१९०१) हा उपभोग ६ प्रतिशत वाढला. पण वाढत्या लोकसंख्येच्या मानाने उपभोगात झालेली वाढ मंद असल्याचे गोखल्यांनी दाखवून दिले. भारतात मिठ उत्पादन शासनाचे नियंत्रणाखाली आणल्याने शासनाचा एकाधिकार निर्माण झाला. पूर्वी समुद्रकिनाऱ्या लगतचे असंख्य उत्पादक मिठ निर्माण करीत. मात्र आता हे उत्पादक मिठ उत्पादन करीनासे झाले. देशात मिठ उत्पादन सिमीत झाले. त्यामुळे मिठाची आयात करावी लागते. हा महत्त्वाचा मुद्दा गोखले यांनी १९०४-०५ च्या वित्तीय विवरणपत्रावर केलेल्या भाषणात (इम्पेरियल लेजेस्लेटिव्ह कौन्सिलच्या दि. ३० मार्च १९०४ चे भाषण) स्पष्ट केला. ही आयात १८९१-९२ ते १९०१-०२ या कालखंडात वाढली आहे. सरकारने आपला एकाधिकार मागे घेतला तर मिठाचे उत्पादन वाढून आयात करावे लागणार नाही. मिठावरील कर आणि मिठाच्या एकूणच प्रश्न सतत प्राधान्यक्रमाने पुढील काळातही चर्चेत राहिले व त्याची अंतिम परिणती शेवटी १९३० मध्ये महात्मा गांधींनी केलेल्या मिठाच्या सत्याग्रहात झाली.

**३) इंडिया ॲन्ड द ॲक्ट ऑफ १८५८ :**

इ.स. १८५७ मध्ये भारतात स्वातंत्र्य युद्ध झाले. त्यानंतर ब्रिटनच्या राणीने कंपनीचे राज्य बरखास्त केले व जाहीरनामा काढला. त्यामुळे भारतात ब्रिटीश सत्ता प्रस्थापित झाली. वास्तविक पाहता १८५७ पूर्वीपासूनच कंपनी ताब्यात घेणे वा तिचे निर्मूलन करून भारतातील सत्ता ब्रिटीश पार्लमेंटच्या नियंत्रणात आणण्यासाठी चालू झालेल्या

कारवाईचे डॉ. आंबेडकरांनी विवेचन केले आहे. येथे हे नमूद केले पाहिजे कि, प्रसिद्ध अर्थशास्त्र जे.एस्.भिल यांनी इस्ट इंडिया कंपनीचे निर्मूलन करू नये म्हणून एक पिटीशन ब्रिटीश पार्लमेंटच्या सभागृहात सादर केले होते. डॉ. आंबेडकरांनी १८५८ च्या कायद्यातील विविध कलमांचीही चर्चा केली आहे. इस्ट इंडिया कंपनीमुळे भारतावर सार्वजनिक ऋणाचा बोजा पडला होता. याची जबाबदारी ब्रिटीशांची नाही का असा प्रश्न मेजर विंगेट यांनी उपस्थित केल्याचे डॉ. आंबेडकरांनी नमूद केले आहे. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात कंपनीचा ४ कोटी पौंड एवढा खर्च झाला होता.हा खर्च इंग्लंडने सहन करावा असे ब्रिटीश पार्लमेंटमध्ये जॉन ब्राईट म्हणाले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या छोटेखानी(छापील ५० पाने) शोध प्रबंधिकेत विषय हाताळण्याची आणि योग्य निष्कर्ष काढण्याची विद्वता दर्शविली आहे. विशेषत: आकडेवारी सादर करण्यात त्यांनी अलौकिक कसब दर्शविले आहे. पहिल्याच संशोधन कार्यात त्यांनी उपजत प्रतिभेचा परिचय अर्थशास्त्राच्या तज्ञांना करून दिला. भारतीय व्यक्ती अर्थशास्त्रासारख्या विषयात लौकीक प्राप्त करू शकतो हे त्यांनी जगाला दाखवून दिले. पुढील संशोधन कार्याची ही यशस्वी नांदी ठरली.

**संदर्भ :**


१. Govt. of Maharashtra (1989) : Dr. Babasaheb Ambedkar - Writings & Speeches, Vol. VIII.

२. कुबेर वा.ना.(१९९८) : डॉ.आंबेडकर, विचारमंथन, सुगावा प्रकाशन, पुणे.

३. कविमंडन विजय (२०१२) : डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन, सुगावा प्रकाशन, नागपूर.

४. जहागिरदार दि.व्यं.(२०११) : आर्थिक जगत खंड ३, सेंटर फॉर एकॉ. ॲन्ड सोशल स्टडीज, अमरावती.

५. जाधव नरेंद्र (१९९२) : डॉ. आंबेडकर- आर्थिक विचार व तत्वज्ञान, सुगावा प्रकशन, पुणे.

६. जहागिरदार दि.व्यं. (२००८) : निमित्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचे, दै. हिंदुस्थान, १४ एप्रिल.

७. जहागिरदार दि.व्यं.(२०१५) : गोपालकृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार, अर्थसंवाद, जाने-जून २०१५.

८. Patwardhan R.P., Ambekar D.V.(ed.) (1962) : Speeches & Writings of Gopal Krishna Gokhale, The Deccan Sabha, Poona-2.


◆◆◆

# जमीन सुधारातील जल व्यवस्थापन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**गौतम खु. कांबळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, नागपूर.

जागतिकीकरणाच्या झपाट्यामध्ये जमीन सुधार ही संकल्पना हद्दपार केल्याचे अनेक संकेत व निरीक्षणे मिळतात. तरी स्वातंत्र्यानंतरच्या चाळीस वर्षामध्ये ही संकल्पना ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक उलथापालथ घडवून आणणारा एक परिणामकारक घटक म्हणून कृतिशील होती. देशातील शहरी क्षेत्राप्रमाणे ग्रामीण क्षेत्र सुध्दा अनेक प्रकारच्या असमानतांनी ग्रस्त होते. आंबेडकरांनी या ग्रमीण क्षेत्रातील वसाहतीयुक्त खेडयांना 'असमानतांची गटारे' असे संबोधलेले दिसून येते. त्यातही आर्थिक असमानतांचा विचार केल्यास असे आढळते की या भारतीय खेडयांमध्ये उत्पादनाची साधने मोठया जमीनदारांकडे पूर्णपणे केन्द्रीत झाली होती व सर्वहास शोषित-वंचित-बहिष्कृत समाज हा पूर्णपणे साधनहीन होता. हे चित्र आजही फारसे बदलले असल्याचे जाणवत नाही हे सत्य आहे.

संविधानाच्या दृष्टीक्षेपातील जमीन सुधार हा देशातील ग्रामीण क्षेत्रातील सर्व प्रकारच्या विषमता व विशेष करून सामाजिक व आर्थिक असमानता संपुष्टात आणण्याच्या उद्देशाने प्रेरीत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या जमीन सुधाराचे सुतोवाच आपल्या राज्य समाजवादाच्या बहुचर्चित संकल्पनेत पूर्वीच करून ठेवले. या जमीन सुधाराचे उद्दिष्ट केवळ ग्रामीणच नव्हे तर ग्रामीण व शहरी या दोन्ही भागातील असमानतेची प्रचंड दरी कालबध्द कार्यक्रमातून हळूहळू का होईना, कमी होऊन ती नष्ट व्हावी असे ही असणे गैरलागू नव्हते. हे त्यावेळी अत्यंत कठीण व स्वप्नवत वाटत असले तरी ते अशक्य नव्हते याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व धनंजयराव गाडगीळ यांच्यासारख्या द्रष्टया अर्थतज्ञांना होती. म्हणूनच त्यांचा जमीन सुधाराचा आग्रह कायमस्वरूपी दिसून येतो.

देशात जमीन सुधार हा जमीन वितरणापर्यंतच मर्यादित ठेवला गेला ही वस्तुस्थिती आहे. जमीन वितरणाच्या कूळ कायदे, कमाल भूधारणा (सिलिंग), भूदान व जबरन जोत या चारही माध्यमांमध्ये जमीन वितरण ही प्रथम कृती असल्यामुळे तिला प्राधान्य दिले गेले व ते एका मर्यादेपर्यंत संयुक्तिक होते. मात्र जमिनीसंदर्भातील इतर सुधार कार्यक्रमाचा विचार त्यावेळी केला गेला नाही ही वस्तूस्थिती आहे. एक समाजाभिमुख अर्थतज्ञ म्हणून आंबेडकरांचा जमीन सुधाराबाबतचा दृष्टीकोन पार्श्वभूमी म्हणून समजून घेणे आवश्यक ठरते. त्यांच्या मतानुसार शेती ही राष्ट्रीय उद्योग म्हणून स्थापित होण्याची गरज आहे. म्हणजेच जमिनीची

मालकी ही सरकारची असावी आणि जे लोक शेतीमध्ये काम करण्यास इच्छूक असतील त्यांनी सामुहिक/सामुदायिक/सहकारी किंवा गट शेतीपद्धतीने जमीन कसावी, जेणेकरून ग्रामीण क्षेत्रामध्ये जमीनदार, सीमांत शेतकरी व शेतमजूरांच्या स्वरूपात असलेली प्रचंड उतरंड व त्यातून निर्माण झालेली भीषण असमानता कायमस्वरूपी नष्ट होईल. ज्यांना शेती करायची असेल त्यांना जमीन वितरण वरील शेती पद्धतीअंतर्गत करण्यात शासनाने पुढाकार घ्यावा यादृष्टीने सर्वप्रथम त्यांच्या जमिनी जिथे असतील तिथेच त्यांच्या मिश्र वसाहती बसवाव्यात, जेणेकरून ग्रामीण क्षेत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या जातिव्यवस्थेचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने भारतीय समाजाचे पाउल पडेल. ज्यांना शेती करायची असेल त्यांना शिक्षण शेतीशिक्षण-प्रशिक्षण, पैसा उभा करण्याचे व तो टिकवून ठेवण्याचे व्यावहारिक शिक्षण सरकारने द्यावे; त्यांना किमान तीन वर्ष पुरेल इतका (शेती कसण्यासाठी व कुटुंब पोसण्यासाठी) पैसा शासनाने द्यावा. शेतीसाठी लागणारी उत्पादन साधने-बियाणे, खते, सिंचनसुविधा, दळणवळण, बाजार, प्रत्यय (कर्जे) शेतीप्रक्रियांवर आधारित छोटी उद्योग-धंदे-व्यवसाय हे ग्रामीण भागात, शेततळी-गावतळी, जोडरस्ते, पांदणरस्त्यांची निर्मिती, शेतीवर आधारित कौशल्य-तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या संस्था, ग्रामीण रोजगार क्षमता वाढवण्यावर प्राधान्य, ह्या सगळया शेतीक्षेत्रातील आधारभूत संरचना निर्माण करण्याची नैतिक व संवैधानिक जबाबदारी शासनाचीच आहे असे स्पष्ट संकेत आंबेडकरांनी दिले होते. आज याप्रमाणेच जमीन सुधार देशात झाला व तो अद्यापही सुरूच आहे, अशा प्रकारची भूमिका अनेक तज्ञ व राजकीय नेतृत्व घेत असले तरी ते अर्धसत्यच प्रदर्शित करणारी भूमिका ठरते. कारण या सगळया सुधाराचा एक कालबद्ध कालावधी असला पाहीजे तरच तो परिणामकारक व फलदायी ठरणारा असू शकतो असे आंबेडकरांना वाटत होते. जमीन वितरणानंतरचे असे अत्यावश्यक सुधार कालबद्ध पद्धतीने देशात येवू शकले नाहीत. म्हणूनच हा कृति कार्यक्रम प्रभावी ठरण्याऐवजी निष्प्रभ व म्हणूनच अयशस्वी ठरल्याचे निष्कर्ष पुढे येतात.

शेती क्षेत्रमध्ये सिंचनसुविधा हा अत्यंत प्रभावी व परिणामकारक घटक मानला जातो. या घटकामुळे शेतीची उत्पादकता किमान अडीच ते तीनपट वाढण्याच्या शक्यता निर्माण होते. आंबेडकरांचे यासंदर्भातील चिंतन लक्षात घेता असे दिसते की, आंबेडकरांनी १९४२ते १९४६ या काळात केन्द्रामध्ये श्रम, जल व विद्युत मंत्री असताना आर्थिक योजना, जल व विद्युत विकासात मूलभूत व महत्वाचे योगदान केले. अर्थातच त्यांनी पायाभरणीचे कार्य केले. त्यांनी केन्द्रात प्रथमच जल व विद्युत विकासासाठी धोरण ठरविले, केन्द्रात त्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय यंत्रणा निर्माण केली, विद्यूत पुरवठा विभाग स्थापन केला. महत्वाचे म्हणजे दामोदर, हिराकुंड व सोन नद्यांवरील धरणे बांधण्याची प्रक्रिया सुरू केली. त्याकाळी कोणत्याही क्षेत्रामध्ये काम करणारी किंवा कार्यभार स्विकारणारी व्यक्ती ही त्या क्षेत्रातली सखोल तज्ञ असावी ही इंग्रज सरकारची आवश्यक अट होती. म्हणजेच आताच्या सारखी राजकीय पार्श्वभूमी ही अहर्ता म्हणून वापरण्याची इंग्रज सरकारची वृत्ती नव्हती हे वेगळे सांगण्याची खरे तर गरज नाही. यावरून बाबासाहेबांची योग्यता व मूलभूत कार्य लक्षात येते. आंबेडकरांचे

देशातील बहुउद्देशीय जल प्रकल्पात इतके योगदान असूनही त्यांचे विशाल जल प्रकल्प ही पहिली आवड नव्हती हे लक्षात घेणे आवश्यक आहे त्यांनी ग्रामीण क्षेत्रातील सिंचन सुविधेचा सुद्धा विचार करताना गरीब व पददलितांवर तसेच पूरनियंत्रण, जलसिंचन, नौकानयन व विद्युत, जलमार्ग याकरिता आंतरराज्यीय जलमार्गाचा विकास हया दोन बाबी केन्द्रस्थानी मानल्या होत्या. त्यांच्या या चिंतनातून भारतीय ग्रामीण क्षेत्राला शेततळी, गावतळी, छोटी-छोटी बांध-बंधारे ज्यातून जमिनीतील पाण्याची पातळी टिकून राहील तसेच वृक्षसंवर्धन, छोटया-मध्यम-मोठया नद्या जोडप्रकल्प, सौरउर्जा प्रकल्प, अशा शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरू पाहणाऱ्या अनेक योजना उदयास येण्याची क्षमता आहे आणि हे सगळे 'जमीन सुधारा' च्या परिक्षेत्रात समाविष्ट करायला पाहिजे अशी त्यांची आग्रही भूमिका दिसून येते. अर्थातच अशा 'जमीन सुधाराकडे' शासनाचे, समाजाचे व नेतृत्वाचेसुद्धा प्रचंड दुर्लक्ष होत आहे अशी निरीक्षणे दृष्टीक्षेपात येतात. डॉ. अमर्त्य सेन यांनी तर 'जमीन सुधाराकडे, अक्षम्य दुर्लक्ष' असे निरीक्षण नोंदवल्याचे दिसून येते. त्यांनी या दुर्लक्षाचा प्रत्यक्ष संबंध दारिद्र्याशी जोडला आहे. आंबेडकरांनी सुद्धा ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्य निर्मूलनावर एकमात्र उपाय म्हणून अशा जमीन सुधारांकडे पाहिले होते. असा 'जमीन सुधार' स्वातंत्र्यानंतरच्या साठ वर्षातसुद्धा जन्म घेवू शकला नाही, ही दु:खद वस्तुस्थिती जाणून घेणे म्हणूनच महत्वाचे आहे.

शेती ह्यासंबंधीची वस्तुस्थिती अशी आहे की, देशातील ३२.८७ करोड हेक्टर्स भूमीपैकी केवळ १३.९५ कोटी हेक्टर्स जमिनीवर देशात शेती केली जाते. देशामध्ये हे प्रमाण ४२ प्रतिशत आहे. छोटयाश्या जपानमध्ये हे प्रमाण ७० प्रतिशत आहे. तरीसुद्धा जगातील शेतीक्षेत्रामधील फळउत्पादनामध्ये भारत सर्वोच्च स्थानावर आहे. जगातील १५ प्रतिशत फळांचे उत्पादन एकटया भारतात होते. मात्र जागतिक फळनिर्यातीमध्ये त्याचे योगदान केवळ ०.५ प्रतिशत आहे. भाजीपाला निर्मितीत देश जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र जागतिक निर्यातीमध्ये त्याचे योगदान केवळ १.७ प्रतिशत आहे. तो एकूण उत्पादनाच्या केवळ १० टक्के भाजीपाला उत्पादनासाठी शित गोदामाची सुविधा पुरवू शकतो. देश जगामध्ये सर्वाधिक कमी उत्पादन खर्चामध्ये फळे व भाजीपाला निर्माण करीत असतो. पण ते उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न सर्वात कमी आहे. त्याला आत्महत्या कराव्या लागत आहेत. दुग्ध उत्पादनामध्ये तो जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तरीसुद्धा त्याच्याजवळ केवळ १३ प्रतिशत उत्पादित दुध उत्पादना- करिता संघटित दुग्धशाळा आहेत. जवळपास ९ कोटी टन दुग्धउत्पादनापैकी केवळ ७०.००० टन दुधासाठी शीतगृहाची सुविधा देशात उपलब्ध आहे. देशी गाईची उत्पादकतासुद्धा बरीच कमी आहे. तरी पशुधनामध्ये जगात तो दुसऱ्या क्रमांकावर आहे. एवढे असूनसुद्धा ५५०० नोंदणीकृत व २५७७० असंघटित कत्तलखान्यामध्ये गोठवणे-शीतगृहाच्या कुठल्याही आधुनिक सुविधा देशात नाहीत. जगामध्ये अंडयांचा उत्पादक म्हणून त्याची पाचव्या क्रमांकावरील ख्याती आहे. तरीसुद्धा हे उत्पादन देशातील केवळ किरकोळ बाजारातच विकले जाते. मत्स्यनिर्मितीत देश सहाव्या क्रमांकावर आहे, तरीसुद्धा त्यात २० ते ३० प्रतिशत हानी होत असून पं. बंगाल, गोवा व आंध्र प्रदेश सारख्या समुद्रकिनाऱ्या लगतच्या राज्यात कुठलीही शीत-

गोदाम व्यवस्था नाही. जागतिक व्यापार संघटनामध्ये भारताचा प्रक्रियित अन्नाचा सहभाग केवळ १.६ प्रतिशत आढळतो. फळे आणि भाजीपाला बाजारामध्ये ८८ प्रतिशत अतिरिक्त उत्पादन आहे. त्यासाठीच्या योग्य संरचनेच्या अभावामुळे येथील शेतकरी माल नष्ट होण्याच्या भितीने लगेच माल विकून टाकतो. यातील २५ ते ३५ प्रतिशत हानीचा विचार करता ती दरवर्षी ४५,००० कोटी रू. च्या घरात जाते. ती युनायटेड किंगडमच्या एकूण उपभोगाएवढी आहे. अन्नधान्यामधील अतिरिक्त उत्पादनसुद्धा ६० प्रतिशत आहे. त्यातील हानी ही ऑस्ट्रेलियाच्या अन्नधान्यातील उत्पादनाएवढी आहे.

जमीन सुधाराकरिता बरेच अनुकूल मुद्दे देशात अस्तित्वात आहेत, उदा. पर्याप्त कृषी पर्जन्य स्थिती, राजकीय स्थिती, शक्तीशाली उपभोक्त्यांचा आधार तर दुसरीकडे प्रतिकूल मुद्यांची सुद्धा कमतरता नाही. उदा. कमजोर व प्रभावहीन पुरवठा, श्रृंखला, उपभोक्त्यांच्या इच्छेनुसार उत्पादनाचा अभाव, सिंचन व उर्जेसारख्या पायाभूत उद्योगांचा न झालेला विकास, किंमतवाढीची कमी पातळी, पीककापणीमधील हानी, अशिक्षित-अप्रशिक्षित मजूरवर्ग, प्रभावी जमीन सुधाराकरिता यादोन्ही प्रकारच्या मुद्यांवर चिंतन करण्याची गरज आहे.

भारतातील सिंचनातील दुरावस्था निश्चितच गंभीर स्वरूपाची आहे. अजूनही देशात ग्रामीण क्षेत्रातील ४० प्रतिशत लोकांना पिण्याचे पाणी पर्याप्त प्रमाणात मिळत नाही. म्हणजेच पिण्याच्या शुद्ध पाण्याचा प्रश्न आपण अजूनही निर्णायकपणे सोडवू शकलो नाही. जेव्हा की २००४ पर्यंत अनेक अस्तित्वात असलेल्या योजनांद्वारे हा प्रश्न निकालात काढू असे आमचे उद्दिष्ट होते. मात्र अजूनही ८ प्रतिशत पाण्याचे घरगुती स्त्रोत आच्छादित नाहीत. पूर्वी जलस्त्रोत माथ्याकडून सखल भागाकडे बंधाऱ्याद्वारे अडवून धरण्याची लोकनिती होती. ती आता जवळपास उलटया दिशेने म्हणजे उताराकडून माथ्याकडे नेण्याचे शासकीय धोरण आहे. त्यामुळे देशातील शहरी क्षेत्राला त्यातील उद्योगाला पाणीपुरवठा करण्यासाठी व त्यांची उर्जेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मोठमोठी धरण आम्ही बांधत आहोत, ग्रामीण क्षेत्राला पर्याप्त पाणीपुरवठा करण्यासाठी व शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी याचा उपयोग अगदी नाममात्र किंवा कागदोपत्री स्वरूपाचा आहे, असे दिसते. त्याचप्रमाणे सिंचित क्षेत्रातील भूक्षरीत होत असलेली भूमी, पाण्याचा वाढता उत्पादनखर्च, भुजल पातळीतील पाण्याच्या स्त्रोताचे वाढते दोहन, पाण्यामध्ये मिसळत असलेले रासायनिक खते, औषधे व मानवी मलमूत्र तथा जनावरांचे मलमूत्र असे आरोग्याला व पर्यावरणाला अत्यंत हानीकारक अशा पदार्थांचे मिसळण ही आमच्यासमोरील मोठी आव्हाने सतत वाढतच आहेत, असेच निष्कर्ष काढले जावू शकतात. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील असंतोष आता सुप्त सवस्थेत असला तरी जलसिंचनातील सुविधांअभावी शेतीतील उत्पादकता मोठया प्रमाणात प्रभावित होत आहे व त्याचे गंभीर परिणाम ग्रामीण जीवनावर भविष्यात पडणार आहेत. याविषयीची जाणीव, जागृतीच पुढे निर्णायक ठरणार आहे. ग्रामीण क्षेत्रासाठी ना पाणी, ना जमीन, ना उर्जा अशा अत्यंत भयानक अवस्थेत ग्रामीण समाज असंख्य असमानतांसह जीवन जगत आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.

आज जमीन सुधारातील जलव्यवस्थापन व इतर मुद्दे सुद्धा शेती विकासात समाविष्ट असल्याची ग्वाही दिली जात असली तरी मुळात जमीन सुधार

व शेती विकास हया एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे सुद्धा लक्षात घ्यावे लागेल. शेती विकास हा स्थिती व ध्येयधोरण निर्देशित करतो तर 'जमीन सुधार' हा ग्रामीण क्षेत्रातील कृतिकार्यक्रम स्पष्ट करतो. अशावेळी तो या क्षेत्रात अत्यावश्यक असणाऱ्या जल व्यवस्थापनासह प्रभावी व यशस्वी करायचा असेल तर खालील बाबी लक्षात ठेवाव्या लागतील.

१. डॉ. आंबेडकरांच्याविषयीच्या चिंतनाचा विशेष करून ग्रामीण समाजामध्ये प्रसार करावा.
२. 'गांव तिथे तळी' हा मुलाधार घेऊन प्रत्येक खेडयात पिण्याच्या पाण्यासाठी व शेती-पशुधन- उर्जा यासारख्या विविध उपयोगांसाठी दुसरे असे किमान दोन तळे निर्माण करण्यावर भर द्यावा लागेल, जेणेकरून देशातील अंदाजित साडेपाच लाख गावांमध्ये किमान अकरा लाख तळे निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवावे लागेल.
३. छोटछोटया नाल्या- नद्यांचे पाणी लहान बंधाऱ्याद्वारे अडवून पावसाच्या पाण्याचा एक विशेष स्त्रोत निर्माण करण्यावर लक्ष द्यावे जेणेकरून भूजलपातळी टिकून राहील.
४. उंच भागाकडून सखल भागाकडे वाहणाऱ्या नद्यांना विशाल धरण बांधण्याऐवजी बंधारे बांधून ठिकठिकाणी पाणी अडवण्याची व ते जिरवण्याच्या योजनोचा आग्रह धरावा लागेल.
५. विहिरींसोबत निदान पाच सहा शेते मिळून एक मध्यम शेततळे उभारणे जेणेकरून भूजलपातळी, शेतीला पाणीपूरवठा व मत्स्यशेतीला (जोडधंदा) पोषक असे वातावरण निर्माण होईल.
६. पर्यावरणाच्या संतुलनासाठी व शेतकऱ्याला अधिकचे उत्पन्न जोडण्याच्या तसेच जलसंवर्धनाच्याही दृष्टीने वृक्षरोपण व संवर्धनाच्या योजनांचा आग्रह धरावा लागेल.
७. जमीन सुधार व जल व्यवस्थापनाबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागासोबतच शहर भागातील नवी पिढी जोडून घेणे, जेणेकरून ही लोकचळवळ होऊ शकेल.
८. ग्रामीण क्षेत्रामध्ये श्रमावर आधारित कार्यसंस्कृती स्थापित करण्याचे निरंतर प्रयास करावे लागतील.
९. शेतीवर आधारित जोडधंदे, प्रक्रियाउद्योग-व्यवसाय या दृष्टीने एक व्यावसायिक व उत्पादक म्हणून नविन पिढीला प्रोत्साहित करता येईल.

''यासाठी आवश्यक असणाऱ्या एका सामाजिक चळवळीच्या उभारणीतच उद्याच्या ग्रामीण भारताचे उज्वल भवितव्य आहे असे वाटते. परंतु याकरिता ग्रामीण समाज, शासन, राज्यकर्ते व बुद्धीवंत यांच्या प्रबोधनाची व क्रियाशीलतेची आत्यंतिक गरज आहे. ''

**संदर्भसूची :**


१. डॉ. सेन अमर्त्य, 'हंगर अँड पब्लिक ॲक्शन'१९७९, ऑक्सफोर्ड इंडिया पेपरबुक्स,जयासिंग रोड, नवी दिल्ली.
२. डॉ. थोरात सुखदेव, 'बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान' सुगावा प्रकाशन ५६२, सदाशिव पेठ, पुणे.
३. रॉय अरूंधती, ''बहुजन हिताय.........?'' जन आंदोलनाचा राष्ट्रीय समन्वय द्वारा केमिकल मजदूर सभा, दादर पूर्व मुंबई,१४.
४. डोर्नर पिटर, १९७२ लँड रिफॉर्म अँड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट', पेंग्विन बुक्स लिमिटेड, हॉर्मोन्सवर्थ मिडलसेक्स, इंग्लंड.
५. बंसिल पी. सी. वॉटर मॅनेजमेंट इन इंडिया', (नेटवर उपलब्ध).


◆◆◆

# विमुद्रीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था

**उमेश भा.घोडेस्वार**
पोस्ट डॉक्टरल फेलो (आय.सी.एस.एस.आर.नवी दिल्ली)
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला.

**प्रास्ताविक:**

विमुद्रीकरणाला इंग्रजीमध्ये Demonetization असे म्हटल्या जाते. विमुद्रीकरणालाच निष्चलीकरण, निमुद्रीकरण, पैशीकरण किंवा नोटांची अदलाबदली असे सुध्दा म्हटल्या गेले. भारतात ''रिझर्व्ह बँकेच्या १९३६ च्या कायद्यातील २६ व्या कलमानुसार सरकारला एका चलनाच्या जागी दुसरे वैध चलन दिल्यावर कुठलेही कायदेशीर चलन रद्द करण्याचा अधिकार आहे.'' भारतात या अगोदर १९३८, १९४६, १९५४ व १९७८ ला विमुद्रीकरणाचे आर्थिक प्रयोग झालेले आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा जगातील अनेक देशात विमुद्रीकरणाचे प्रयोग झालेले दिसून येतात. मात्र विमुद्रीकरणासाठी आवश्यक परिस्थिती असल्यासच अर्थव्यवस्थेमध्ये हा आर्थिक प्रयोग यशस्वी ठरतो असा अनेक देशातील अनुभव आहे. नोव्हेंबर २०१६ ला भारतामध्ये करण्यात आलेल्या विमुद्रीकरणासाठी काळा पैसा, दहशतवाद, बनावट नोटा व भ्रष्टाचार तसेच राजकोषीय तूट ही कारणे सरकारव्दारा वर्तविण्यात आली. या दृष्टीकोनातून विमुद्रीकरणा संदर्भात संमिश्र प्रतिक्रिया दिसून येत असल्या तरी राजकीय वादापेक्षा देशात अनुकूल परिस्थिती व निरपेक्ष सरकारी यंत्रणा राबविली गेली तर विमुद्रीकरणातून संपत्तीचे विक्रेंद्रीकरण तसेच आर्थिक सुधारणा घडून येवू शकतात.नाहीतर प्रतिकूल परिणामांची संभाव्यता नाकारता येवू शकत नाही.

'जेव्हा सरकारचा देशातील चलनावर अविश्वास व्यक्त होतो व देशामध्ये अतिस्फितीजन्य परिस्थिती निर्माण होते; भ्रष्टाचार, काळा पैसा, बनावट नोटांतून दहशतवात इत्यादींचे प्रमाण वाढते तेव्हा विमुद्रीकरण करणे अर्थव्यवस्थेच्या आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अनिवार्य असते.'

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विमुद्रीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था या संदर्भात विवेचन करतांना विमुद्रीकरणाचा अर्थ व व्याख्या, पार्श्वभूमी, विमुद्रीकरणाची कारणे, विमुद्रीकरणाचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम तसेच विमुद्रीकरणाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक उपाय या सर्व बाबींचा थोडक्यात उहापोह केलेला आहे.

**विमुद्रीकरणाचा अर्थ व व्याख्या : Meaning and Definition of Demonetization)**

विमुद्रीकरण हा आर्थिक शब्द असून दोन शब्दापासून तयार झाला आहे. एक 'वि'आणि दुसरा 'मुद्रीकरण' यावरुन 'वि' म्हणजे पुन्हा तर 'मुद्रीकरण' म्हणजे नोटांचे मुद्रण करणे.

मुद्रीकरणामध्ये नवीन नोटाच छापल्या जातात तर विमुद्रीकरणामध्ये आहे त्या नोटा रद्द करुन त्या जागी नवीन नोटा छापल्या जातात.

'सरकारला देशातील चलन बदलणे आवश्यक वाटल्यास कायदेशीररित्या जुन्या चलनाच्या जागी नविन चलन प्रतिस्थापित करण्याच्या प्रक्रियेला विमुद्रीकरण असे म्हणतात.'

"Demonetization is necessary whenever there is a change of national currency. The old unit of currency must be retired and replaced with a new currency unit."

**भारतातील विमुद्रीकरणाची पार्श्वभूमी (Background of Demonetization in India)**

भारतातील विमुद्रीकरणाला ७८ वर्षाचा इतिहास असल्याचा दिसून येतो. सर्वप्रथम ब्रिटीश राजवटीमध्ये १९३८ मध्ये १०,००० रुपये किंमतीची नोट छापली गेली म्हणजे मुद्रीकरण करण्यात आहे. पुढे दुसऱ्या महायुध्दाच्या काळात भारतातील उद्योजकांनी प्रचंड पैसा कमावला मात्र त्यापासून करमहसूल प्राप्त झाला नाही म्हणून १९४६ मध्ये १०,००० रुपये व १००० रुपये किंमतीच्या नोटेचे विमुद्रीकरण करण्यात आले. १९५४ मध्ये १०,०००, ५००० व १००० रुपयांच्या नोटा पुन्हा चलनामध्ये आणल्या गेल्या. तसेच १९७८ मध्ये प्रधानमंत्री मोरारजी देसाई यांच्या कार्यकाळात १०,०००, ५००० व १००० रुपयांच्या नोटांचे विमुद्रीकरण करण्यात आले. या वर्षी ५००० व १०००० रुपयाची नोट चलनातून काढून टाकण्यात आली. १९८७ ला ५०० रुपयाची नोट चलनामध्ये आली. तसेच २२ जानेवारी २०१४ रोजी रिझर्व्ह बँकेने २००० सालापूर्वीच्या ५०० व १००० रुपयाच्या नोटा बदलून देण्याची घोषणा केली होती. मात्र ही नोटा बदलण्याची प्रक्रिया होती. तर नोव्हेंबर २०१६ मध्ये १००० व ५०० रुपयाच्या नोटांचे विमुद्रीकरण करुन नविन ५०० व २००० रुपयाच्या नोटा चलनात आणल्या गेल्या.

जागतिक स्तरावरील Financial Action Task Force ने मोठया नोटांचा वापर अंमली पदार्थ तस्करी, मानवी तस्करी, खंडणी इ.साठी होत असल्याची माहिती केंद्र सरकारला दिली. National Crime Records Bureau (NCRB) ने मोठया चलनातील नोटा बनावट तयार केल्या जात असून यामध्ये नोटा तयार करणाऱ्या कंपन्या दहशतवादाला त्यांचा पुरवठा करीत असल्याची गुप्तचर माहिती सरकारला दिली. पुणे येथील अर्थक्रांती प्रतिष्ठानने गेल्या १६ वर्षापासून कर पध्दतीत बदल, बँक व्यवहार कर, मोठया नोटा बदल करणे, रोखीच्या व्यवहारावर कुठलाही कर नाही आणि २००० रुपयापर्यंतच्या रोखीच्या व्यवहारावर कर नसावा असे पाच प्रस्ताव सुचविलेले होते. यातील तिसरा प्रस्ताव शासनाने लागू केला. तसेच २०१६ ला प्रधानमंत्री व्दारा Income Discloser Scheme-IDS व Voluntary Income Discloser Scheme-VIDS हया दोन योजना लोकांना आपली अघोषित व बेकायदेशीर संपत्ती घोषित करण्यासाठी लागू केल्या. सप्टेंबर २०१६ ला या योजनांची मुदत संपणार होती. मात्र या योजनांना पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही IDS योजनेअंतर्गत ५६ हजार कोटी तर VIDS अंतर्गत फक्त ९७६० कोटी रुपये संपूर्ण देशभरातून प्राप्त झाले. चलनातील १००० ₹ च्या

नोटेचे प्रमाण–३९.५४% तर ५०० ₹ चे प्रमाण ४५.००% होते. मोठया नोटांचे संग्रहण शक्य असल्याने त्यापासून करमहसूल मिळत नाही परिणामी महागाई वाढून लोकांची क्रयशक्ती कमी होते. तसेच आपली अर्थव्यवस्था आज १५० लाख कोटी रुपयाची आहे. यातील ४५ लाख कोटी व्यवहार रोखीने चालतात यातील ४० लाख कोटी व्यवहार काळा किंवा अनअकाउंटट होता. या सर्व पार्श्वभूमीवर विमुद्रीकरण करण्यात आले.

विमुद्रीकरणाच्या निर्णयाअंतर्गत ५०० व १००० रुपयाच्या नोटा ८ नोव्हेंबर २०१६ ला सरकारने रद्द केले. म्हणजेच ८६ टक्के चलन बाद केले. ३१ डिसेंबर पर्यंत विशिष्ट बँकींग नियमांच्या अधिन राहून जुन्या नोटा सरकारने जमा करवून घेतल्या. ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत ९० टक्क्यांपेक्षा जास्त जुने चलन याव्दारे प्राप्त झाले. मात्र भारतात नोटा छपाई करणाऱ्या कारखाण्यांची नोट छपाईची क्षमता मर्यादित म्हणजे महिन्याला ३०० कोटी असल्याने बाद केलेल्या चलनाच्या जागी नवे चलन येण्यासाठी जास्त कालावधी लागू शकतो. त्यामुळे बँकांपुढे व एटीएम पुढे आपल्याला रांगा असलेल्या दिसून येतात. कमी कालावधीत चलन व्यवहारात यावे म्हणून २००० रुपयाची मोठी नोट छापण्यात आली. २००० रुपयाच्या ४ लाख कोटी तर ५०० रुपयाच्या ६ लाख कोटी रुपयाच्या नवीन नोटा छापण्यात आल्या.

**विमुद्रीकरणाची कारणे :**

**(Causes of Demonetization) :**

भारतातील २०१६ च्या विमुद्रीकरणाची कारणे पुढीलप्रमाणे दिसून येतात.

१. बनावट नोटा व दहशतवाद : भारतात २०१५–१६ मध्ये २९.६४ कोटीबनावट नोटा होत्या. त्यांचा उपयोग दहशतवादासाठी होतो. ५०० व १००० हया मोठया नोटांसाठी डेलारु हया ब्रिटीश कंपनीकडून भारत व पाकिस्तान या दोन्ही देशाला नोटांचा कागद पुरविला जात असे त्यामुळे पाकिस्तान, नेपाळ या देशातून बनावट नोटा छापून दहशतवादाला पुरविण्यात येत असत.

२. समांतर अर्थव्यवस्थेवर नियंत्रण : काळा पैसा, बनावट नोटा इ. च्या माध्यमातून भारतात समांतर अर्थव्यवस्था चालते. त्यातून महागाई वाढून नागरिकांची क्रयशक्ती कमी होवून अर्थव्यवस्थेची गती मंदावते. उच्च शिक्षण, आरोग्य, घरे इ.घटकांची किंमत वाढत राहते. इ. कारणांमुळे विमुद्रीकरणाचे पाऊल उचलले गेले.

३. काळा पैसा : भारतात नोकरशाहीमध्ये भ्रष्ट व्यवहार, लाचलुचपत यामधून सरकारी पैसा मोठया नोटांच्या स्वरुपात चोरला जातो. त्याशिवाय चोरलेल्या काळया पैशांचे रुपांतर काळया संपत्तीमध्ये गुंतवूणक म्हणजे जमीन, प्लॉट, सोने यामध्ये केले जाते. आपला बेहिशेबी पैसा बँकेत ठेवला तर कपात केली जाईल या भितीने लोक पैसा इतरत्र गुंतवितात.

४. राजकोषीय तूट : भारताचा अर्थसंकल्प तूटीचाच आहे म्हणजे उत्पन्न कमी व खर्च जास्त अशी स्थिती आहे. २०१६–१७ चा अर्थसंकल्प १९.७० लाख कोटी रकमेचा असून जमा महसूल मात्र फक्त १३.७७ लाख कोटीचा आहे म्हणजे ५.९३ लाख कोटीची तूट आहे. करमहसूल सुध्दा १६ टक्क्यांच्या

आसपास आहे. त्यामुळे काळया पैशातून कर चोरला जातो त्यामुळे विमुद्रीकरणातून यावर नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला गेला.

५. कॅशलेस व्यवहारांना चालना : भारतात ८० टक्केपेक्षा जास्त व्यवहार रोखेने होतात या रोख व्यवहारातून योग्य अंकेक्षण न होता कर बुडविला जातो. त्यामुळे विमुद्रीकरणातून पुढे कॅशलेस व्यवहाराकडे सरकारला अर्थव्यवस्थेचे संक्रमण करायचे आहे. त्यामुळे कॅशलेस व्यवहारांना चालना देण्यासाठी विमुद्रीकरण करण्याचे सरकारने योजिले.

६. व्याजदर कमी करणे : भारतातील बँकांमध्ये बुडीत कर्जाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे लोकांना कर्जे देण्यासाठी पुरेशी तरलता नसल्यामुळे आकारण्यात येणारा व्याजदर जास्त होतो. त्या दृष्टीकोनातून महागाई व व्याजदर कमी करण्यासाठी विमुद्रीकरण करण्यात आले. ज्याव्दारे बँकांकडे मुद्रापरिमाण वाढून कर्जासाठी पुरेसा निधी मिळेल.

**विमुद्रीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे अनुकूल परिणाम :**

**(Favourable effects of Demonetization on Indian Economy) :**

भारतातील २०१६ मध्ये करण्यात आलेल्या विमुद्रीकरणाचे काही अनुकूल परिणाम दिसून येत आहेत तर काही अनुकूल परिणाम नजीकच्या काळात दिसून येतील. हे अनुकूल परिणाम पुढीलप्रमाणे –

१. वित्तीय समावेशनात वाढ : विमुद्रीकरणामुळे बँकांचे महत्व लोकांना पटू लागले आहे. त्यामुळे बँकेत खाती असणे किती महत्वाचे याची जाणीव होत आहे. रंगराजन समितीने वित्तीय समावेशनाशिवाय दारिद्र्य निर्मूलन होणार नाही असे सूचविले होते. या समितीच्या शिफारसीनेच 'जन धन योजना' लागू केली. यामधून काढण्यात आलेली खात्यांचा उपयोग करण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. जनधन योजनेंअंतर्गतच्या बँक खात्यांची संख्या २२ कोटींच्या वर गेली आहे. विमुद्रीकरणानंतर बहुतांश काळा पैसा या बँक खात्यांमध्ये जमा होण्याची शक्यता आहे.

२. काळया पैशावर नियंत्रण : विमुद्रीकरणामुळे काळा पैशा ज्यांच्याकडे आहे अशा लोकांवर नियंत्रण येण्यास मदत होत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणावर काळा पैसा हा ५०० व १००० ₹ च्या नोटांच्या स्वरुपात निर्माण होतो त्यामुळे या मोठया नोटांवर तातडीने आणलेली बंदी काळया पैशाविरुध्द टाकलेले पाऊलच ठरते.

३. रोख व्यवहारांवर नियंत्रण : भारतात ८० टक्क्यांपेक्षा जास्त व्यवहार रोखीने होतात. विमुद्रीकरणाच्या या निर्णयामुळे रोख व्यवहारांवर काही प्रमाणात नियंत्रण आले आहे. पारंपारिक बँकिंगबरोबरच स्मार्ट बँकींग, क्रेडिट-डेबिट कार्ड, ऑनलाईन व्यवहार यासारख्या पारदर्शक व्यवहारांना चालना मिळत आहे.

४. कॅशलेस व्यवहारांना चालना : भारतात ८० टक्केपेक्षा जास्त रोखेने होणाऱ्या व्यवहारांवर नियंत्रण येवून योग्य ऑडीट-अंकेक्षण होवून करमहसूल वाढू शकतो. त्यामुळे विमुद्रीकरणातून पुढे कॅशलेस व्यवहारांना चालना मिळू शकते. यामध्ये मोबाईल वॉलेट,

इंटरनेट बँकींग, डेबिट/क्रेडीट कार्ड इत्यादीव्दारा पारदर्शक व्यवहार होवू शकतील.

५. खातेदारांची माहिती कायमस्वरुपी बँकांकडे : विमुद्रीकरणामुळे खातेदारांची कायमस्वरुपी माहिती-डेटाबेस सरकारकडे उपलब्ध होतील. आर्थिक व्यवहार जसजसे अधिकाधिक पारदर्शक आणि कायदेशीर नोंदींनी होवू लागतील, तसतसे लोक सुरुवातीला भीतिने नंतर त्यांना व्यवस्थेवर विश्वास निर्माण होवून स्वयंप्रेरणेने कर भरु लागतील.

६. करमहसूलात वाढ : विमुद्रीकरणामुळे पैशाच्या वापरावर नियंत्रण येत असल्यामुळे करचुकवेगिरी, करबुडव्यांनाही आळा बसू शकेल. विमुद्रीकरणातून कॅशलेसकडे वाटचाल केल्यास सरकारच्या करमहसुलात वाढ होवू शकते.

७. रोजगारात वाढ : रोख व्यवहारांकडून कॅशलेसकडे अर्थव्यवस्थेची वाटचाल सुरु होणार असून हयामधून रोजगारात वाढ होवू शकते. कॅशलेस व्यवहारांची सेवा देणाऱ्या कंपन्या नोकरभरती करु शकतात. त्यामुळे सॉटवेअर इंजिनिअर्स, कर्मचारी यांना मागणी येवू शकते. तसेच बँकांची संख्या देखील वाढून यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची भरती केली जावू शकते.

**विमुद्रीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे प्रतिकूल परिणाम :**

**(Adverse effects of Demonetization on Indian Economy) :**

अल्पकाळात विमुद्रीकरणाचे प्रतिकूल परिणाम दिसून येतीलही मात्र दिर्घकाळात अनुकूल परिणाम दिसून येतील असे बऱ्याच अभ्यासकांकडून सांगितले जात आहे. मात्र भारताचे माजी प्रधानमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांनी विमुद्रीकरणाच्या परिणामासंदर्भात अर्थतज्ञ प्रो.जे.एम.केन्स यांचे अर्थशास्त्रातील We all dead in long period हे वाक्य वर्तविले आहे. त्यामुळे अनुकूल परिस्थिती व निरपेक्ष सरकारी यंत्रणा राबविली गेली नाही तर विमुद्रीकरण दीर्घकाळात सुध्दा अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल प्रभाव घडवून आणू शकते. विमुद्रीकरणाचे प्रतिकूल परिणाम पुढीलप्रमाणे -

१. चलन तुटवडा : भारतीय अर्थव्यवस्थेत १००० व ५०० रुपयाच्या नोटेचे प्रमाण अनुक्रमे ३९.५४% व ४५.००% इतके होते. म्हणजेच मोठया नोटांचे प्रमाण जवळपास ८६% इतके होते. विमुद्रीकरणानंतर ८६ टक्के चलनाचा तुटवडा निर्माण झाला त्यामुळे १०० रुपये व त्याखालील नोटा व चलनावर दाब येवून व्यवहार करणे अवघड झाले. चलनतुटवडा म्हणून मागणी कमी-म्हणून पुरवठा कमी-म्हणून किंमत कमी-म्हणून उत्पादन कमी-म्हणून नफा कमी-त्यामुळे गुंतवणूक कमी असे चक्र अल्पकाळात दिसून आले.

२. सर्वसामान्य लोकांवर परिणाम : विमुद्रीकरणामुळे अर्थव्यवस्थेतील ८६ टक्के चलन काढून टाकल्याने चलनतुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे त्याचा परिणाम सामान्य माणूस, छोटे व्यापारी, भाजीविक्रेते, फेरीवाले, ड्रायव्हर, कामगार इ.असंघटित क्षेत्रातील लोकांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. कारण व्यवहारांसाठी चलनच नाही परिणामत:

जनजीवन अल्पकाळात तरी विस्कळीत झाले आहे. बँका व एटीएम पुढील रांगा त्यामुळेच दिसून येत आहेत.

३. नाशिवंत भाजीपाला, अन्नपदार्थामध्ये अव्युत्पादनाची स्थिती : महाराष्ट्रातील मनमाड, नाशिक, लासलगाव, येवला शहरामध्ये मागणी नसल्यामुळे कांदे, वांगे, टमाटे हे फेकून देण्यात आले. कारण त्यांना चलनतुटवडयामुळे मागणीच नव्हती. त्यांची अतिउत्पादनाची स्थिती निर्माण झाली.

४. बँक कर्मचारी वर्गांवर ताण : भारतात केवळ ५२ टक्क्यांच्या आसपास लोक बँकींग करतात. त्यामुळे ८६ टक्के चलन अर्थव्यवस्थेतून काढून घेतल्यामुळे नोटा बदलण्याची प्रक्रिया बँकेतूनच होणार होती. भारतात १३२ कोटी नागरिकांसाठी फक्त बँकांच्या शाखा १,३८,६२६ आहेत यातील २/३ शाखा महानगर व मोठया शहरात तर १/३ शाखा ग्रामीण भागात आहेत त्यामुळे आहे त्या बँकांवर व तेथे काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गांवर ताण पडला.

५. सीमांत शेतकरी व शेतमजूरांवर परिणाम : रब्बी पिकांच्या काळात विमुद्रीकरणाचा निर्णय झाल्याने बियाणे, खते, औषधे खरेदीसाठी पैसे नाहीत. नोटांच्या तुटवडयांमुळे दररोजची शेतमजूरी व सीमांत शेतकऱ्यांचा शेतमाल विक्री होण्यात अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे शेती क्षेत्रात मंदिसादृष्य परिस्थिती निर्माण झाली.

६. मंदीसादृष्य परिस्थिती : वस्तू, अन्नधान्य, शेतमाल, इॅलेक्ट्रानिक्स वस्तू, किराणा माल तसेच बस, रेल्वे इ.वाहतूक प्रभावित झाली. कारण हे सर्व व्यवहार व दळणवळण रोख व्यवहारांवरच अवलंबून असल्याने हे सर्व व्यवहार अल्पकाळात ठप्प झाले. त्यामुळे मागणी कमी म्हणून पुरवठा कमी त्यामुळे किंमती कमी अशी मंदिसादृष्य परिस्थिती निर्माण झाली.

७. जीडीपी मध्ये घट होण्याची शक्यता : अर्थव्यवस्थेमध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादन व उत्पन्न हे प्रभावित होवून त्यामध्ये १ टक्क्यांपर्यंत घट होवू शकते. कारण संघटित, असंघटित क्षेत्र, प्राथमिक क्षेत्र, सेवा क्षेत्र इत्यादी घटकांमधील व्यवहार बहुतांश या निर्णयामुळे प्रभावित झाले आहेत, मागणी कमी म्हणून पुरवठा व किंमती कमी झाल्या आहेत. त्यामुळे जीडीपी कमी होवू शकतो.

**मूल्यांकन :**

थोडक्यात भारतीय अर्थव्यवस्था अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. जसे शरीरात रक्त तसेच अर्थव्यवस्थेत पैसा. त्यामुळे पैसा अशुध्द झाल्यास त्यावर ऑपरेशन करणे गरजेचे आहे. मात्र अर्थव्यवस्थेच्या हया ऑपरेशनासाठी योग्य उपाय करणे आवष्यक होते. याचा विसर सरकारला पडलेला दिसून येतो. हया ऑपरेशनसाठी आधीच कॅशलेस व्यवहार आणणे, वित्तीय समावेशन म्हणजे बँकींग वाढविणे, आर्थिक साक्षरता, यासारखी साधनांची आधीच पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक होते. अर्थव्यवस्थेतील विमुद्रीकरण हा भ्रष्टाचार, काळा पैसा, पैशांचा गैरव्यवहार, दहशतवाद, बनावट नोटा या समस्यांवर उपाय म्हणून महत्वपूर्ण आहे. लोकांना यापुढे कॅशलेसची सवय पाडून घ्यायची असल्यास

सरकारी पातळीवर उपाय करायला पाहिजेत. आधार कार्डाप्रमाणे बँकींग अनिवार्य करणे, रोखचे व्यवहार कमी करणे, प्रत्येक व्यवहारांची नोंद होणे, टॅक्स भरणे, ऑडीट करणे, बिले यांची ऑनलाईन नोंद होणे असे उपाय करता येवू शकतात. यासाठी करप्रणाली बदलावी लागणार जेणेकरुन कर देणे हे सक्तीचे न वाटता लोक हसतखेळत कर देतील व करचोरी करणार नाहीत. तसेच सरकारी महसूलासाठी 'बँक व्यवहार कर' लागू करावा. तसेच मोठ्या चलनाच्या नोटांचे उच्चाटन करणे आवश्यक आहे. असे झाले तरच आर्थिक पारदर्शकता येईल व कर महसूलात वाढ होवून संतुलित बजेट होईल आणि शिक्षण-आरोग्य-सामाजिक सुरक्षा यासाठी पुरेसा निधी मिळू शकेल. यासाठी अनुकूल परिस्थिती व निरपेक्ष सरकारी व प्रशासकीय यंत्रणा राबविली गेली तर विमुद्रीकरणातून संपत्तीचे विक्रेंद्रीकरण तसेच आर्थिक सुधारणा घडून येवू शकतात.

**संदर्भ :**


1. Arun Kumar(Jan.2007),Economic Consequences of Demonetization, Money Supply and Economic Structure EPW Vol.52, Issue No.1, 07 Jan, 2017.
2. J.Dennis Rajakumar, S.L.Shetty (Nov.2016), Demonetisation:1978, the Present and the Aftermath, EPW Vol.51, Issue No.48,26 Nov,2016.
3. Deodhar Rahul (Nov.2016), Black Money and Demonetization, Research Paper available at SSRN, New York USA.
4. Frontline magazine Dec.2016-Frontline Pvt.Ltd. New Delhi
5. इंडिया टुडे डिसेंबर 2016
6. https://www.arthakranti.org
7. https://www.investopedi.com
8. https://www.finmin.ac.in
9. https://www.rbi.org
10. https://www.nipfb.org.in


◆◆◆

# विमुद्रीकरण : एक आढावा

**वनिता चोरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, चांदूर बाजार

**प्रास्ताविक :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सर्वत्र महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून बघीतले जात आहे. असा निर्णय दि. ८ नोव्हेंबर २०१६ ला मा. पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांचा नोटबंदीचा निर्णय. देशामध्ये चलनातील जास्त मूल्यांचे चलन म्हणजे ५०० व १००० ₹ च्या नोटा रद्द करणे म्हणजे चलनातून या नोटा संपूर्णपणे हद्दपार करणे होय.

अर्थव्यवस्थेतील बदलानुसार वेळोवेळी पतधोरणांशी संबंधीत मौद्रिक धोरण केंद्रीय अधिकोषांद्वारे आखले जाते. वेळोवेळी काही बदल सुचविले जातात. जागतिक पातळीवर रूपयाचे अवमूल्यन, उर्ध्वमूल्यन होते. प्रत्यय नियंत्रित करण्यासाठी जुने चलन रद्द करणे. नवीन चलन मुद्रीत करणे या उपायांचा अवलंब केला जातो. परंतु कुठल्याही गोष्टीचा उहापोह न करता अचानक दि. ८ नोव्हेंबर २०१६ च्या रात्री १२ नंतर ५०० ₹ व १००० ₹ चलन रद्द करण्याचा निर्णय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होईल या दृष्टीने सार्वत्रिक चर्चेचा विषय झाला आहे. याचाच एक भाग म्हणून विमुद्रीकरणाचा परामर्ष या शोध निबंधाद्वारे घेत आहे.

**विमुद्रीकरण संकल्पना :**

अर्थव्यवस्थेमध्ये अनेक मौद्रिक स्थित्यंतरे होत असतांना पूर्वीच्या मुद्रा चलनातून बाद करणे व नवीन मुद्रानिर्मिती करणे म्हणजे विमुद्रीकरण होय. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये यापूर्वी देखील अनेक वेळा जिर्ण झालेल्या मुद्रा चलनातून रद्द करण्याचे निर्णय घेतले आहे. देश पातळीवर आर्थिक स्थिती नियंत्रणात आणण्याकरिता विमुद्रीकरणाचे निर्णय घेतले जातात. त्यामुळे विमुद्रीकरणाद्वारे सामाजिक कल्याणामध्ये वाढ होणे, लोककल्याण अपेक्षित असते. विषमता कमी करण्याकरिता सुद्धा विमुद्रीकरण केले जाते.

**विमुद्रीकरण स्वरूप :**

विमुद्रीकरणाद्वारे विषमता कमी करणे, सामाजिक हित अभिप्रेत आहे. यावेळी मा. पंतप्रधानांनी प्रामुख्याने खालील तीन बाबी स्पष्ट केल्या आहेत. १) काळा पैसा बाहेर काढणे २) दहशतवादावर नियंत्रण ३) नकली नोटांवर अंकुश लावणे. एकूणच देशाची विस्कटलेली आर्थिक स्थिती सुधारण्याचा आशावाद, सरकारच्या उत्पन्नात वाढ, दहशतवादावर नियंत्रण ही मुख्य उद्दीष्टे असले तरी प्रामुख्याने आजपर्यंत याचे परिणाम काय दिसून येतात हे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रस्तुत प्रमुख मुद्यांचा ऊहापोह करण्याच्या अनुषंगाने अ) काळा पैसा ब) दहशतवाद क) नकली नोटा ड) आर्थिक विकासदर यांचे विवेचन करू.

विमुद्रीकरणामुळे सामाजिक जीवनावरील

परिणामांचा विचार होत आहे का? लोकांचे कल्याण वाढले का? यादृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. चलन रद्द केल्यामुळे समाजाची अवस्था बदलते असे, चित्र राजकीयदृष्ट्या निर्माण केले जात आहे.

**अ) काळा पैसा परिणाम :**

एकाएकी चलनातील ५०० ₹ व १००० ₹ नोटा चलनातून रद्द करणे, अधिकोषामधील खात्यांमध्ये २.५० लाख पर्यंत जमा करण्याची मर्यादा, विशिष्ट मुदतीपर्यंत जुन्या नोटांना बदलून देणे, स्वतंत्र नोंद घेणे, निश्चित ही घोषणा संपूर्णपणे गोपनियता बाळगून निर्णय घेणे ही सामान्य बाब नाही. नोटाबंदी म्हणजे काळापैसा बाहेर काढण्यासाठी उपाययोजना, त्याकरिता सुचविलेले भिन्न उपाय या बाबी सामान्यांना आश्चर्यचकीत करणाऱ्या असल्या तरी प्रामुख्याने काळा पैसा ही भारताची संस्कृती आहे का? नागरिकांची होणारी दूरावस्था, व नकली नोटा चलनामध्ये असणे हे तीनही प्रश्न भारताच्या समाजाचे प्रश्न आहे. त्यामुळे भारतीय जनतेने तेवढ्याच जोमाने या निर्णयाचे स्वागत केले. जवळजवळ ५० दिवसात परिस्थिती पूर्ववत होईल असे आश्वासन दिले तरी मात्र अनेक परिणाम दिसून येतात. बेहिशोबी रोख चलन असणाऱ्या लोकांनी २५% प्रतिसाद दिला. नोटा बदलण्याकरिता पैसा अधिकोषाकडे आला आहे.

अर्थव्यवस्थेतील एकूण चलनापैकी ८६ प्रतिशत चलन रद्द करण्याचे जाहीर केले तेव्हा ८६ प्रतिशत चलन अर्थव्यवस्थेतून निघणे १४ प्रतिशत चलन अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये वावर म्हणजे काही सर्जीकल स्ट्राईक नव्हे. रोख पैशाच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात काळा पैसा आहे तसाच तो सोने खरेदी, मालमत्ता खरेदी, बेहिशोबी मालमत्ता, रिअल इस्टेट इ., वेगवेगळ्या संपत्तीमध्ये गुंतविला आहे. भ्रष्टाचाराचा आघात सोने, हवालाकांड, रिअल इस्टेट, कररचना, राजकारण, निवडणूका यामुळे होत आहे. भारतातील भ्रष्टाचाराची समर्पक कारणे राजकीय व्यक्ती देऊ शकत नाही. आज जवळपास ८५ प्रतिशत पैसा हा पांढरा झाला असेच निदर्शनास येते म्हणजे नोटाबंदीद्वारा काळ्या पैशाचे उच्चाटन करणे सहज शक्य नाही. डॉ. रघुरामराजन यांनी पदावरून कार्यमुक्त होण्याआधीच काळा पैसा बाहेर काढण्यावरील नोटाबंदी हा उपाय असूच शकत नाही असे स्पष्ट केले होते. ८६ प्रतिशत चलन रद्द करण्यात आले परंतु आजपर्यंत ५२ प्रतिशत नवीन चलनाची निर्मिती झाली. म्हणजेच सरकारची ८६ प्रतिशत पैसा रोखीने देण्याची भूमिका नाही, कॅशलेस अर्थव्यवस्था ही भारतासारख्या सर्वात जास्त पत्रमुद्रा वापरणाऱ्या देशामध्ये यशस्वी होईल का? हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.

**ब) दशहतवादावरील परिणाम :**

५०० व १००० ₹ नोटा चलनातून रद्द झाल्यामुळे निश्चितच देशांतर्गत व सीमापार दहशतवाद्यांच्या नाड्या आवळल्या गेल्याचे अनेक वृत्त आपण वर्तमानपत्रांमधून वाचत असतो. जम्मू काश्मिर मधील दहशतवादी कारवायांमध्ये ६० प्रतिशत घट झाली. हवाला एजंटदरम्यानचे व्यावसायिक दूरसंभाषणाला चांगलाच चाप बसला आहे. ही पाहणी केंद्रीय गुप्तचरसंस्थांनी केली असून या संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या दाव्यानुसार मागील ५० दिवसात दहशतवादाशी संबंधीत हिंसाचार कमी झाला. डिसेंबर महिन्यात फक्त एकच स्फोटाची घटना घडली. गुप्तचर संस्थेच्या मते दहशतवाद्यांना

आर्थिक रसद पुरविण्यासाठी पाकिस्तान मधील कराची व क्वेटा येथून पुरविल्या जाणाऱ्या बनावट नोटांवर आळा बसला आहे. झारखंडमध्ये ८० करोड रोख रक्कम नष्ट करण्यात आली आहे. साहजिकच विमुद्रीकरणामुळे दहशतवादी कारवायांसाठी पुरविल्या जाणाऱ्या पैशाचा ओघ आटला आहे. नक्षलवाद्यांनी ईशान्य भाग सोडून सुरक्षेसाठी दुसरीकडे प्रस्थान केल्याचे वृत्त आहे. छत्तीसगड आणि झारखंडमधील नक्षलवादी ग्रस्त भागातील नक्षली नेते जुन्या नोटा बदलून घेण्याकरिता स्थानिक लोकांची मदत घेत असल्याचे निदर्शनास आले आहे.

**क) नकली नोट निर्मितीवरील परिणाम :**

हवाला व्यवहारांद्वारे निर्माण होणाऱ्या बनावट चलनांवर निश्चितच अंकुश असल्याचे वृत्त गुप्तचर संस्थेद्वारा प्रसिद्ध करण्यात आले आहे. नकली नोटांमधून दहशतवाद्यांना आर्थिक रसद मिळते. पाकिस्तानमधील कराची आणि क्वेट्टा येथे बनावट भारतीय नोटा छापल्या जातात. असा दाट संशय आहे. बनावट नोटांना चांगलाच आळा बसला असून भारतातील हवाला व्यवहार ५० प्रतिशत घटले. हवाला व्यवहार रोखीतच चालतो. त्यामुळे बहुतांश हवाला व्यवहार थंडावले तथापि नवीन ५०० व २००० ₹ मुद्रांची निर्मिती करतांना काही नकली नोटा अर्थव्यवस्थेत येत आहे अशा प्रकारच्या वृत्तांना दुजोरा दिला जातो.

**ड) आर्थिक वृद्धी दर (GDP) परिणाम :**

विमुद्रीकरणामुळे सकल राष्ट्रीय उत्पादनाचा वेग मंदावण्याचा अंदाज आहे. जीडीपी (आर्थिक विकास दर) यावर्षी ७.१ राहण्याची शक्यता वर्तवली आहे. २०१५-१६ मध्ये हा दर ७.६ इतका होता. जीडीपी व्यतिरिक्त या वित्तीय वर्षात दरडोई उत्पन्नात ६.२ प्रतिशत वरून ५.६ पर्यंत घट होण्याची शक्यता C.S.O. चे मुख्य संख्याशास्त्रज्ञ डॉ.टी.सी.ए. अनंत यांनी वर्तविली आहे. सकल उत्पादन वेग कमी, दरडोई उत्पन्नातील घट, रोजगारामधील घट, असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांवर झालेला विपरित परिणाम, सामान्य जनतेची नाराजी, भविष्याची चिंता सर्वांचे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे विमुद्रीकरण. आर्थिक धोरणा संदर्भातील रॉबर्ट ल्युकास चा 'विवेकशील अंदाजबांधणीचा' सिद्धांत महत्त्वपूर्ण ठरला. अर्थव्यवस्था ही एकजिनसी (homogenious) आहे. अर्थव्यवस्था स्थिर राहण्याच्या काही अटी आहेत. संपूर्ण व्यवस्थेचा परिणाम असून व्यापारचक्र आहे. नोटाबंदीमुळे काही प्रमाणात मंदी निर्माण होत आहे. इंडियन एक्सप्रेसने केलेल्या सर्वेक्षणानुसार ६० प्रतिशत कारखान्यांवर विपरित परिणाम झाला आहे. ४० लाख कारखानदारांचे संघटन होवून रोजगार नष्ट झाला आहे. चलनाची निर्मिती नसल्यामुळे मोठी पोकळी निर्माण होत आहे. रोजगार हमी योजनांच्या मागणीच्या प्रमाणात ६ प्रतिशत वाढ झाली आहे. समाजाची अवस्था बदलते आहे. रोजगार नष्ट होऊन लोक गावांकडे स्थानांतरित होत आहे. त्यामुळे बेरोजगारी अधिक वाढणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

विमुद्रीकरणाचा विपरित परिणाम गृहनिर्माण क्षेत्र, ऑटोमोबाईल इंडस्ट्रीज, बांधकाम विभाग या क्षेत्रांवर मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे भांडवलीची सीमांत लाभक्षमता घटत आहे. आदेश क्षमता (Non-performing assests) भरमसाठ वाढत आहेत. एका क्षेत्रामधून दुसऱ्या क्षेत्रामध्ये स्थलांतरित झाल्यास दुसऱ्या क्षेत्राचे काय होणार याचाही विचार होणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

देशांतर्गत निर्माण झालेला काळा पैसा चलनातून बाहेर काढण्यावर उपाय म्हणजे विमुद्रीकरण म्हटले आहे. परंतु ज्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर काळा पैसा आहे. त्यांनी नोटाबंदीच्या निर्णयानंतर अनेक पर्याय शोधले मोठ्या प्रमाणावर पैसा पांढरा झाला. काळ्या पैशाचे आज छोट्या छोट्या भागांमध्ये विभाजन झाले. जनधन योजनेसारख्या खात्यांमध्ये करोडो रू. जमा झाले. नव्हे तर अशी सुविधाच प्रदान केली अशी शंका घेण्यास मोठा वाव आहे.

काही अपवाद वगळता काळा पैसा बाहेर काढण्यासाठी उपाय म्हटले असले तरी कुठल्याही मोठ्या व्यक्तींची नावे, राजकीय व्यक्तींची नावे यामध्ये नाहीत. अधिकोषांकडे जमा झालेल्या निधीवरून हेच निदर्शनास येते की काळा पैसा पांढरा करणे अशक्य नाहीच. अगदीच अशक्य असेल तर तो पैसा आजही आयकर विभागाने धाडी घातल्यानंतर लोकांकडे मिळत आहे.

एकूणच जमा झालेल्या रकमांमध्ये ७ प्रतिशत रकमांचा हिशोब नाही. ८६ प्रतिशत पैसा चलनातून रद्द झाल्यानंतर ५२ प्रतिशत चलन निर्मिती करण्यात आली. याचाच अर्थ मोठी पोकळी निर्माण होवून सामान्य नागरिकात जनता आजही आवश्यकते एवढा पैसा प्राप्त होत नसल्यामुळे गैरसोय होत आहे. ती होवू नये यादृष्टीने सरकारने, केंद्रीय अधिकोषाने ठोस उपाय योजना करण्याची गरज आहे. 'कॅशलेस इकॉनॉमी' हा पर्याय होवू शकणार नाही.

नोटाबंदी सोबत चा भार सामान्य जनतेला सोसावा लागत आहे. लोकशाहीत मार्केटमध्ये काय घडत आहे. अधिकोषांकडे नोटा बदलवून घेण्यापूरता पैसा आला. थकीत पैसा काही प्रमाणात परत मिळाला.

भारत देशामध्ये मोठ्या प्रमाणावर पत्रमुद्रांचा वापर होतो. सामान्य जनतेवर 'वित्तीय साक्षरतेचा' फारसा प्रभाव पडणे शक्य नाही. दैनंदिन व्यवहार करण्यासाठी सामान्य व्यक्ती कुठेही रोख चलनाचा मोठ्या प्रमाणावर वापर करते. त्यामुळे Cashless Economy ही बाब सहज शक्य नाही. रिअल इस्टेट सारख्या क्षेत्रांमध्ये मात्र Cashless चा वापर करणे संयुक्तीक ठरेल.

गृहनिर्माण, खरेदी विक्रींच्या व्यवहारांमध्ये मुद्रांक शुल्क फार जास्त असते. त्यामुळे हे व्यवहार रोखीने केले जातात व येथे काळा पैसा निर्माण होतो यावर अंकुश लावणे गरजेचे आहे.

नोटाबंदीच्या निर्णयामुळे भ्रष्टाचाराच्या विरोधात हे शासन आहे हे निवडणूकांकडे लक्ष केंद्रीत करून लोकांना भावनिक साद घालून अत्यंत संवेदनशील धोरण म्हणून यशस्वी भाग म्हणता येईल.

नोटाबंदीच्या निर्णयानंतर मात्र कराच्या माध्यमातून प्राप्त होणारे उत्पन्न निश्चित वाढले. करापोटी नगरपालिका, महानगरपालिका, सरकारकडे कराचा भरणा केला गेला त्यामुळे करोडोनी उत्पन्न वाढले. सरकारकडे मोठ्या प्रमाणात वसूल झालेली रक्कम पुढील वर्षीही याच प्रमाणात वसुली व्हावी ही अपेक्षा आहे. यामुळे विषमता कमी होण्यास मदत होईल.

जुन्या नोटांच्या स्वरूपात परत आलेल्या राशीमुळे बँक भांडवलमध्ये फारशी वाढ होणार नाही तर आदेश क्षमतेमध्ये भरमसाठ वाढ झाल्यामुळे बँकाचे उत्पन्न घसरणार नाही याची बँकांना दक्षता घ्यावी लागेल.

देशातील प्रमुख क्षेत्रांतील वाढ या दरम्यान ५% पर्यंत दर घटले परंतु हे दर केवळ विमुद्रीकरणामुळे नव्हे तर इतर काही कारणांमुळे जसे १) विदेशी गुंतवणूकदारांच्या विश्वासाला तडा २) औद्योगिक उत्पादन निर्देशांकात १८४.१ वरून १७८ पर्यंत घट, ३) क्रेडीट ग्रोथ, ४) गुंतवणूक पत पुरवठ्यास मागणी, ५) निर्यात घट, काही प्रमाणात ब्रेक्झिट मुळे, आयातदारांनी स्विकारलेले संरक्षणात्मक धोरण, निश्चित उपरोक्त घटक व विमुद्रीकरणामुळे नकारात्मक परिणाम झाले आहेत.

नोटबंदीमुळे वरील सर्व परिणामांसह काही समस्या निश्चितच निर्माण झाल्या आहेत. विशेषत्वाने सामान्यांना चलनाच्या कमतरतेचा करावा लागणारा सामना. त्यामुळे लोकांच्या दैनंदिन जीवनावर विपरित परिणाम झाला. विशेषत: आधीच अनेक समस्यांनी ग्रस्त शेतकऱ्याला नोटाबंदीची मोठ झळ सोसावी लागली. व्यापारी वर्ग मालाची विक्री केल्यानंतर एकावेळी पूर्णपणे पैसे देत नव्हते. शेतमालाच्या किंमतीत झालेली घसरण, व्यापारी वर्गालाही झळ पोहोचली. किरकोळ विक्रेत्यांच्या व्यवहारांत घट झाली. व्यापारी, उत्पादक यांच्यावर संकट ओढवले. प्रामुख्याने रोजगारावर विपरित झाला आहे. असंघटीत क्षेत्रातील श्रमिकांवर विपरित परिणाम दिसून येतो. अनेक व्यवहार ठप्प झाल्यामुळे दैनिक वेतनावर काम करण्याऱ्या श्रमिकांवर संकट ओढवले.

भविष्याची चिंता, श्रमिकांना सहन कराव्या लागणाऱ्या हालअपेष्टा, दैनंदिन व्यवहारांकरिता चलन उपलब्ध नसणे, सामान्यांना लग्न समारंभासारखे समारंभ पार पाडण्याकरिता आवश्यक चलनाची कमतरता, यामुळे मात्र सामान्यांना वेठीस धरण्याचा हा प्रकार म्हणून राजकीय विरोधकांना हे मोठे शस्त्र प्राप्त झाले आहे.

उपरोक्त सर्व दृष्टीने नोटाबंदीचा विचाराअंती भारतीय अर्थव्यवस्थेवरील हे परिणाम अल्पावधीमध्ये दूर सारण्याच्या दृष्टीने सरकारी उपाययोजनांची आवश्यकता असून लाखो वरील व्यवहार हे अनिवार्यपणे रोखीने न करण्याचे निर्धारित केल्यास काळा पैसा निर्माण न होण्यास उपयुक्त ठरेल. बेहिशोबी मालमत्तेचे विवरण होण्यास बंधनकारक, भांडवली संसाधनावर नियंत्रण, प्रशासकीय धोरणांच्या माध्यमातून क्षतीपूर्ती केल्यास विमुद्रीकरणाचा उचित प्रभाव निदर्शनास येईल.

**संदर्भ :**


१. J. Dennis Rajkumar, S.L. Shetty (2016) : Demonetisation : 1978 the present and the aftermonth, EPW.

2. Nag Ashok (2016) : Lost due to demonetisation, Vol. L1 No. 48, No.v 26, EPW.

3. Mitra Sumit (2016) : A cash course in outrage, The Economic Times, 6 December.

4. Vbidi Javed (2016) : Show me money, 6 December.

5. J.K. Arun (2016) : Help them go cashless, 30 November.


◆◆◆

# पर्यावरणीय समस्यांच्या संदर्भात आदान-प्रदान विश्लेषण तंत्राचे उपयोजन

**धीरज सु. कदम**
सहाय्यक प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग
रा.तु.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर.

आर्थिक वृद्धीच्या वाढत्या अभिलाषेमुळे मानवाचा नैसर्गिक पर्यावरणामधील हस्तक्षेप सातत्याने वाढत आहे. भांडवलवादी व्यवस्था आणि तंत्रज्ञानातील विकासामुळे श्रमाचे प्रतिस्थापन यंत्राद्वारे होत असल्याने नैसर्गिक संसाधनाच्या विद्रोहनाचा वेग मोठ्याा प्रमाणावर वाढला आहे. तथापि पर्यावरणीय ऱ्हासाची विशिष्ट घटकांवरील जबाबदारी निश्चित करण्यात बाह्यतांमुळे (Externalities) बाजार यंत्रणा सातत्याने अपयशी ठरते. त्यामुळे उपभोग, उत्पादन यासारख्या आर्थिक क्रियांमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचे नियंत्रण करण्यासाठी पद्धती वा तंत्र विकसित करणे महत्त्वाचे आहे. या दृष्टीने १९६० पासून पर्यावरणीय प्रदूषणाची निर्मिती आणि प्रदूषण कमी करण्याशी संबंधित आंतर-उद्योग क्रिया-कलापांचे मापन करण्यासाठी अनेक संशोधकाद्वारे आदान-प्रदान विश्लेषणाची चौकट (Framework of Input-Output Analysis) विस्तारीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या संदर्भात लियॉन्टीफ (Leontief) यांनी स्वत: (१९७०) मध्ये एक पद्धती विकसित केली. जिचे पुढे व्यापक प्रमाणात उपयोजन आणि विस्तार केल्या गेला. लियान्टीफद्वारा विकसित तंत्र 'पर्यावरण विस्तारीत आदान-प्रदान विश्लेषण' (Environmentally Extended Input-Output Analysis) (EEIO) म्हणून ओळखल्या जाते. या तंत्राचा उपयोग प्रामुख्याने कोणत्याही प्रकारच्या पर्यावरणीय प्रभावांचे जसे- प्रदूषकांचे उत्सर्जन, नैसर्गिक संसाधनांची अवनती, जैवविविधतेचा ऱ्हास इत्यादींचे आर्थिक चालक (Economic Drivers) ओळखण्यासाठी केल्या जातो. (मिलर आणि ब्लेयर, २००९)

आर्थिक क्रियांचे पर्यावरणवर होणारे परिणाम हे प्रत्यक्ष (मूर्त) आणि अप्रत्यक्ष (अमूर्त) असे दोन प्रकारचे असतात. त्या परिणामातील फरक समजून घेणे गरजेचे आहे. उदा. जर एखाद्या उपभोक्त्याने गॅसचे ज्वलन करून कार्बन डायऑक्साईडचे ($CO_2$) उत्सर्जन केले असेल तर तो पर्यावरणावर होणारा प्रत्यक्ष वा मूर्त प्रभाव असेल. याउलट एखाद्या कार निर्मितीसाठी उपभोगात आणल्या जाणाऱ्या पोलादाच्या उत्पादनाशी संबंधित ($CO_2$) चे उत्सर्जन हा पर्यावरणावर होणारा अप्रत्यक्ष वा अमूर्त स्वरूपाचा प्रभाव असेल. वरीलपैकी पर्यावरणावर होणाऱ्या प्रत्यक्ष प्रभावांच्या संदर्भात उत्सर्जन करणाऱ्या घटकांवर सहजतेने त्याची जबाबदारी निश्चित करता येते.

तथापि अप्रत्यक्ष प्रभावांच्या संदर्भात मात्र वेगवेगळ्याा घटकांवरील उत्सर्जनाची जबाबदारी

निश्चित करण्यासाठी पर्यावरणीय विस्तारीत आदान-प्रदा विश्लेषणाची गरज आहे.

**पर्यावरणीय अर्थशास्त्राच्या साहित्यामध्ये EEIO विश्लेषणाचे मुख्य उद्देश -**

१. उपभोग - उत्पादन यासारख्या आर्थिक क्रियांशी संबंधित पर्यावरणावरील अप्रत्यक्ष वा अमूर्त प्रभावांचे मापन करणे. जसे-एखाद्या व्यक्तिद्वारे विशिष्ट वस्तूची खरेदी वा उपभोग होत असताना होणारे एकूण कार्बनचे उत्सर्जन.


२. वेगवेगळ्याा राष्ट्रांदरम्यान व्यापार होणाऱ्या वस्तुंमधील अमूर्त स्वरूपाच्या पर्यावरणीय प्रभावांच्या रकमेचे मापन करणे. उदा. एखाद्या राष्ट्रामध्ये गव्हाच्या उत्पादन प्रक्रियेत किती नायट्रोजन पर्यावरणातून घेण्यात आला आणि नंतर त्यांच्या निर्यातीच्या माध्यमातून दुसऱ्या राष्ट्रांमध्ये तो किती स्थानांतरीत करण्यात आला.

पर्यावरणीय विस्तारीत आदान-प्रदा दृष्टीकोन प्रामुख्याने 'उपभोक्ता उत्तरदायित्व' (Consumer responsibility) या तत्त्वावर आधारीत आहे. ज्यामध्ये, पर्यावरणीय प्रभावासाठीची अंतिम जबाबदारी ही अंतिम उपभोक्त्यावर आरोपित केल्या जाते, जो ती वस्तू वा सेवा खरेदी करतो.

**उपभोग क्रियेच्या एकूण प्रभावाचे आकलन (Total Impact Assessment of a Consumption Activity) -**

उपभोग क्रियेच्या एकूण प्रभावाचे आकलन एका काल्पनिक उदाहरणाच्या साहाय्याने समजून घेता येईल. समजा दिल्लीतील एका उपभोक्त्याने KFC चे चिकन बर्गर खरेदी केले आणि त्याला त्या बर्गरशी संबंधित एकूण कार्बन उत्सर्जन जाणून घ्यायचे असेल तर त्या चिकन बर्गरच्या उत्पादनाची प्रक्रिया मागच्या दिशेने तपासत जावी लागेल. ती पुढील वृक्षाकृतीद्वारे (Tree Diagram) विचारात घेता येईल.

**वृक्षाकृती क्र.१**




याप्रकारे चिकन बर्गरच्या उत्पादनासाठी उपयोगात येणाऱ्या प्रत्येक स्तरावरीत उत्पादन घटकांच्या उत्पादन प्रक्रियेशी संबंधित आवश्यक कार्बनचे उत्सर्जन विचारात घेऊन त्या आधारे चिकन बर्गरच्या उत्पादनाशी संबंधित प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा एकूण कार्बन उत्सर्जनाचे मापन करता येते. तथापि प्रत्यक्ष व्यवहारात या दृष्टिकोनाच्या काही मर्यादा आहेत-

१. एखाद्या उत्पादनांशी संबंधित मागच्या बाजूची उत्पादन घटकांची साखळी ही अनंत स्तरापर्यंत

असू शकते. परंतु अमूर्त उत्पादनांची संख्या प्रत्यक्ष विश्लेषणात मर्यादित केली जाते. त्यामुळे त्या उत्पादनाशी संबंधित एकूण उत्सर्जनाचे अनुमान त्रुटीयुक्त राहते.

२. बरेचदा व्यावसायिक त्यांच्या, उत्पादन प्रक्रियेची माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध करून देत नाहीत, त्यामुळे विशिष्ट उत्पादनाची आदाने निश्चित करणे अशक्य होते.


३. उत्पादनाशी संबंधित उत्पादन घटकांच्या साखळीमध्ये बरेचदा चक्रिय संबंध देखील असू शकतो. उदा. आपल्या वरील आकृतीमध्ये उजव्या बाजूला तळाशी असलेला विद्युत हा घटक घेतल्यास त्याच्या निर्मितीसाठी पुन्हा पाण्याची आवश्यकता असते, पाणी वाहून नेण्यासाठी पाईपची आवश्यकता असते आणि त्यासाठी परत विजेची गरज असते.

४. दुहेरी मोजमापाची समस्या देखील उद्भवू शकते. उदा. कागद उत्पादनासाठी उपयोगात आणले जाणारे काही पाणी पुर्नप्रक्रिया करून पिकांसाठी उपयोगात आणले जाऊ शकते. अशा परिस्थितीत त्या पाण्याचे परिवहन आणि पंपींगशी संबंधित कार्बनचे उत्सर्जन कागद आणि पीक यामध्ये कसे विभाजित करावे? असा प्रश्न निर्माण होतो किंवा कागदनिर्मितीसाठी आवश्यक असणारा काही लगदा कागदच्या पूर्नप्रक्रियेपासून येऊ शकतो.

**व्यापारामध्ये अंतर्भूत प्रभाव –**

जर अर्थव्यवस्था खुल्या असतील आणि त्यांच्या दरम्यान आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येत असेल तर अशावेळी विशिष्ट आर्थिक क्रियेच्या पर्यावरणावरील एकंदर (मूर्त आणि अमूर्त) प्रभावांचे मापन करण्यासाठी व्यापारामध्ये अंतर्भूत प्रभाव देखील विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. ते एका उदाहरणाच्या साहाय्याने आपणास समजून घेता येईल. समजा अमेरिकेमध्ये गव्हाचे उत्पादन घेतल्या जात असून ते इतर राष्ट्रांना निर्यात केले जात आहे. गव्हाच्या पिकांची वाढ होत असतांना त्यामध्ये वातावरणातील नायट्रोजन समाविष्ट होत असतो. अशावेळी अमेरिकेद्वारे गव्हाची निर्यात होत असताना त्याद्वारे किती प्रमाणात अमेरिकेतील अभासी नायट्रोजनची निर्यात होते किंवा एखाद्या राष्ट्रातील उपभोक्ते अमेरिकेतून आयात होणाऱ्या गव्हापासून तयार होणाऱ्या ब्रेडसारख्या अंतिम वस्तुच्या उपभोगाद्वारे अमेरिकेतील किती नायट्रोजन वापरतील हे जाणून घेण्यासाठी पुढील वृक्षाकृतीद्वारे राष्ट्रांदरम्यानच्या वस्तू व्यापारामध्ये अंतर्भूत पर्यावरणीय प्रभावांचे प्रवाह दर्शविले आहेत –

वृक्षाकृती – २



वरील वृक्षाकृती क्र.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अमेरिका डेन्मार्कला गव्हाची निर्यात करतो, अमेरिकेतून आयात होणाऱ्या काही गव्हापासून डेन्मार्कमध्ये ब्रेडचे उत्पादन होऊन त्यापैकी काही ब्रेड जर्मनीला निर्यात केली जाते. तसेच काही गव्हाचा उपयोग जनावरांचे खाद्यान्न म्हणून केल्या जातो व त्या जनावरांचे मांस (Meat) काही प्रमाणात फ्रान्सला निर्यात केले जाते. उत्पादन सहगुणांकाच्या साहाय्याने (Product Co-efficient) एखाद्या राष्ट्रातील (फ्रान्स/जर्मनी) उपभोक्त्याने अमेरिकेमधील किती नायट्रोजन वापरला याचे विश्लेषण केले जाते.) तथापी अशा प्रकारच्या विश्लेषणाच्या देखील काही मर्यादा आहेत -

१. डेन्मार्कमध्ये अमेरिकेमध्ये निर्यात झालेला गहू, ब्रेड आणि मांस उत्पादनाचा कच्चा माल म्हणून किती प्रमाणात उपयोगात आणल्या गेला, या आधारे उत्पादन सहगुणांकाची निश्चिती करण्यासाठी उत्पादन आयात-निर्यातीची आणि दुसऱ्या पायरीवर त्याचा कच्चा माल म्हणून वेगवेगळ्याा उत्पादनात होणाऱ्या वापराची अचूक माहिती असणे आवश्यक आहे. परंतु व्यापार विषयक सांख्यिकीमध्ये प्रक्रिया उद्योगातील दुसऱ्या स्तरावरील व्यापार विषयक माहिती समाविष्ट नसते. उदाहरणार्थ अमेरिकेतील FAOSTAT (Food and Agriculture Organisation's Stata) ची सांख्यिकीय माहिती (Data Base) अमेरिकेमधून डेन्मार्कमध्ये किती गहू निर्यात झाला याचे अचूक वृत्तांकन करते. परंतु याचा अर्थ असा नाही की, ते सर्वच्या सर्वच गहू डेन्मार्कमध्ये अंतिमत: उपभोगात आणल्या जाईल. जर तो गहू ब्रेडच्या प्रक्रियेमध्ये वापरल्या जात असेल आणि ती ब्रेड जर्मनीला निर्यात केली जात असेल तर अशा वेळी त्या गव्हाच्या मात्रेशी संबंधित पर्यावरणीय प्रभावाची जबाबदारी अमेरिकेकडून डेन्मार्ककडे आवंटित न होता ती जर्मनीच्या उपभोक्त्यांकडे आवंटीत होईल. परंतु FAOSTAT आणि COMTRADE (United Nations Commodity Trade Statistics Database) ची उपलब्ध माहिती अमेरिकेतील गहू आणि जर्मनीतील ब्रेडचा उपभोग यांच्या दरम्यानच्या संबंधाचे प्रत्यक्ष वृत्तांकन करत नाही.

२. उपरोक्त समान तर्काच्या आधारे असे म्हणता येईल की, जनावरांच्या खाद्यान्न्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या गव्हाचा पारंपरिक सहगुणांक आधारित विश्लेषणाद्वारे सहजतेने मात्र काढल्या जाऊ शकत नाही.

३. पारंपरिक उत्पादन आधारित दृष्टीकोन वेगवेगळ्याा राष्ट्रांदरम्यान असलेल्या सेवांमधील व्यापाराचे मापन करत नाही. समजा उदाहरणादाखल आपण गव्हाऐवजी कागदाच्या बाबतीत विचार करूया. जर भारताच्या कॉल सेंटरमध्ये कागद उपयोगात आणल्या जात आहे. परंतु हे कॉल सेंटर्स अमेरिकन ग्राहकांच्या सेवांची मागणी पूर्ण करण्यासाठी अस्तित्वात असेल तर या कागद उत्पादनाच्या पर्यावरणातील अमूर्त प्रभावाची जबाबदारी अमेरिकन ग्राहकांकडे आवंटीत व्हावी. हा सेवांमधील व्यापार, पारंपरिक उत्पादनावर आधारित भौतिक विश्लेषणाद्वारे प्राप्त केल्या

जाऊ शकत नाही.

**पर्यावरण विस्तारीत आदान-प्रदा विश्लेषण : संकल्पना व गणित -**

पर्यावरण विस्तारीत आदान-प्रदान विश्लेषण हे आर्थिक क्षेत्रांदरम्यान विविध स्तरांवरील पर्यावरणीय घटकांशी संबंधित आदान-प्रदान प्रदेयक (Input-Output Matrix) प्रस्तुत करते. जे आंतरक्षेत्रीय प्रवाहांना दर्शविते. ते सामान्यत: मौद्रिक तर काहीवेळा भौतिक स्वरूपामध्ये असते.

समजा एखाद्या अर्थव्यवस्थेमध्ये दोनच आर्थिक क्षेत्रे आहेत, कृषी आणि वस्तुनिर्माण (Agricultural and Manufacturing) या दोन्हीं क्षेत्रांद्वारे वस्तु व सेवांची परस्परांना विक्री केल्या जाते. तसेच प्रत्येक क्षेत्राद्वारे उत्पादित अंतिम वस्तूंची अंतिम उपभोक्त्यांद्वारे उपभोगासाठी देखील खरेदी केल्या जाते. या अर्थव्यवस्थेतील क्षेत्रा दरम्यानचे आंतर्प्रवाह पुढील आदान-प्रदान सारणीमध्ये दर्शविले आहे.

**तालिका - १**

**द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेतील आदान-प्रदा तालिका**

(आकडे रूपयात)

| | कृ ी | वस्तुनिर्माणी | अंतिम मागणी | एकूण प्रदान |
|---|---|---|---|---|
| कृ ि | ८ | ५ | ३ | १६ |
| वस्तुनिर्माणी | ४ | २ | ६ | १२ |
| मूल्यवर्धन | ४ | ५ | | |
| **एकूण आदान** | **१६** | **१२** | | |

वरील तालिका अर्थव्यवस्थेतील क्षेत्रांदरम्यान होणाऱ्या वार्षिक मौद्रिक व्यवहारांना दर्शवते. तालिकेच्या स्तंभाद्वारे कृषी आणि वस्तुनिर्माणी क्षेत्रातील आदानांचे मौद्रिक मूल्य दर्शविले आहे. तर ओळीद्वारे (Rows) दोन्ही क्षेत्रांच्या एकूण प्रदानचे (Output) मूल्य दर्शविले आहे.

तालिकेत दर्शविल्याप्रमाणे कृषी क्षेत्रातील व्यवसाय वस्तुनिर्माणी क्षेत्रांकडून ४ रूपये वस्तु व सेवांची आदाने तर स्वत:च्या क्षेत्रांकडून ८ रूपयांची आदाने खरेदी करते. त्याद्वारे १६ रूपये उत्पादन करते. तर वस्तुनिर्माणी क्षेत्र कृषी क्षेत्राकडून ५ रूपये व स्वत:च्या व्यावसायिकांकडून २ रूपयांची आदाने खरेदी करून त्याद्वारे १२ रूपये उत्पादन करते. म्हणजे कृषीक्षेत्राची एकूण मूल्यवर्धन ४ रूपये असून वस्तुनिर्माणी क्षेत्रांचे एकूण मूल्यवर्धन ५ रूपयांचे आहे.

तालिकेच्या स्तंभ क्र. ३ मध्ये अंतिम मागणी दर्शविली आहे. जी घरगुती क्षेत्रातील अंतिम उपभोक्त्याद्वारे प्रत्येक क्षेत्रातील अंतिम वस्तूंच्या प्रत्यक्ष उपभोगासाठी खर्च केलेल्या मुद्रेच्या रकमेला दर्शविते. प्रत्येक क्षेत्राचे एकूण प्रदान / उत्पादन

(Output) हे प्रत्येक क्षेत्राने दोन्ही क्षेत्रांच्या व्यावसायिकांना तसेच अंतिम उपभोक्त्यांना विकलेल्या वस्तू व सेवांच्या एकूण मौद्रिक मूल्याएवढे असते.

पुढे अशी कल्पना करा की, अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्राच्या उत्पादन क्रियाशी संबंधित पर्यावरणीय प्रभावांची आर्थिक माहिती उपलब्ध आहे. समजा असे गृहीत धरा की, उत्सर्जन सूचिनुसार कृषी क्षेत्रातील आर्थिक क्रियांमुळे ८ टन कार्बनचे तर वस्तुनिर्माणी क्षेत्रातील आर्थिक क्रियांच्या परिणामास्तव ४ टन कार्बनचे उत्सर्जन झाले आहे. याबरोबरच कृषी क्षेत्र ८ हेक्टर तर निर्माणी क्षेत्र ४ हेक्टर जमीन उत्पादन क्रियेसाठी उपयोगात आणत आहे.

अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राद्वारे होणारे उत्पादन आणि उत्सर्जन या माहितीच्या आधारे प्रत्यक्ष गहनता सादिश( Direct Intensity Vector) (F) काढता येते, जो प्रत्येक क्षेत्रासाठी प्रति रूपये (उत्पादनाच्या १ रूपये मूल्यांशी संबंधित) उत्सर्जन व्यक्त करतो. जसे कृषि क्षेत्राची प्रत्यक्ष उत्सर्जन तीव्रता = ८ टन कार्बन/१६ रू. उत्पादन = ०.५ टन कार्बन प्रति रूपये, वस्तुनिर्माणी क्षेत्राची प्रत्यक्ष उत्सर्जन तीव्रता = ४ टन कार्बन/१२ रूपये उत्पादन = ०.३३ टन कार्बन प्रति रूपये या आधारे-

प्रत्यक्ष गहनता Direct Intensity Vector (F) = (०.५ ०.३३) असल्यामुळे कार्बनचे एकूण अनुमानित उत्सर्जन, E = (३ ६), (०.५ ०.३३) = (१.५ २) म्हणजेच कृषि क्षेत्रांकडून १.५ टन तर वस्तुनिर्माणी क्षेत्राकडून २ टन व एकूण फक्त ३.५ टन कार्बन आहे. तथापि उत्सर्जन सूचीनुसार अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राद्वारे होणारे कार्बनचे उत्सर्जन ८ टन व वस्तुनिर्माणी क्षेत्राद्वारे होणार कार्बन उत्सर्जन ४ टन असे एकूण १२ टन आहे. म्हणजे ८.५ टन उत्सर्जित कार्बनचे मापन झालेले नाही. वास्तविक पहाता हा ८.५ टन कार्बन मध्यवर्ती वस्तूंच्या स्वरूपात आदाने म्हणून अर्थव्यवस्थेतील व्यवसायांनी परस्परांना केलेल्या विक्रीमध्ये समाविष्ट आहे. पर्यावरणीय विस्तारीत अदान-प्रदान विश्लेषणाच्या साहाय्याने त्याचा माग काढण्यासाठी गणितीय पायऱ्या अवलंबाव्या लागतात.

पूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे पहिल्या पायरीवर प्रत्येक क्षेत्राद्वारे प्रत्यक्षपणे उत्सर्जित केलेल्या कार्बनला त्या-त्या क्षेत्राच्या एकूण उत्पादनाने भागून "Direct Intensity Vector" काढल्या जातो.

$$F = (8 \quad 4) / (16 \quad 12) = (0.5 \quad 0.33) \qquad ..(i)$$

दुसरी पायरी म्हणजे तांत्रिक सहगुणांक सारणी (Technical Co-efficient Matrix) तयार करणे, ज्याला A-सारणी असे दर्शविले जाते. A सारणी ही प्रत्येक क्षेत्राद्वारे प्रतिलक्ष रूपये उत्पादनासाठी प्रत्येक दुसऱ्या क्षेत्राकडून किती आदाने मिळवावी लागतात याचे मूल्य दर्शविते. तांत्रिक सहगुणांक सारणी प्रत्येक क्षेत्राच्या आदानाला त्या क्षेत्राच्या प्रदानच्या मूल्याने भागून प्राप्त करता येते.

$$A = \begin{Bmatrix} 8/16 & 5/12 \\ 4/16 & 2/12 \end{Bmatrix} = \begin{Bmatrix} 0.5 & 0.42 \\ 0.25 & 0.17 \end{Bmatrix} \qquad ..(ii)$$

वरील सारणीवरून लक्षात येते की, कृषि क्षेत्राला १ रूपयाचे उत्पादन करण्यासाठी वस्तुनिर्माणी क्षेत्राकडून ०.२५ रूपये आदाने खरेदी करावी लागतील. तर स्वत:च्या क्षेत्राकडून ०.५ रूपये

आदाने लागतील. तर वस्तुनिर्माणी क्षेत्राला १ रूपये उत्पादन करण्यासाठी कृषी क्षेत्राकडून ०.४२ रूपयांची तर स्वत:च्या क्षेत्राकडून ०.१७ रूपयांची आदाने आवश्यक आहेत.

तिसरी पायरी म्हणजे उत्पादनाचा प्रवाह वेगवेगळ्चाा क्षेत्रांदरम्यान आणि अंतिम उपभोक्त्यांपर्यंत कशाप्रकारे जातो ते समजून घेणे होय. अंतिम उपभोक्त्याला विकल्या गेलेल्या १ रूपये उत्पादनाचे सर्व स्तरावरील एकूण कार्बन उत्सर्जन मोजण्यासाठी, त्या उत्पादन निर्मितीच्या प्रत्येक स्तरावर, सर्वच क्षेत्रांकडून जी आदाने घेतल्या गेली त्यांचे प्रत्येक स्तरावरील तांत्रिक सहगुणांक (Technical Co-efficient) काढून, त्याला प्रत्येक क्षेत्राच्या उत्सर्जन गुणांकाने गुणून त्यांची बेरीज केल्यास आपणास एकूण गहनता सदिश Total Intensity Vector 'F' प्राप्त होतो. ज्याला पुढीलप्रकारे व्यक्त केल्या जाते.

$$F = fL = f(I-A)^{-1} \qquad ...(iii)$$

उपरोक्त सारणी सूत्र Leontief Inverse Matrix म्हणून ओळखल्या जाते. हे समीकरण पर्यावरणीय विस्तारीत आदान-प्रदान विश्लेषणाच्या उपयोजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर उपयोगात येते.

प्रत्यक्ष सारणीची आकडेमोड ही SPSS, Ms Excel सारख्या सॉफ्टवेअर पॅकेजेसच्या साहाय्याने देखील केल्या जाऊ शकते.

उपरोक्त माहितीच्या आधारे 'एकूण गहनता सदिश' (Total Intensity Factor) ''F'' चे मापन पुढीलप्रमाणे करता येईल.

$$F = f\,L = [0.5 \;\; 0.33] \left( \begin{pmatrix} 1 & 0 \\ 0 & 1 \end{pmatrix} - \begin{pmatrix} 0.5 & 0.42 \\ 0.25 & 0.17 \end{pmatrix} \right) = [1.6 \;\; 1.2] \qquad ..(iv)$$

यावरून 'एकूण गहनता सदिश' (F) = [ 1.6  1.2] परिगणित झाला आहे. जो दर्शवितो की, कृषि क्षेत्राकडून अंतिम मागणीला प्रति रूपये उत्पादनासाठी १.६ टन उर्ध्वप्रवाही (upstream) कार्बन उत्सर्जन आवश्यक आहे. तर वस्तुनिर्माणी क्षेत्रात प्रति रूपये १.२ टन उर्ध्वप्रवाही कार्बन उत्सर्जन आवश्यक आहे. यालाच प्रत्येक क्षेत्राची 'उत्सर्जन गहनता' (emissions intensity) असे देखील संबोधल्या जाते.

आपण अगदी सुरूवातीला घेतलेल्या उदाहरणाच्या संदर्भात, उपभोक्त्याने चिकन बर्गरसाठी दिलेल्या किंमतीला त्याच्या उत्पादनाशी संबंधीत उत्सर्जन गहनतेच्या मूल्याने गुणल्यास त्यांच्याशी संबंधीत उर्ध्वप्रवाही कार्बन उत्सर्जन (Upstream Carbon emission) देखील परिगणित करता येते. त्यासाठी क्षेत्राच्या एकूण गहनता सदिशला (F) त्या-त्या क्षेत्राच्या अंतिम मागणी राशीने गुणावे लागते.

$$E = F \times Y \qquad ........ (v)$$

$$E = [1.6 \;\; 1.2] \times [3 \;\; 6] = [4.8 \;\; 7.2] \qquad ........(vi)$$

वरील समीकरणामध्ये E ला उपभोग आधारीत मालसूची 'F' = [ 1.6  1.2] असे संबोधता येईल. यापूर्वी विचारात घेतल्याप्रमाणे एका साध्या द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेमध्ये उत्सर्जन सूचीने मोजल्याप्रमाणे एकूण १२ टन कार्बन उत्सर्जित,

झालेला आहे. त्यापैकी कृषि क्षेत्राद्वारे होणारे प्रत्यक्ष उत्सर्जन ८ टन व वस्तुनिर्माणी क्षेत्रापासूनचे प्रत्यक्ष उत्सर्जन ४ टन आहे. असे असले तरीही, उपभोग आधारित मालसूचीप्रमाणे केलेल्या अधिक सविस्तर विश्लेषणावरून उपभोक्त्याने कृषिक्षेत्राकडून केलेल्या खरेदीनुसार फक्त ४.८ टन उर्ध्वप्रवाही कार्बन उर्त्सजनासाठी ते जबाबदार असल्याचे दिसून येते. तर वस्तुनिर्माणी क्षेत्राकडूनच्या खरेदीनुसार ७.२ टन कार्बन उत्सर्जनासाठी ते जबाबदार असल्याचे स्पष्ट होते. महत्वाची बाब म्हणजे उपभोग आधारित आणि उत्पादन आधारित अशा दोन्ही मालसूची मध्ये दोन्ही क्षेत्रांपासून होणारे एकूण कार्बन उत्सर्जन मात्र समान (१२ टन) आहे.

अशाप्रकारे हे पर्यावरण विस्तारीत आदान-प्रदा विश्लेषण, कार्बन उत्सर्जनाच्या माहित असलेल्या मात्रेसाठी, उत्पादन अभिमुखतेकडून, उपभोक्त अभिमुखतेकडे जबाबदारीच्या पुनर्आवंटणाच्या प्रक्रियेच्या स्वरूपात त्याचा अर्थ स्पष्ट करू शकते. तसेच उपरोक्त निष्कर्ष दर्शवितो की, विचाराधीन क्षेत्रीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषि क्षेत्राकडून वस्तुनिर्माणी क्षेत्राकडे अंतर्भूत कार्बनचे शुद्ध हस्तांतरण प्रभावीपणे होत आहे. दुसऱ्या शब्दात कृषी क्षेत्राकडून होणाऱ्या ३.२ टन कार्बनचे उत्सर्जन मुळात वस्तुनिर्माणी क्षेत्राद्वारे अंतिम उपभोक्त्याला विकल्या जाणाऱ्या वस्तु व सेवांच्या उत्पादनाच्या साहाय्यासाठी असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच सैद्धांतिकदृष्टया जर वस्तुनिर्माणी क्षेत्र अस्तित्वात नसते तर कृषि उत्पादनासाठी उपभोक्याची मागणी पूर्ण करण्यासाठी कृषि क्षेत्राला केवळ ४.८ टन कार्बनच उत्सर्जित करण्याची गरज पडली असती हे स्पष्ट होते.

याठिकाणी आपण प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपाच्या पर्यावरणीय प्रभावाचे आदान-प्रदान विश्लेषणाद्वारे मापन करण्यासाठी एका साध्या द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्थेची कल्पना केली. तथापि प्रत्यक्षात अर्थव्यवस्थेत विविध क्षेत्रांचा समावेश असतो. शिवाय खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विविध देशांसोबत व्यापार होत असल्याने एका देशाकडून विविध देशांकडे वस्तु व सेवांच्या स्वरूपात पर्यावरणीय प्रभावांचे स्थानांतरण होत असते. अशा स्थितीत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारच्या पर्यावरणीय प्रभांवाचा माग काढण्यासाठी उपरोक्त पद्धतीचा अधिक व्यापक स्वरूपात विस्तार करावा लागेल.

**पर्यावरण विस्तारीत आदान-प्रदान विश्लेषणाच्या मर्यादा :**

पर्यावरण विस्तारीत आदान-प्रदा विश्लेषण वस्तु व सेवांच्या अंतिम उपभोगाशी संबंधीत उर्ध्वप्रवाही पर्यावरणीय प्रभाव तसेच व्यापार झालेल्या वस्तुतील अंतर्भूत पर्यावरणीय प्रभावाचे (embodied environmental impacts) मूल्यांकन करण्यासाठी अत्यंत साधी व गतिमान पद्धती उपलब्ध करून देते. तथापि या विशलेषणाच्या काही मर्यादा आहेत.

१. पर्यावरण विस्तारीत आदान-प्रदा विश्लेषण 'एकरूपतेच्या' (Homogeneity) गृहीतावर आधारित आहे. या गृहितानुसार अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्र एकच व समरूप वस्तु वा सेवा उत्पादीत करते. वास्तवात हे गृहीत अव्यवहार्य ठरते.

२. आदान-प्रदान विश्लेषण हे एक रेषीय प्रतिमान (Linear Model) ज्यात उत्पादनासाठी

आदानांचे प्रमाण स्थिर व निश्चित गृहीत घेतले आहे.

३. या विश्लेषणामध्ये किंमत समायोजनाशी संबंधीत कुठलीही यंत्रणा पाहावयास मिळत नाही जे की, अव्यावहारिक आहे.

४. सामान्यत: प्रत्येक राष्ट्रांसाठी अदान-प्रदान सारणी उपलब्ध नसते आणि ज्या राष्ट्रांसाठी ही सारणी उपलब्ध आहे, तेथे माहितीचे संकलन आणि प्रमाणीकरणाच्या असमानतेमुळे त्याची अचुकता मर्यादीत आहे.

५. पर्यावरणीय प्रभावांचे अचूक मोजमाप आणि विविध क्षेत्रांसाठी त्या प्रभावांचे निर्धारण हे नेहमीच अत्यंत कठीण कार्य आहे. कारण विशेषत: मोठ्या कालावधीच्या संदर्भात पर्यावरणीय प्रभावांची मालसूची मिश्रीत माहिती आधारामुळे (Mixed database) निर्दोष राहू शकत नाही.

**सारांश :**

आजमितीला पर्यावरणीय ऱ्हास ही जागतिक पटलावर अत्यंत गंभीर समस्या म्हणून पुढे येत आहे. पर्यावरण ही सार्वजनिक वस्तु असल्याने बाह्यातांमुळे उत्पादन, उपभोग यासारख्या आर्थिक क्रियांशी संबंधीत पर्यावरणीय ऱ्हासाची किंमत उत्पादन व्ययात समाविष्ट करण्यात बाजार यंत्रणा सातत्याने अपयशी ठरते. विविध वस्तू व सेवांच्या उत्पादनाशी संबंधीत पर्यावरणीय ऱ्हासाची किंमत 'प्रदूषण कर' (Pollution Tax) यासारख्या उपायांच्या माध्यमातून त्यांच्या उत्पादन व्ययात समाविष्ट करून, त्या विविध वस्तु व सेवांचा उपभोग करणाऱ्या अंतिम उपभोक्त्यावर त्याची जबाबदारी निश्चित करणे शक्य आहे. त्यामुळे अशा वस्तु व सेवा ज्या पर्यावरणाला घातक आहेत. त्याच्या किंमती वाढून त्यांचा उपभोग प्रतिबंधित व नियंत्रीत होऊ शकेल. तथापि याकरिता त्या विविध वस्तु व सेवांच्या उत्पादनाशी संबंधीत उर्ध्वप्रवाही (प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष) पर्यावरणीय प्रभाव तसेच विविध राष्ट्रांदरम्यान होणाऱ्या व्यापारामध्ये समाविष्ट प्रभावांचे मोजमाप करणे हे मोठे आव्हानात्मक कार्य आहे. त्यासाठी पर्यावरण विस्तारीत आदान-प्रदा विश्लेषण हे अत्यंत उपयुक्त तंत्र सिद्ध झाले आहे.

**संदर्भ सूची :**


1. Davis, S.; Peters, G.; Caldeira, K. (2011), "The supply chain of CO2 emissions", Proc. Natl. Acad. Sci. USA 108, 18554-18559.
2. Food and Agriculture Organization, Available online: http://faostat.fao.org/ (Accessed on 15 September 2013).
3. Kitzes, Justin (2013), " An Introduction to Environmentally - Extended Input - Output Analysis", Resources 2013, 2, 489-503; doi: 10.3390/resources 2040489
4. Leach, A.M.; Galloway, J.N.; Bleeker, A.; Erisman, J.W.; Kohn, R.; Kitzes, J. A (2012), "Nitrogen footprint model to help consumers understand their role in nitrogen losses to the environment", Environ. Dev. 1, 40-66.
5. Leontief, Wassily (1970), "Environmental Repercussions and the Economic Structure: An Input-Output Approach," Review of Economics and Statistics, 52, No. 3 (August), 262-271.

6. Miller, Ronald E.; Blair, Peter (2009), "Input-Output Analysis: Foundations and Extensions", Cambridge University Press,. p 10.
7. Minx, J.; Wiedmann, T.; Wood, R.; Peters, G.; Lenzen, M.; Owen, A.; Scott, K.; Barrett, J.; Hubacek, K.; Baiocchi, G.; et al. (2009), "Input-output analysis and carbon foot printing: An overview of applications", Econ. Syst. Res., 21, 187-216.
8. Peters, G.P.; Hertwich E.G. (2008), "CO2 embodied in international trade with implications for global climate policy", Environ. Sci. Technol. 42, 1401-1407.
9. Schaffartzik, Anke; Sachs, Magdalena; Wiedenhofer, Dominik; Eisenmenger, Nina (2014), "Environmentally Extended Input-Output Analysis", Social Ecology Working Paper 154, Vienna
10. United Nations Commodity Trade Statistics Database. Available online: http://comtrade.un.org/ (accessed on 15 September 2013).
11. Wiedmann, T. Editorial (2009), "Carbon footprint and input-output analysis-An introduction", Econ. Syst. Res., 21, 175-186.
12. Wiedmann, T.; Minx, J.; Barrett, J.; Wackernagel, M. (2006), "Allocating ecological footprints to ?nal consumption categories with input-output analysis", Ecol. Econ, 56, 28-48.


◆◆◆

# नाबार्डची ग्रामीण विकासातील समन्वयी व विकासात्मक भूमिका : एक टीप

**राजश्री रायभोग**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना :**

देशातील ग्रामीण समाजाचे उन्नयन व पूर्नसंरचना घडवून आणणे म्हणजे खऱ्या अर्थाने देशाचा विकास होणे होय. कारण ग्रामीण समाज हा समाजरचनेतील मानवी विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण व कळीचा (key factor) घटक आहे आणि शेती ही देशातील अन्य क्षेत्राच्या विकासाचे व भरभराटीचे मूळ आहे. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी भांडवल (प्रत्यय) हे महत्त्वपूर्ण साधन आहे. ह्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात अधिकोषणाची सोय ही आर्थिक विकासाची एक पूर्वअट मानता येईल. कारण अधिकोषातर्फे होणारा शेतकी प्रत्ययपूरवठा हा केवळ भांडवल उपलब्ध करून देण्याचा किंवा असंस्थागत साधनाकडून संस्थागत साधनाकडे वळविण्याचा प्रयत्न नाही तर शेतीची उत्पादकता तसेच भूमी, श्रम, भांडवल यांची उत्पादकता वाढविण्याकरिता योग्य ते तंत्रज्ञान स्विकारण्यासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध करून देण्याचे ते एक मुलभूत साधन आहे. हाच दृष्टीकोन लक्षात घेऊन ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सुरूवातीला निरनिराळ्या सहकारी पतसंस्था, भूविकास बँका यांची स्थापना करण्यात आली. परंतु त्यांच्या मर्यादा व ग्रामीण भागातील विकास कामाचा व्याप लक्षात घेता भारतीय रिझर्व्ह बँक सुद्धा या क्षेत्रात पुढे आली. परंतु भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कार्यप्रणालीची व्याप्ती लक्षात घेऊन तसेच ग्रामीण भागातील विकास कार्यासाठीच वेगळ्या संस्थेची जाणीव लक्षात घेऊन राष्ट्रीय स्तरावरील शिखर बँक म्हणून NABARD चा जुलै १९८२ च्या सुमारास उदय झाला. नाबार्ड ही संस्था रिझर्व्ह बँक आणि ग्रामीण भागाशी संबंधित व्यापारी बँक, प्रादेशिक ग्रामीण बॅक, शेतकी वित्त निगम, राज्य सहकारी बँक यांच्यामधील महत्त्वाचा दुवा म्हणून कार्य करते. पुर्नवित्त पुरवठा करते.

**नाबार्डची रचना – व्यवस्थापन :**

ग्रामीण भागाचा विकास व शेतीला विशेषत: अल्पभूधारक शेतकऱ्यांना वित्तपुरवठा होण्यासाठी पुर्नवित्त सहाय्य करणे हे नाबार्डचे मुख्य उद्दिष्ट असून कर्जप्रक्रिया, कर्जवितरण, उपयोजन, वसुली ह्या क्रिया योग्य प्रकारे होण्यासाठी नाबार्डचे स्वत:चे १४ विभाग आहेत.

ते पुढीलप्रमाणे–

1) Project & Operation Dept. 2) Inspection Dept. 3) Finance and Account Dept. 4) Human Resource Management Dept. 5) Management Service Dept. 6) Law Dept. 7) General

Administration & Premises Dept. 8) Secretary Dept. 9) Internal Audit Dept. 10) Vikas Volunteer Vahini Dept. 11) Planning and Development Dept. 12) Institutional Development Dept. 13) Economic Analysis and Publication Dept. 14) Technical Services Dept.

नाबार्डचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असून १६ प्रादेशिक कार्यालये देशाच्या विविध भागात आहेत तसेच उपकार्यालये देखील आहेत.

नाबार्डच्या वित्ताचे स्रोत हे भाग भांडवल राखीव निधी व आधिक्य, दिर्घकालीन निधी, ठेवी इ. आहेत आणि नाबार्ड अल्प, मध्यम व दिर्घमुदतीच्या कर्जपुरवठ्यासाठी विशिष्ट संस्थांना कर्जपुरवठा करते, हे तिचे महत्त्वाचे कार्य आहे. परंतु पुनर्वित्त पुरवठा करणे हेच एकमेव कार्य करीत नसून अनेक समन्वयात्मक व विकासात्मक कार्यात नाबार्ड महत्त्वाची भूमिका बजावते.

**नाबार्डचे समन्वयात्मक कार्य :**

समन्वयात्मक कार्यामध्ये प्रत्यय वितरण प्रणालीचे सक्षमीकरण, वित्तीय संस्थांच्या कर्जवसुली पद्धतीत सुधारणा, राज्य सरकार व बँक अधिकाऱ्यांचे चर्चासत्रे, अधिवेशने, बँकांचे निरीक्षण (Inspection) इ. वैशिष्ट्यपूर्ण कार्यांचा समावेश होतो. यातील प्रत्ययवितरण प्रणालीचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने पायलट प्रोजेक्ट (Pilot Project) हा महत्त्वाचा आहे.

कर्जपुरवठा प्रणालीला बळकटी आणण्यासाठी तसेच त्यात सुधारणा करण्यासाठी नाबार्डने १९८३-८४ मध्ये हा प्रकल्प राबवला. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश प्रत्ययाच्या गुणवत्तेत, उपयोजनात सुधारणा व प्रत्ययाच्या वापरावर नियंत्रण ठेवणे हा आहे. याशिवाय निधीचे जलद पुनश्चक्रण (recycling), कर्जप्रकारात विविधीकरण, नवीन स्रोत शोधणे तसेच काटकसरीचा उपयोग करून कर्जदारांना कर्ज घेण्यापूर्वी व कर्ज घेतल्यानंतर येणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे हे ही उद्देश आहेत.

हा प्रकल्प सर्वप्रथम औरंगाबाद (महाराष्ट्र) होशंगाबाद (मध्यप्रदेश) आणि साबरकंठा (गुजराथ) या तीन जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आला. वित्तपुरवठा होणाऱ्या संस्थाकडून त्यांच्या कर्जदारांचे वैयक्तिक स्तरावर निरीक्षण, परिक्षण करण्याकरिता निरीक्षणकर्त्याची नेमणूक करण्यात आली. त्यांना यासंबंधी प्रशिक्षण देण्यात आले. तसेच त्यांची गतिक्षमता वाढविण्यासाठी मोटारसायकल व जीपची व्यवस्था देखील करण्यात आली. या सर्व प्रयत्नांचा संबंध कर्जाचे योग्य उपयोजन वाढविण्यासाठी होता. शेतकऱ्यांची वागणूक त्यांची मानसिकता, त्यांच्याशी हितगुज साधण्याचे तंत्र यासंबंधीची माहिती वेगवेगळ्या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये देण्यात आली. या प्रकल्पाचे आशादायी व उत्साहवर्धक यश पाहता हा प्रकल्प अजून १७ जिल्ह्यांमध्ये १ जुलै १९८६ पासून राबविण्यात आला आणि पूर्वीच्या तीन जिल्ह्यात मध्य-कालीन मूल्यांकन करण्यात आले. जागतिक बँकेच्या मदतीने या प्रकल्पाचे अनेक सकारात्मक व नकारात्क पैलू समोर आले.

सकारात्मक पैलूमध्ये ठेवीची गतिशिलता, कर्जवसुलीत सुधारणा, प्रत्ययाचा सतत प्रवाह, कर्जप्रकाराचे वैविधीकरण, बँकाचे आंतर सहकार्य इ. बाबी दृगोच्चर झाल्या. तर नकारात्ममक पैलूमध्ये

अपूरा कर्मचारी वर्ग (Field staff) अपूरी वाहनांची सोय या बाबी समोर आल्या. पुढच्या काळात या उणिवा दूर करण्याचा प्रयत्न केला गेला. अशा प्रकारे हा प्रकल्प तीन जिल्ह्यासाठी ३० जून १९९० पर्यंत आणि उरलेल्या इतर जिल्ह्यांसाठी ३१ डिसेंबर १९९० पर्यंत विस्तारित केला गेला.

**नाबार्डची विकासात्मक भूमिका :**

नाबार्डच्या विकास कार्यामध्ये विदेशी मदतीच्या सहाय्याने प्रकल्पांची उभारणी, विकास स्वयंसेवी वाहिनी, अधिकारी व कार्यालयीन स्तरावरील प्रशिक्षण व विस्तार कार्यक्रम, नाबार्डने राबविलेल्या कार्याचे परिक्षण, निरीक्षण व मूल्यांकन इ. कार्याचा समावेश होतो. यापैकी विकास स्वयंसेवी वाहिनीची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे.

''प्रत्ययातून विकास'' या धारणेतून विकास वाहिनीचा उदय पुढील पाच तत्वांच्या आधारावर झाला.

१) आवश्यक तंत्र व विज्ञानाकरिता प्रत्ययाचा उपयोग

२) प्रत्ययाच्या नियम व अटींची पूर्तता.

३) युक्ततम उत्पादकता व उत्पादनासाठी कौशल्यपूर्ण कामाचा स्विकार

४) जीवनमानाचा उच्च दर्जा व भूमी आणि भूमीतर उपयोगासाठी पूरक उत्पन्नाची निर्मिती.

५) निधीच्या कार्यक्षम चक्राकार प्रवाहाकरिता कर्जाची योग्य कालावधीत परतफेड.

लहानात लहान व सर्वात लहान व अज्ञानी शेतकऱ्यांना प्रत्ययाच्या उपयोगाची माहिती करून देणे व इतर अपप्रचारापासून व गैरसमजूतीतून त्यांना बाहेर काढणे हेच मुख कार्य या वाहिनींना करावे लागते.

वरील पाचही तत्वांना अनुसरून प्रत्ययाची माहिती दुर्गम भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी स्वयंसेवकाची निवड करतांना तो कोणत्याही राजकीय पक्षाचा नसावा. निवड प्रक्रिया चालेल अशा सरकारी स्तरावर काम करणारा नसावा. उदा. ग्रामपंचायत, पंचायत समिती इ. या बाबींचा विचार केला जातो. तसेच त्या व्यक्तीने त्या भागात ३ ते ४ वेळा दौरा करून प्रात्यक्षिकाद्वारे लोकांना माहिती पुरविण्याचे काम केले पाहिजे, अशा प्रकारचे निकष ठरविले जातात.

शेतकऱ्यांना त्यांच्या रिकाम्या वेळात त्यांच्याशी भेटून चर्चा करून त्यांच्या शेती करण्याच्या पद्धतीबद्दल व कर्जपुरवठ्याद्वारे मिळालेल्या यशाबद्दल माहिती मिळविणे तसेच त्यांच्या बोलीभाषेतून त्यांना दृकश्राव्य माहिती पुरविणे, दोन दोन गावांना जोडून त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे(कर्ज घेण्याच्या पद्धती, उपयोग व परतफेडीबाबत) त्यांच्या समाधानकारक कार्यानुसार नाबार्ड अशा सेवकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य करते.

नाबार्डचे अधिकारी, तंत्रज्ञ तसेच सहकारी बँक, व्यापारी बँक प्रतिनिधी व स्वयंसेवक यांच्यामध्ये सतत संपर्क होत राहतो, व त्यानुसार विकास वाहिनीच्या यशाचे सतत मूल्यांकन केले जाते.

निवड झालेल्या स्वयंसेवकांना खर्च व मानधान दिले जाते. नाबार्डचे अधिकारी व शेतकरी यांच्यामधील दूवा साधण्याचे कार्य विकास वाहिनी करते. अशा स्वयंसेवकांना थोडे फार प्रशिक्षणही दिले जाते.

या वाहिनीचे ५ नोव्हेंबर १९८२ मध्ये नवी दिल्ली येथे प्रधानमंत्री स्व. इंदिरा गांधी यांच्या हस्ते उद्घाटन झाले तसेच १९८३ मध्ये

तामीळनाडूच्या मदूराई व तिरूचिरापल्ली येथेही विस्तारण झाले. तसेच काही स्वयंसेवकांना गांधी ग्राम रूरल इन्स्टिट्यूट, मदूराई येथे प्रशिक्षण देण्यात आले. पहिल्या बॅचमध्ये ३७ स्वयंसेवकांची निवड झाली व लाभकारी शेतकऱ्यांना यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. दोन शेतकरी व एक तंत्रज्ञ अशी तिघांची टिम असलेले १०० युनिटस् तयार करण्यात आले. दुसऱ्या बॅचमध्ये युनीटची संख्या अजून वाढविण्यात आली. तसेच गुजराथ व ओरिसा हे राज्य त्यात अंतर्भूत करण्यात आले. त्या त्या राज्यातील बँकांना व्हॉलीटीयर युनिट्स तयार करून त्यांची जबाबदारी घेण्यास उत्तेजित करण्यात आले. अशा प्रकारे १९८७-८८ पर्यंत १८ राज्य व १ केद्रशासीत प्रदेश मिळून ३३८ क्लबची संख्या होती.

विकास स्वयंसेवी वाहिनीचे मुख्य वैशिष्ट्य हे सांगता येईल की बहुतेक बँकांनी स्वत: हे कार्यक्रम राबविले, ''ग्रामीण विकासात स्वयंसेवी सहकार्य'' हे या कार्यक्रमाचे मुख्य सुत्र आहे. तसेच बँकांनी देखील हा कार्यक्रम आपला मानला. या कार्यक्रमाचे यश अजून वाढविण्याकरिता यामध्ये ग्रामीण महिलांना प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे.

**समारोप :**

नाबार्डची ही समन्वयी व विकासात्मक भूमिका कर्जप्रक्रियेचे प्रसारण व विस्तारण याकरिता महत्त्वाची असून ग्रामीण विकास घडवून आणण्यात दूवा साधण्याचे कार्य करीत आहे.

**संदर्भ सूची :**

1. Veepaul Kaur Maan and Amritpal Singh : Role of NABARD and RBI in Agricultural sector growth - International Journal Emerging Research in Management & Technology - ISSN-2278-9359 (Vol. 2, Issue 3)
2. www.yourarticlelibrary.com
3. डॉ. विजय कविमंडल (२०१२) : कृषि व ग्रामीण अर्थशास्त्र, प्रकाशन श्री मंगेश प्रकाशन, २३, नवी रामदासपेठ, तरूण भारत जवळ, नागपूर.
४. डॉ. विवेक शर्मा (२००९) : कृषि प्रबन्ध, अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.

◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# 'स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव'

**लेखक – वर्षा गंगणे**

(प्रकाशक – ऋचा प्रकाशन, नागपूर, पृष्ठ : १८४, मूल्य : २५० रू.)

**संगीता टक्कामोरे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (रामटेक)

प्रा. डॉ. वर्षा गंगणे यांनी लिहिलेले पुस्तक 'स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि वास्तव' वाचले आणि मी भारावून गेले.

स्त्रियांच्या सद्य:स्थितीचे वास्तव अत्यंत समर्पक शब्दात डॉ. गंगणे यांची चित्रित केले आहे. त्या त्यांचे वर्णन करतांना लिहितात ''एकीकडे मंदिरात देवीची आराधना करायची, तिचे गोडवे, आरत्या गायच्या पण मंदिरातून बाहेर पडताच स्त्रीकडे विकृत नजरेने पहायचे''. प्रश्न एवढाच आहे की मनातील मळभ दूर झालेले नसताना कशाला करायची अशी पूजा? का करायचे नवरात्रीचे उपवास, जागर आणि पारायणे?

रस्त्यावरच्या मुली, स्त्रिया सुरक्षित राहणार नसतील तर आपल्या घरातील स्त्रिया व मुली कशा सुरक्षित राहतील? कारण एक दिवस त्याही रस्त्यावर येतीलच. रोज सभोवताल घडणाऱ्या घटनांमुळे आज देशातील प्रत्येक बापाला आपल्या मुलीच्या सुरक्षेची, भावाला आपल्या बहिणीची, पतीला आपल्या पत्नीची, मित्राला आपल्या मैत्रिणीच्या सुरक्षिततेची चिंता भेडसावत आहेत.

आज स्त्रियांची स्थिती सामाजिक, राजकीय, आर्थिकदृष्ट्या कशी आहे याचे मार्मिक वर्णन या पुस्तकातून केले आहे. सामाजिक स्वातंत्र्याच्या बाबतीत स्त्रियांची दयनीय अवस्था त्या वर्णित करतात. स्त्रियांना स्वत:च्या अस्तित्वाची स्वतंत्र ओळखसुध्दा नसते. ती कोणाची तरी आई, मुलगी, बहिण, सासू, आत्या, मावशी, बायको या संबोधनानेच परिचित असते. लग्नापूर्वी वडिलांची छत्रछाया तर लग्नानंतर नवऱ्याची ती सावली असते. सामाजिक रूढी परंपरा यांच्या ओझ्याखाली ती दबलेली असते. तिचा आवाज चार भिंतीच्या आत रोखण्याचा प्रयत्न केला जातो.

परंपराविरूध्द बंड पुकारणाऱ्या, अनिष्ठ रूढी नाकारणाऱ्या, घरातील पुरूष वर्गाने ठरविलेले नियम मोडणाऱ्या स्त्रियांना अपमान, छळ, प्रतारणा, अनेक जुलमांना सामोरे जावे लागते. स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या बाबतीत फक्त १% स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य आहे. भारतात आजही ९९% स्त्रियांना पूर्णपणे सामाजिक स्वातंत्र्य मिळालेले नाही.

'सातच्या आज घरात', 'घर की ईज्जत', 'मुलाचे रूप नाही गुण बघायचे असते' स्त्रियांची अक्कल यासारख्या अनेक बाबींचा उल्लेख त्यांनी करून स्त्रियांना स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही असा समजूतीचा सल्लाही दिला आहे.

सामाजिक स्वातंत्र्य मिळाल्यास स्त्रियांच्या निर्णयक्षमतेत वाढ घेऊन समाज खऱ्या अर्थाने सक्षम,

सुदृढ व आदर्श बनेल असा आशावाद व्यक्त केला आहे. आर्थिक स्वातंत्र्याच्या बाबतीत आजच्या जीवनमानामुळे पूर्वी जी केवळ चूल आणि मूल या पर्यंतच जिचं विश्व होत ती आता या दोन्ही गोष्टी सांभाळून अर्थार्जन करीत आहे. अर्थार्जनाच्या बाबतीत स्त्री पुरूष समानता असली तरी 'तिने फक्त कमवावे आणि त्याने खर्च करावे' असाच प्रघात असल्याचे सप्रमाण दाखवून दिले आहे.

सर्वेक्षणाचे आकडे त्यांनी दिले आहेत. कमावत्या स्त्रियांपैकी केवळ ७ प्रतिशत स्त्रिया आपले उत्पन्न स्वत:च्या मर्जीने खर्च करतात मात्र ९३ प्रतिशत स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाही. यासाठी सर्वेक्षणातील उदाहरण देतात की उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षिकेचा पूर्ण पगार तिचे पती किंवा सासरे काढतात आणि तिला महिन्याच्या खर्चाला फक्त १००० रू. देतात. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे हे हाल तर मजूरी करणाऱ्या स्त्रियांचे तर त्यापेक्षा प्रचंड हाल आहेत. पैशासाठी स्त्रियांना मारझोड करणे, भांडण करणे, शिवीगाळ करणे व प्रसंगी घराबाहेर काढणे हे प्रसंग अनेकदा घडतात.

स्त्रियांच्या अन्यायाचे, मागास राहण्याचे, दुर्बल असण्याचे कारण सांगतात. ''स्त्रियांच्या अनेक समस्यांचे मूळ तिच्या आर्थिकदृष्टचा स्वतंत्र्य नसण्यात आहे. स्त्रिया ज्यादिवशी आपले आर्थिक निर्णय स्वेच्छेने व स्वतंत्रपणे घेतील त्यादिवशी तिचा, कुटुंबाचा पर्यायाने देशाचा उत्कर्ष निश्चितपणे होईल.''

राजकारणात केवळ आरक्षणामुळे स्त्रियांचा संचार दिसतो. राजकारणात असलेल्या अनेक स्त्रिया ह्या केवळ रबरी शिक्क्यासारख्या आहेत. मात्र सत्तेची किल्ली जोपर्यंत समर्थपणे स्त्रियांच्या हातात येणार नाही व ती स्वत:चे निर्णय, स्वबळावर घेणार नाही तोपर्यंत स्त्रियांचा उत्कर्ष होणार नाही.

स्त्री चळवळीचा इतिहास या पुस्तकातून यथार्थपणे मांडला आहे. ८ मार्च १८५७ ला सुरू झालेला लढा, त्यानंतरही स्त्रियांनी आपल्या मुक्तीसाठी केलेली लढाई याचा सविस्तर परामर्श घेऊन शेवटी त्या सर्व स्त्रियांना आवाहन करतात. ''स्त्री स्वातंत्र्यासाठी लढलेल्या स्त्रियांनी लावलेल्या वृक्षांची फळे आज आपण चाखत आहोत. महिला दिनाची आठवण सदैव जिवंत ठेवण्यासाठी आपणही नवीन ध्येयाचे रोपटे लावू या.''

स्त्रियांचे दु:ख चितारतांना त्या म्हणतात,

''किसी को मेरे दु:खो की खबर भी हो कैसे।
मै हरेक से मिलती हू मुस्कुराते हुये। ''

स्त्रीचा जन्म त्यांना भोगाव्या लागणाऱ्या यातना, सहन करावे लागणारे अपमान, सोसावी लागणारी लाचारी या सर्वासोबतच स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा हीन दृष्टिकोन यामुळे मुलीचा जन्मच अशुभ असे समजून स्त्रीभ्रृणहत्येसारखे महापाप समाजात सुरू झाले. गर्भलिंग तपासणीमुळे मुलींना गर्भाशयातच संपविण्यात येऊ लागले याचा दुष्परिणाम म्हणून भारतातील स्त्रियांचे झपाट्याने कमी झालेले प्रमाण ही भयसूचक परिणाम घेवून येणारी आहे हे सांगतांना त्यांनी गुजरात राज्यातील डांग या गावातील स्वरूप नावाच्या मुलीचे एकाच घरातील आठ भावांशी लावून दिलेले लग्न. तर उत्तरप्रदेशातील स्त्रियांची घटती संख्या तेथील स्त्रियांना कोणत्या संकटांना सामोरे जावे लागते हे त्यांनी उदारहणाव्दारे पटवून दिले आहे.

शासन स्त्रियांच्या उत्थानासाठी विविध योजना राबवित आहे पण व्यापक प्रमाणात

स्त्रियांच्या विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्या नमूद करतात.

निसर्गाने स्त्री शरीराची रचना अशाप्रकारे केली आहे की, ती स्वत: सकल विश्वाची जननी ठरली आहे. निर्माता जगज्जेता ईश्वराच्या खालोखाल स्त्रीचे स्थान आहे. काळ कोणताही असो स्त्री हा नेहमीच कुतुहलाचा व चर्चेचा, अभ्यासाचा आणि वादाचा विषय राहिला आहे. पौराणिक काळात ती वंदनीय, मधल्या काळात ती प्रशंसनीय तर वर्तमानकाळात ती निंदनीय व उपेक्षित ठरविली गेली. सकल मानवसमूहाची जननी, दुय्यम, निंदनीय व उपेक्षित ठरविली जाणे ही स्त्रीच्या सुरक्षिततेच्या पर्यायाने समाजाच्या अस्मितेच्या दृष्टीने एक निंदनीय बाब होय. समाजाच्या असमतोलाचे प्रतिक होय. या पुस्तकातून डॉ. वर्षा गंगणे यांनी ग्रामीण भागातील प्रश्न, स्त्रियांना भेडसावणाऱ्या समस्यांचा सखोल उहापोह केला आहे. वेश्या, देवदासी, असणाऱ्या स्त्रियांचे दाहक वास्तव मांडून स्त्रियांच्या देहाचा बाजार केव्हा संपणार हा प्रश्न उपस्थित केला आहे. स्त्रियांचे कुपोषण व त्यामुळे स्त्रियांना होणारे रोग, यांची सांख्यिकीय माहिती देवून हा प्रश्न किती व्यापक आहे हे निदर्शनास आणून दिले आहे.

स्त्रियांच्या स्वातंत्र्य, समानतेसाठी वेळीच पाऊले उचलली गेली नाही तर क्रांतीची ठिणगी पडून जगाला मोठ्याा उद्रेकाला सामोरे जावे लागेल. याचे वर्णन त्या करतात, संपूर्ण देशात स्त्रियांवरील वाढत्या अत्याचाराचे सत्र व त्याप्रती शासनाची असलेली उदासिनता यामुळे समस्त स्त्री वर्गात रोष व उद्रेकाची भावना वाढीस लागून क्रांतीची ठिणगी पडेल. जगाच्या पाठीवर कधीही न घडलेली ती एक अनोखी क्रांती ठरेल. पुन्हा एकदा पुरूषवर्गाविरूध्द समस्त स्त्री वर्गानी पुकारलेले बंड जागतिक पातळीवरील एक क्रांती ठरेल. स्वत:च्या आत्मसन्मानासाठी कायद्याच्या पलीकडे जाऊन अशी क्रांती घडवून आणण्यासाठी ती बाध्य ठरेल. यात समंजस व सभ्य पुरूष वर्गदेखील भरडला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यासाठी पुरूषांनीच पुढाकार घेण्याची गरज आहे. 'स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल व वास्तव' या पुस्तकातून स्त्री स्वातंत्र्याच्या अर्थापासून गरज महिला सभांची या एकूण १४ प्रकरणातून प्रा.डॉ.वर्षा गंगणे यांनी स्त्री इतिहासाचा भूतकाळ व वर्तमानकाळ समर्थपणे चित्रित केला आहे.

भविष्यात स्त्रियांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास कोणत्या संकटांना सामोरे जावे लागेल याचे सूतोवाच केले आहे. या वास्तवाचे दर्शन होऊन स्त्री सक्षमीकरणसाठी सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे असून याची सुरूवात आजपासून व्हायला हवी अन्यथा उशीर झालेला असेल.

वाचकांनी या महत्वपूर्ण पुस्तकातील सर्व संदर्भ व त्यावरील लेखिकेचे परखड भाष्य मूळात या पुस्तकाचे वाचन केल्यास आपल्या लक्षात येईल. संग्रही ठेवण्यासारखे हे पुस्तक प्रत्येक अभ्यासकाकडे असायलाच हवे.

◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# आर्थिक जगत (खंड ४)

**लेखक – दि.व्यं.जहागिरदार**

(प्रकाशक –कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी संचालित सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज,अमरावती पृ. २००, मूल्य : ३००/- रू)

**विवेक चौधरी**
विभाग प्रमुख अर्थशास्त्र, राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती.

डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांच्या 'आर्थिक जगत' खंड १, २ आणि ३ ला मिळालेल्या प्रतिसादानंतर ह्या आर्थिक जगत खंड ४ च्या प्रकाशनाची उत्सुकता प्राध्यापक, विद्यार्थी आणि वाचकांमध्ये होती. प्रस्तुत पुस्तकी ग्रंथामध्ये १ ऑगस्ट २००९ ते ३१ जुलै २०१३ पर्यंतच्या कालावधीमधील 'दै.हिंदूस्थान' या वृत्तपत्रामध्ये 'आर्थिक जगत' सदराखाली प्रसिद्ध झालेल्या जवळपास १७१ लेखांमधून निवडक आणि वर्तमान परिस्थितीनुरूप योग्य अशा ५० लेखांची निवड करण्यात आली आहे.

आर्थिक जगत खंड ४ च्या मनोगतामधून लेखकाने ग्रंथनिर्मिती संदर्भातील भूमिका व उपयुक्तता विशद केलेली आहे. तसेच लेख लिहितांना संदर्भ ग्रंथ, विविध अहवाल, संशोधन पत्रिका, एकॉनोमिक टाईम्स तसेच इंटरनेटवरील विविध संकेतस्थळे यांचा समर्पक उपयोग घेण्यात आल्याचा उल्लेख केला आहे. ग्रंथामधील विविध लेखामधील वैविध्य लक्षात घेता लेखकाचा दृष्टीकोन, त्यांची विषय मांडण्याची शैली, भाषेची जाण इ. मुळे लेखनातील लेखकाच्या व्यक्तीमत्वाची छाप निश्चितच जाणवते.

ग्रंथ लेखनाच्या अनुषंगाने विविध विषय हाताळत असतांना हवामान बदल, युनोच्या स्टिगलिट्स कमिशनचा अहवाल, जागतिक पातळीवरील पिण्याच्या पाण्याची स्थिती, ज्ञान अर्थव्यवस्था, शिक्षणाच्या पैलूची स्थिती, विकास आणि प्रदूषण-तात्विक चर्चा, गाव गाडा, ग्रामीण जीवनाचे चित्रण, स्त्रीयांच्या विकासाची व्यूहरचना, रूपयाच्या विदेशी विनिमय मूल्यात घसरण, स्वरूप व परिणाम, जागतिक अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप, डॉ. पंजाबराव देशमुखांचे आर्थिक विचार तसेच भारताच्या सशस्त्र दलाच्या शस्त्रावरील खर्चाचे विवेचन इत्यादी स्वरूपाचे ग्रामीण, स्थानिक, विभाग, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांच्या विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांना उत्कृष्टपणे हाताळत असतांना नैसर्गिक दृष्टीकोनाकडे दुर्लक्ष न होऊ देण्याचे कसब 'आर्थिक जगत खंड ४' च्या लेखनिर्मितीमधून प्रतिबिंबीत होते. यामध्ये लेखकाचा चौफेर विषयावरील वाचनाचा व्यसंग, अध्यापन क्षेत्रामधील अनुभव, विविध विषय सहज हाताळण्याची लाभलेली दृष्टी लेखकाचे वेगळेपण स्पष्ट करते.

गेल्या १०-१२ वर्षापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेला जाणारा 'हवामानातील बदल'या ज्वलंत प्रश्नावर टाकलेला दृष्टीक्षेप निश्चितच महत्त्वपूर्ण वाटतो. जागतिक पातळीवर वाढत असणाऱ्या उष्णतामानाचा घातक परिणाम सजीव

सृष्टीवर होत असतांना आशिया खंडामध्ये पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण होऊ शकते असे भवितव्य वर्तविले तसेच जागतिक हवामान बदलास विकसित देश कसे जबाबदार आहेत ही बाब स्पष्ट करून 'पुन्हा निसर्गाकडे जाऊया' हा संदेश देतांना लेखकाने सामाजिक स्वास्थाप्रती आपली बांधिलकी स्पष्ट केली आहे.

ज्ञान अर्थव्यवस्था ह्या महत्त्वपूर्ण विषयाचा जागतिक आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या पातळीवर कसा विचार होत आहे याबद्दल मत मांडतांना भविष्यामध्ये भारतीय अर्थव्यवस्था ज्ञान अर्थव्यवस्थेत परिवर्तीत होऊ शकेल पण त्यासाठी शिक्षण क्षेत्रामध्ये धोरणात्मक बदल करावे लागतील असा सूचक प्रश्न मांडतांना शिक्षण क्षेत्रामध्ये भविष्यामध्ये बदल अपेक्षित आहेत असे अप्रत्यक्षरित्या सांगितले आहे.

भारतातील असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या प्रश्नावर आपले विचार व्यक्त करतांना १५-२० वर्षापासून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे असंघटित क्षेत्रातील श्रमिकांची संख्या वाढत आहे ही चिंताजनक बाब असल्यामुळे अशा श्रमिकांच्या समस्यांचे स्वरूप व त्यावर उपाय कसे करता येतील यावरून असंघटीत क्षेत्रामधील श्रमिकांच्या समस्येचे गांभीर्य लेखकांच्या मनावर विशिष्ट परिणाम करणारे ठरले असे लक्षात येते.

तलावाच्या विकासाची व्यूहरचना अशा स्वरूपाचा प्रश्न हाताळतांना हवामानातील बदलामुळे देशातील सिंचन क्षेत्र प्रभावित होते तेव्हा भारतामध्ये मध्यम व छोटे सिंचन प्रकल्प अधिक उपयुक्त ठरतील यावरून भविष्यामध्ये सिंचन क्षमता वाढविण्यासाठी तलावाच्या महत्त्वाची आणि उपयुक्तेची माहिती मिळते. विकसनशील देशांमध्ये येणाऱ्या घातक भांडवली प्रवाहामुळे जागतिक संकट निर्माण होत आहे. यासंदर्भात विश्लेषण करतांना गेल्या काही वर्षापासून सुरू असलेले जागतिकीकरण आणि त्या निमित्ताने बहुराष्ट्रीय कंपन्याचा विविध देशात होणार प्रवेश व विस्तार यामुळे विदेशी भांडवलाचे महत्त्व वाढत असून विविध देशाच्या अर्थव्यवस्थेवर बाहेरून येणाऱ्या भांडवली प्रवाहाचा प्रभाव सतत जाणवत आहे. परंतु प्रत्यक्षात असे मोठ्या प्रमाणात येणारे भांडवल संपत्तीमध्ये निष्कारण संपत्तीवाढीचा आभास (बुडबुडे) निर्माण करतात. अशा स्वरूपाचे मत मांडलेले असून यामधून लेखकाने विकसनशील देशांमध्ये भविष्यामध्ये अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

जी.व्ही.जोशी स्मृती शताब्दी वर्षानिमित्ताने त्यांच्या कार्याच्या आढावा घेतांना ऑक्टोबर १८९० मध्ये लिहलेला The Economic situation in India हा लेख तात्कालिक परिस्थितीमध्ये खुप चर्चील्या गेल्याचे विशेषत्वाने नमुद केले. भारताच्या आर्थिक प्रश्नावर आकडेवारीच्या सहाय्याने विवेचन करणारे ते पहिले अर्थतज्ञ आहेत असे परखड मत विशद केले आहे. ३१ ऑक्टोबर २०११ ला जागतिक लोकसंख्या ७०० कोटी झाल्याच्या निमित्ताने नैसर्गिक संसाधनावर पडणारा प्रचंड भार, त्यामुळे कोणत्या समस्या अधिक समस्या गंभीर होतात तसेच लोकसंख्येचे नियंत्रण करण्यासाठी कोणते धोरण यशस्वी होऊ शकते याबद्दल विस्तृत माहिती देण्यात आली आहे.

भारतीय रूपयाचे विदेशी विनिमय मूल्य सतत घसरत आहे. अल्पकाळासाठी का असेना विनिमय मूल्यामध्ये झालेली घसरण निश्चितच

काळजी करण्यासारखी ठरते. ही मूल्य घसरण कोणत्या कारणामुळे झाली? संभाव्य परिणाम अर्थव्यवस्थेवर कोणते होऊ शकतात? चलनाचे अंतर्गत व बाह्य मूल्य ह्यांचा सहसंबंध कसा असतो विविध देशाच्या चलनाशी हा सहसंबंध कसा व्यक्त केला जातो इत्यादी बाबतीत प्रस्तूत भागामध्ये सुक्ष्म विवेचन करण्यात आल्याचे दिसून येते.

युरोपियन युनियनचा सदस्य असणारा 'ग्रीस' हा देश लोकसंख्येने लहान देश असून गेल्या २-३ वर्षापासून शासनाने केलेल्या प्रचंड खर्चाने त्या देशामध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे. या देशामधील वित्तीय बाजार संकटात आला आहे. तज्ञमंडळींनी ग्रीसला खर्चात मोठी कपात करण्याचे उपाय सूचविले आहे. ग्रीस प्रमाणेच स्पेन, पोर्तुगाल आर्यलंड इ. देशांची देखील परिस्थिती प्रतिकुलच आहे. तेव्हा युरोपियन युनियनच्या मौद्रिक व्यवस्था पाहणाऱ्या समितीस असे प्रश्न हाताळता येतील का? तसेच फ्रान्स जर्मनी सारखी प्रबळ राष्ट्रे त्यामध्ये राहतील तर तुलनात्मक दुर्बल राष्ट्रांना त्यामधून बाहेर पडावे लागेल का? अशा महत्त्वपूर्ण प्रश्नांचे उत्तर देणे अवघड असल्याचे लेखकाने विशद केले आहे.

प्रस्तुत पुस्तकामधील प्रत्येक लेखाच्या शेवटी सारांश रूपाने विश्लेषण करण्यात आले असून लेखकाने स्वत:चे मत विशद करून संबंधीत लेखाचे स्वरूप विशद करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना व संशोधकांना प्रत्येक लेख अत्यंत उपयुक्त ठरणारा असाच आहे. पुस्तकामधील गाव-गाडा, ग्रामीण जीवनाचे चित्रण, डॉ. पंजाबराव देशमुखांचे आर्थिक विचार, यशवंतराव चव्हाण यांनी केंद्रीय अर्थमंत्री म्हणून केलेले कार्य इ. चरित्र लेख वाचकांच्या मनात संबंधित व्यक्तीमत्वाबाबत अर्थशास्त्र अभ्यासकांना प्रेरणादायी व जिज्ञासा निर्माण करणारी ठरतील असे निश्चितच वाटते.

निवडक पाश्चिमात्य व भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील विविध महत्त्वपूर्ण प्रश्नावर प्रकाशझोत टाकणारा हा ग्रंथ म्हणजे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा संदर्भस्त्रोतच ठरावा असाच आहे. त्यामुळे प्राध्यापक, अर्थशास्त्र विषयाचे अभ्यासक, आर्थिक जगतचा नियमित वाचक वर्ग तसेच भविष्यामध्ये नेट-सेट ची तयारी करणाऱ्या भावी अध्यापकांसाठी हा ग्रंथांचे संदर्भमूल्य निश्चित अनमोल ठरावे असेच आहे.

डॉ. दि.व्यं.जहागिरदार सरांनी 'आर्थिक जगत'-(खंड ४) अत्यंत शास्त्रीय दृष्टीकोनातून उत्कृष्ट पुस्तक लिहल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

◆◆◆

**बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.पा.विज्ञान महाविद्यालय, दिग्रस (जि.यवतमाळ) येथे संपन्न झालेल्या .....**

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत (२०१५-१६)

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे वार्षिक अधिवेशन दि. ३० व ३१ जानेवारी २०१६ (शनिवार व रविवार) रोजी बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.पा. विज्ञान महाविद्यालय, दिग्रस (जि.यवतमाळ) येथे संपन्न झाले. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष मा. श्री. डॉ. प्रकाश दुबे, हरिद्वार हे होते. ४० व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष मा. डॉ. विनायक देशपांडे, विभाग प्रमुख व्यावसायिक व्यवस्थापन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर हे होते. तसेच प्रमुख अतिथी मा. श्री. श्यामभाऊ पाटील, मा.श्री. डॉ. अभय पाटील, सचिव, डी.व्ही.एस.पी.मंडळ, मा.डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार, मा.डॉ. अरूण तवार, तसेच समारंभाचे अध्यक्ष मा.श्री.विजयकुमारजी बंग, अध्यक्ष, डी.व्ही.एस.पी.मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.व्ही.आगरकर उपस्थित होते. दीप प्रज्वलनानंतर उपस्थितांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.व्ही.आगरकर यांनी केले. परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार यांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या उपस्थित अधिवेशनानिमित्त स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. एस.एन.ताडे व डॉ. करणसिंग राजपूत यांचे पुस्तकांचेही प्रकाशन करण्यात आले. डॉ. प्रकाश दुबे यांनी उद्घाटनपर भाषण केले. या प्रसंगी अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेचे विमोचन करण्यात आले. डॉ. अरूण तवार यांनी मनोगत व्यक्त केले. ४० व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष मा.डॉ. विनायक देशपांडे यांनी ''भारतातील अन्नधान्याच्या वाढत्या किंमती : प्रवृत्ति आणि कार्यकारण भाव'' या विषयावर अभ्यासपूर्ण अध्यक्षीय भाषण केले. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष मा. श्री. विजयकुमारजी बंग यांनी अधिवेशनास शुभेच्छा देऊन या भागातील अर्थव्यवस्थेच्या अभ्यासाची अपेक्षा व्यक्त केली. उद्घाटन सोहळ्याचे संचालन डॉ. अपर्णा पाटील यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विजय रोठे यांनी केले.

भोजनावकाशानंतर अधिवेशनाच्या पहिल्या सत्रामध्ये 'नव अभिमत पंथी अर्थशास्त्र आणि वितरणातील विषमता' या विषयावरील सत्राच्या अध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार, सूत्रसंचालक डॉ. प्रशांत काटोले आणि वृत्तसंकलक डॉ. संजय कोठारी यांनी कार्य केले. सदर विषयांवर डॉ. प्राची देशपांडे, डॉ. वनिता चोरे, प्रा.राजश्री रायभोग, प्रा. डी.एल.गुर्जर यांनी आपले निबंध सादर केले व डॉ. दि.व्यं.जहागिरदार, डॉ. अंजली कुळकर्णी, डॉ. स्नेहा देशपांडे, डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी

चर्चेत सहभाग घेतला. चहापानानंतर दुसऱ्या 'भारतातील निर्माणी क्षेत्रातील वर्तमान स्थिती व समस्या (मेक इन इंडियाच्या संदर्भात) या विषयावरील सत्राचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे, सूत्र संचालक डॉ. अंजली कुळकर्णी, वृत्त संकलक प्रा. हितेश दळमल यांनी जबाबदारी पार पाडली. या विषयावर डॉ. प्रशांत काटोले व प्रा. डॉ. किशोर गोमेकर यांनी निबंध वाचन केले व प्रा. धीरज कदम, डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ. प्राची देशपांडे यांनी आपले विचार व्यक्त केले.

वार्षिक अधिवेशनाच्या निमित्याने घेण्यात येणारे नाणेकर व पिंपरकर स्मृती व्याख्यानमालेचे वक्ते मा. प्रा.सुधीर व्ही.पाठक यांनी 'मराठा कालीन अर्थव्यवस्था' या विषयावर कल्याणकारी राज्य व न्यायोचित कर रचना या विषयी कथन केले. व्याख्यानाचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे आणि प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य एस.व्ही.आगरकर, कार्याध्यक्षा -डॉ. मुक्ता जहागिरदार होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन प्रा. विजय रोठे यांनी केले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रामध्ये आर्थिक ग्रंड़तील विचार विश्व ह्या उपक्रमाचे तिसरे पुष्प मा. प्राचार्य डॉ. एच.आर.तिवारी यांनी थॉर्स्टाईन व्हेब्लेन यांच्या "Theory of Leisure Class" या पुस्तकावर आपले अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले. ह्या सत्राचे अध्यक्ष मा.डॉ. विनायक देशपांडे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य एस.व्ही.आगरकर, डॉ. मुक्ता जहागिरदार, डॉ. प्रशांत हरमकर हजर होते.

'विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची ४० वर्षातील वाटचाल' या नवीन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे हे होते. या विषयावर डॉ. दि.व्यं.जहागिरदार, डॉ. अंजली कुळकर्णी, डॉ. आर.बी.भांडवलकर यांनी आपले मत व्यक्त केलेत तसेच प्रा. हनुवंते, प्रा. निवृत्त पिस्तुलकर यांनी सहभाग घेतला व शेवटी अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे यांनी अध्यक्षीय भाषण केले व या कार्यक्रमाची सांगता झाली.

दुसऱ्या दिवशी तिसऱ्या सत्रामध्ये 'विदर्भातील पिण्याच्या पाण्याची समस्या' (जिल्हा निहाय) या विषयावरील सत्राचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे, सूत्र संचालक डॉ. निवृत्त पिस्तुलकर, वृत्त संकलक प्रा.धीरज कदम यांनी कार्य केले. या विषयावर डॉ. करणसिंग राजपूत, प्रा.डॉ. प्रतिभा काळमेघ, डॉ. जे.व्ही.गायकवाड, प्रा. दिलीप महाजन, प्रा. कु. नसरीन शेख, प्रा.सुनिल घुगल, डॉ. माधुरी राखोंडे यांनी शोधनिबंध वाचन केले व अध्यक्षीय भाषणानंतर हे सत्र संपन्न झाले.

चहापाननंतर वार्षिक अधिवेशनाचे निमित्ताने ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. विनायक देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. आमसभेच्या सुरूवातीला प्रा. शरद देशमुख, प्रा. शंकरराव खोकले इत्यादी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज सुरू झाले. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, मागील आर्थिक वर्षाचा परिषदेचा आणि अर्थमीमांसाचा हिशोब सादर करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली. पुढील ४१ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता १) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार २) भारतीय शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील बदलते स्वरूप ३) विदर्भातील नैसर्गिक साधन संपत्ती (जिल्हा निहाय) हे तीन विषय निश्चित

करण्यात आले.

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांना स्व. श्री.आ.देशपांडे जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला आहे. त्याबद्दल आपल्या परिषदेतर्फे मा.डॉ. विनायक देशपांडे यांचे कडून डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांचा यथोचित सत्कार व अभिनंदन करण्यात आले. ४१ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एच.आर.तिवारी यांची अविरोधपणे निवड करण्यात आली.

त्यानंतर पीएच्.डी. प्राप्त आणि विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रा.डॉ. नागोराव सोरे, प्रा.डॉ. रविंद्र तायडे, प्रा.डॉ. किशोर गोमेकर, प्रा.डॉ. अनिल बन्सोड, प्रा.डॉ. गजानन बनचरे, प्रा.डॉ. प्रदिप ताकतोडे, प्रा.डॉ. महादेव रिठे, प्रा.डॉ. प्रविण हाडे, तसेच अर्थशास्त्र परिभाषा कोष उपसमिती (महाराष्ट्र राज्य) यावर प्रतिनिधी म्हणून डॉ. संतोष कुटे, IEA चे कार्यकारिणी सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांची नियुक्ती, प्रा.डॉ. उषा पाटील यांचा विशेष उल्लेखनीय कार्याबद्दल यथोचित सत्कार करण्यात आला. प्रा.डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेला ५००१/- रूपये देणगी दिली. त्याबद्दल त्यांचा सत्कार व अभिनंदन परिषदेतर्फे करण्यात आले.

डॉ. प्राची देशपांडे, प्रा.डॉ. किशोर गोमेकर, प्रा.डॉ. करणसिंग राजपूत, प्रा.नसरीन शेख यांचा शोधनिबंधाला पारितोषिक देण्यात येवून त्यांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले.

अधिवेशनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. एस.व्ही.आगरकर हे होते तर प्रमुख उपस्थितीत मा.डॉ. विनायक देशपांडे यांनी मार्गदर्शन केले तसेच कार्याध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार, सचिव डॉ. राजेश चव्हाण, स्थानिक कार्यवाहक प्रा. विजय रोठे उपस्थित होते. परिषदेच्या वतीने प्राचार्य मा.डॉ. एस.व्ही.आगरकर व प्रा. विजय रोठे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नागपूर व अमरावती महसूल क्षेत्रातील प्रतिनिधींनी दोन दिवसीय आयोजित अधिवेशनाच्या उत्तम आयोजनाबाबत आपले मनोगत व्यक्त केले. विदर्भातील अर्थशास्त्र अभ्यासक, पत्रकार, विद्यार्थी आणि व्यवस्थापन मंडळ ज्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य लाभले अशा सर्वांचे परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले. त्यानंतर परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनायक देशपांडे यांनी अधिवेशनाचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**राजेश चव्हाण** **गणेश मायवाडे**
सचिव,
. विदर्भ अर्थशास्त्र परिषद

◆◆◆